रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ११० । पृष्ठे १०▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹

आजचा रंग राखाडी



## वेधक

### डोक्यात दगड घालून भावाचा खून

**पनवेल :** सख्ख्या भावाने भावाच्या डोक्यात दगड घालून खुन करणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांच्या बीट मार्शलने पळून जाण्याच्या बेतात असताना ताब्यात घेतले. करंजाडे से. ५ पोलीस चौकी समोर जाणाऱ्या मार्गावर एका ४५ वर्षाच्या पुरुषाचा दगडाने ठेचून खुन झाल्याची माहिती फोनद्वारे पोलीस हवालदार माधव शेवाळे यांना बातमीदाराने दिली. त्यानंतर लगेचच पोलीस हवालदार माधव शेवाळे यांनी वरिष्ठांना याबाबत कळविले. दरम्यान, पनवेल शहर पोलीस ठाणे बिट मार्शलचे पोलीस हवालदार विलास कारंडे व राजेंद्र केणी यांनी घटनास्थळी उपस्थित व्यक्तींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रसंगावधान दाखवत आरोपी नागेश काळे (वय ३२) याला ताब्यात घेतले.

### एमपीएससी परीक्षेच्या तारखेत बदल

**मुंबई :** काही भागात पावसाने विध्वंस घडवला. अनेक ठिकाणी गावांना पुराने वेढा दिला. गावांचा संपर्क तुटला. तरुण परीक्षेपासून वंचित राहण्याची शक्यता होती. त्यामुळे परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी करण्यात आली होती. तशी शिफारस राज्य सरकारने केल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २८ सप्टेंबर रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलली आहे. आता नोव्हेंबर महिन्यात ही परीक्षा घेतली जाणार आहे. राज्याच्या वेगवेगळ्या जिल्ह्यात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यानंतर २८ सप्टेंबर रोजी घेण्यात येणारी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ पुढे ढकलण्याची मागणी केली होती.

### कोकणाला चार दिवस धोक्याचे

**रायगड :** पुढील काही दिवस पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. २७ ते ३० सप्टेंबर दरम्यान मुंबई जिल्ह्यात मुसळधार पावसाचा अंदाज दिला आहे. याबाबत आयएमडीने मुंबई, ठाणे आणि पालघरसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तसेच रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी मुसळधार ते अति मुसळधार पावसाच्या सरी कोसळणार असल्याचे म्हटले आहे. हवामान विभागाने याबाबत वेळापत्रक जारी केले आहे. त्यानुसार २७ ते ३० सप्टेंबर रोजी मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळणार आहे. तर २८ सप्टेंबर रोजी रायगड जिल्ह्यात अनेक भागात मुसळधार ते अति मुसळधार पाऊस येणार आहे.

## मिळकतखारमध्ये भांडवलदारांकडून
# कांदळवनांचा विनाश

### सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळयावर पट्टी; ग्रामस्थांची पाचव्यांदा तक्रार

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील मिळकतखार परिसरात पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर कांदळवन तोडून पर्यावरणाचा ऱ्हास करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या तक्रारीनुसार वरुण गोविंद वासवाणी, रवी हरिकिसन वासवाणी, मोहित जनक वासवाणी (मालक) तसेच कंत्राटदार जितेंद्र जयराम बेर्डे (पार्थ कन्स्ट्रक्शन) यांनी सरळपणे २ ते अडीच एकर क्षेत्रातील कांदळवनाची कत्तल करून अनधिकृत भराव केला आहे.**



**ग्रामस्थांचे आरोप व मागण्या**

वासवाणी कुटुंब व कंत्राटदार यांनी राजकीय वरदहस्ताचा गैरवापर करत स्थानिक कार्यालयांकडून बेकायदेशीर परवानगी मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पर्यावरणाचा ऱ्हास करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे बेकायदेशीररित्या केलेला भराव हटवावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच दोषी व्यक्तींवर तसेच तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यावरही कठोर कारवाई करा. या भरावाच्या ठिकाणी पुढील कुठल्याही बांधकामास थेट बंदी घाला. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेल्या कांदळवनांचा विनाश रोखण्यासाठी तातडीने सरकारी यंत्रणांनी उपाययोजना हाती घ्याव्यात, अशी मागणी अर्जदारांनी केली आहे.

गेल्या काही वर्षात या प्रकरणात अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. तीन गुन्हे दाखल आहेत. तसेच माती वाहतुकीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचे बनावट पास बनविल्याबद्दल तहसीलदार यांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले होते. मात्र तहसीलदार गुन्हे दाखल करण्याऐवजी वाहतूक विभागाला पत्र पाठवून हे प्रकरण नाहक लांबवून गुन्हेगारांना पाठीशी घालत असल्याची चर्चा जोर धरीत आहे.

परिणामी, प्रशासनाच्या आशिर्वादाने येथे वारंवार कांदळवन तोड होत असल्याचा आरोप ग्रामस्थ विनय कडवे व जगदिश म्हात्रे यांनी केला आहे. या प्रकरणात प्रशासनाकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार सर्व कायदेशीर प्रक्रिया व नियमांची पायमल्ली झाली असून अधिकाऱ्यांकडून सीआरझेड नोटिफिकेशन १९९१, तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या दि. ६ ऑक्टोबर २००५, दि. २७ जानेवारी २०१० आणि १७ सप्टेंबर •> पान ५ वर

## शिंदे गट, अंतर्गत तट?

### जाहिरातीच्या फलकांमधून आमदारांना डावलले

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात पालकमंत्री पदावरून शिंदे गट विरूध्द राष्ट्रवादीमधील वाद जगजाहिर असताना आता शिंदे गटातील अंतर्गत तटाची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. अलिबाग तालुक्यात दिवाळीसह वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या जाहिरातीचे फलक शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांकडून लावण्यात आले आहेत. मात्र फलकांमधून काहींनी आमदार दळवींना डावलले आहे. त्यामुळे शिंदे गटात एकमेकांमध्ये धुसपूस सुरु असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विरोधात काम केल्याने भाजपने दिलीप भोईर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. त्यामुळे दिलीप भोईर यांच्यासाठी 'ना घर का ना घाट का' अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे कोणाकडे जायचे अशी त्यांची घालमेल सुरु होती. दळवींसोबत जायचे नाही, अशी त्यांची सुरूवातीची भूमिका होती. परंतु दळवींनी त्यांना काही आमिष दाखविल्यावर दिलीप भोईर शिंदे गटात सामील झाले. त्यामुळे राजा केणीला भोईर यांची अडचण होण्याची चर्चा होती. परंतु 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे दिलीप भोईर यांचा सन्मान झाल्याची चर्चा आहे. आता मात्र भोईर यांना फारसा प्रतिसाद दळवींकडून मिळत नसल्याची चर्चा आहे. त्यांना एकटेच टाकले जात असल्याचे बोलले जात आहे. तसेच दिलीप भोईर यांचे साथीदार सुधीर चेरकर आणि दळवींचे समर्थक अनंत गोंधळी यांच्यामध्येदेखील गेल्या काही दिवसांपासून अंतर्गत कलह असल्याची चर्चा आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत उमेदवारी मिळावी, यासाठी या दोघांनी एकमेकांचे वेगवेगळे जाहिरातीचे फलक लावण्यास सुरुवात केली आहे. यातील एकाच्या •> पान ५ वर

## स्थानिकांसाठी छावाचा एल्गार

### जिल्हाधिकारी कार्यालयावर निर्दशने

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

स्थानिकांना कंपन्यांमध्ये रोजगार देण्यास टाळाटाळ केले जात आहे. परप्रांतियांची नोकर भरती मोठ्या प्रमाणात केली जात आहे, असा आरोप करीत छावा सामाजिक संस्थेने रोजगारासाठी एल्गार पुकारला. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगार संघटनेसह सामाजिक संघटनेच्या वतीने निदर्शने करण्यात आली. उद्योग व कामगार विभागाच्या परित्रकानुसार, स्थानिकांना ८० टक्के रोजगार देण्यात यावा, अशा अनेक मागण्यांसाठी शुक्रवारी (दि.२६) दुपारी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. खालापूर, खोपोली, व परिसरात औद्योगिक क्षेत्रात प्रचंड वाढ झाली आहे. लहान मोठे, मध्यम स्वरुपाचे उद्योग जिल्ह्यात सुरु आहेत. या प्रकल्पांसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जमीनी दिल्या. कवडी मोल भावाने जमिनी संपादीत करण्यात आल्या आहेत. परंतू प्रत्यक्षात जिल्ह्यातील अनेक कंपन्यांमध्ये स्थानिक युवकांना रोजगार नाकारला जात आहे. त्यांच्या जागी परप्रांतियांची भरती मोठ्या प्रमाणात केली जात आहे. त्यामुळे स्थानिक युवकांचे रोजगार हिरावले जात आहे. स्थानिकांच्या उपजीविकेवर मोठा गंभीर परिणाम होत आहे. या कंपन्यांमध्ये फक्त बोटावर मोजण्या •> पान ५ वर

## पालीतील रेशन दुकानांमध्ये निकृष्ट गहू

**। सुधागड–पाली । गौसखान पठाण ।**

पालीतील रेशन दुकानांमध्ये सध्या लाभार्थ्यांना लेंडीयुक्त, निकृष्ट दर्जाचा गहू वाटप केला जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गरीब व गरजू नागरिकांना मोफत धान्य पुरवठा केला जातो, मात्र मिळणाऱ्या गव्हाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.



गहूमध्ये लेंड, कचरा, दगड, कीड लागलेले दुर्गंधीयुक्त धान्य आढळत असल्याने अनेक लाभार्थ्यांनी रेशन दुकानदारांकडे तक्रारी नोंदवल्या आहेत.

काही ठिकाणी गहू वापरण्यायोग्य नसल्यामुळे नागरिकांनी तो परत करण्याचा निर्णय घेतला आहे. आम्हाला मिळणाऱ्या गव्हातून चपाती बनवणे कठीण झाले आहे. •> पान ५ वर

## शिक्षकांना मिळणार दिलासा

- **अध्यापनासाठी मिळणार वेळ**
- **शाळांमधील समित्या केल्या जाणार एकत्र**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील विविध समित्यांच्या एकत्रीकरणाचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने अलीकडेच घेतला. त्यानंतर आता राज्यातील खासगी अनुदानित शाळांतील समित्याही पाच समित्यांमध्ये एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता अनुदानित शाळांतील शिक्षकांना समित्यांच्या कामकाजात जाणारा वेळ अध्यापनासाठी वापरणे शक्य होणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये एकूण १५ प्रकारच्या समित्या अस्तित्वात होत्या. मात्र, या समित्यांच्या •> पान ५ वर

**शाळास्तरावर नवीन समिती नाही**

**राज्यात नवीन शैक्षणिक उपक्रम किंवा योजना सुरू झाल्यास त्यासाठी शाळास्तरावर नवीन समिती स्थापन करण्यात येऊ नये. त्याबाबतची कार्यवाही शाळा व्यवस्थापन समिती किंवा विद्यार्थी सुरक्षा आणि भौतिक सुविधा विकसन समितीमार्फत करावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.**

## बीएलओच्या मानधनात दुप्पट वाढ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र सरकारने मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ केली आहे. आधी या अधिकाऱ्यांना प्रति वर्ष ६ हजार रुपये मानधन दिले जात होते, परंतु आता ते १२ हजार रुपये करण्यात आले आहे.

याबाबत राज्य सरकारने सोमवारी याबाबतचे परिपत्रक जाहीर केले. विशेष म्हणचे १ सप्टेंबर २०२५ पासून ही वाढ लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदारसंघांच्या छायाचित्र मतदार याद्यांची विश्वसनीयता सुनिश्चित करण्यासाठी भारत निवडणूक •> पान ५ वर




### बैठकीला गैरहजर राहत असल्यामुळे कारवाई | प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविली जबाबदारी

# आमदार, पालकमंत्र्यांची हकालपट्टी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**राज्यात मोठ्या संख्येने क्रीडा संकुलांची उभारणी करण्यात येत असताना त्यासंदर्भातील बैठकांना समिती अध्यक्ष या नात्याने आमदार व पालकमंत्री वेळ देत नव्हते. परिणामी संकुलांची कामे रखडली होती. त्यामुळे समिती अध्यक्षपदावरुन आमदार, पालकमंत्री यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. आमदारांच्या जागी प्रांताधिकारी तर पालकमंत्र्यांच्या जागी जिल्हाधिकारी यांना क्रीडा संकुल समितीची अध्यक्षपदे बहाल करण्यात आली आहेत.**

राज्यात ३८० तालुका, ३६ जिल्हा आणि १० विभागीय अशी एकुण ४२६ क्रीडा संकुले मंजूर आहेत. त्यापैकी १६१ सकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून १३४ संकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. संकुलांचे बांधकाम, खेळांच्या साधनांची खरेदी आणि संकुलाची निगा यासदंर्भातील जबाबदारी संकुल समितीवर असते. तालुका क्रीडा संकुलाचे अध्यक्ष स्थानिक आमदार तर जिल्हा व विभागीय संकुलाचे अध्यक्ष पालकमंत्री यांच्याकडे होते.

**राज्यात ३८० तालुका, ३६ जिल्हा आणि १० विभागीय अशी एकुण ४२६ क्रीडा संकुले मंजूर आहेत. त्यापैकी १६१ सकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून १३४ संकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.**

२००३पासूनसंकुलउभारणीचे काम केले जात असून आजपर्यंत १२७७ कोटी निधी दिलेला आहे. मात्र संकुलाची उभारणी व त्यांची निगा हवी तशी होत नाही. कारण समिती अध्यक्ष म्हणून आमदार व पालकमंत्री बैठकांना वेळ देत नव्हते. क्रीडा खात्याचा कारभार हाती आल्यानंतर मंत्री माणिकराव कोकाटे यांनी अध्यक्ष बदलण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यावर नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे.

यापुढे तालुका क्रीडा संकुलाचे अध्यक्ष प्रांताधिकारी असणार आहेत. जिल्हा क्रीडा संकुलाचे काम जिल्हाधिकारी पाहणार आहेत तर विभागीय क्रीडा संकुलाची समिती विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत राहणार आहे. •>पान २ वर

# गेल कंपनीत चोरी

## सव्वा लाख रुपयांचा ऐवज लंपास; कंपनीतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

उसर येथील गेल कंपनीमध्ये चोरी करण्यात आली. सव्वा लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली असून याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भारत सरकारच्या पेट्रोलिअम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली गेल कंपनी काम करीत आहे. उसर येथे गेल कंपनी असून या कंपनीच्या दुसऱ्या टप्प्यातील पॉलिमार प्रकल्पाचे काम गेल्या चार वर्षापासून सुरु आहे. प्रकल्पाचे काम चांगल्या पध्दतीने व्हावे, काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कंपनीच्या परिसरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. पोलीस दलाच्या अखत्यारित येणाऱ्या राज्य औद्योगिक सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांमार्फत कंपनीतील सुरक्षा राखण्याचे काम केले जात आहे.

कंपनीत येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांबरोबरच कामगारांचीदेखील तपासणी सुरक्षा रक्षकांच्या मार्फत केली जात आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्वाचा मानला जात आहे. मात्र तरीदेखील या कंपनीत सुरक्षा रक्षकांना चकवा देत काही वस्तूंची चोरी होत असल्याची बाब कृषीवलने जूलै महिन्यात बातमीच्या रुपात दाखवून दिली. मात्र कंपनी प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्याने सप्टेंबर महिन्यामध्ये कंपनीतील कामासाठी असणारी ९५ मीटरची कॉपर केबल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली.

### चोरी करणारे मोकाट

कंपनीत कॉपर कॉईलची चोरी होऊन अनेक दिवस उलटून गेले आहेत. कंपनीतील कामगारांची तपासणी पोलिसांमार्फत केली जात आहे. मात्र अजूनपर्यंत त्याचा सुगावा लागला नाही. चोरी करणारे मोकाट आहेत. त्यांचा शोध लावण्यात पोलीस यशस्वी ठरतील का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

तब्बल सव्वा लाख रुपयांचा ऐवज चोरट्याने मोकळ्या जागेतील पाईप यार्ड चोरून नेला. कंपनीमधील या ठिकाणी ठेवलेली केबल चोरल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक नामदेव आंगज अधिक करीत आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे बागमांडले ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | लागवड योग्य क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५०६ | ०-२०-० | ०-१८-०० | ०-०२-०० | ०-०८ |
| २ | ५०७ | ०-९१-०० | ०-८२-०० | ०-०९-०० | ०-४५ |
| ३ | ५११ | ०-९२-०० | ०-८२-०० | ०-१०-०० | ०-४५ |
| ४ | ४९८ | ०-३८-०० | ०-३३-०० | ०-०५-०० | ०-१२ |
| ५ | ६१० | ०-४७-०० | ०-४१-०० | ०-०६-०० | ०-२३ |
| ६ | ६०२ | ०-२२-०० | ०-२२-०० | ०-०-० | ०-०८ |
| ७ | ६०५ | ०-३१-०० | ०-२९-०० | ०-०२-०० | ०-१७ |
| ८ | ६३५ | ०-१६-०० | ०-१४-०० | ०-०२-०० | ०-०६ |
| ९ | ६१४ | ०-१७-०० | ०-१६-०० | ०-०१-०० | ०-०८ |
| १० | ६२० | ०-०४-०० | ०-०४-०० | ०-०-० | ०-०३ |

**मालकाचे नाव :- श्रीमती मालिनी संजीव कालुरकर, श्रीम. दीप्ती संजीव कालुरकर व गौरी संजीव कालुरकर** यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याच्या बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्याच्या आजपर्यंत ताबे कब्जा व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणूकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी, वहिवाट ताबा बयाना पावती अखत्यारपत्र, साठे करार गहाण बोजा, भाडेपट्टा मृत्युपत्रांकित दान जप्ती लीन बक्षिसी ट्रस्ट पोटगी वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाची आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे वकिलाची खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क व हे संबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमच्याशी संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक :- २१/०९/२०२५ सही/-
कार्यालयीन पत्ता **(अॅड. संतोष मारुती सापते )**
रा.ग.स.कातकर सभागृह गाळा नं २ वाणी श्रीवर्धन

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे पोयनाड ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रवीण गिरीधर टेमकर २) उमेश गिरीधर टेमकर ३) सीमा जनार्दन म्हात्रे ४) अजय गिरीधर टेमकर ५) प्रीती प्रदीप टेमकर ६) निकीत प्रदीप टेमकर ७) संकेत प्रदीप टेमकर यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|
| पोयनाड ता.अलिबाग जि. रायगड | १६४/६ | १-०५-७० पो. ख ०-०८-६० एकूण १-१४-३० |
| पोयनाड ता. अलिबाग जि.रायगड | १६४/५ | ०-६५-५० पो.ख ०-०५-३० एकूण ०-७०-८० |
| पोयनाड ता. अलिबाग जि.रायगड | १६४/४ | ०-१५-४० पो.ख ०-०१-८० एकूण ०-१७-२० |
| पोयनाड ता. अलिबाग जि. रायगड | १६५/२ | ०-३५-७० पो.ख ०-०४-३० एकूण ०-४०-०० |
| पोयनाड ता. अलिबाग जि.रायगड | १५३/३ | १-८२-०० पो.ख ०-११-०० एकूण १-९३-०० |
| पोयनाड ता.अलिबाग जि.रायगड | १६२/१ | ००-०७-०० पो.ख.०-००-०० एकूण १-९३-०० |
| पोयनाड ता. अलिबाग जि.रायगड | १५४/२ | ०-११-१० पो.ख ०-००-८० एकूण ०-११-९० |

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लीज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क, वा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही. अगर असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग **अॅड.आशिष संदीप रानडे**
दिनांक - २७/०९/२०२५ रा.रानडे निवास तात्या रानडे मार्ग
शिवलकर नाका अलिबाग-रायगड
मो.नंबर -९२७०२९४५४५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सदनिका मिळकतीचे मालक श्री.अंकुश वसंत चव्हाण यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद सदनिका मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-दहिवली तर्फे नीड, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील**

**सर्व्हे नं. ९६/३, प्लॉट नं. ९, १० आणि ११ या मिळकतीवरील 'विघ्नहर्ता को. ऑप हौसिंग सोसायटी' या बिल्डींग मधील दुसरा मजल्यावरिल ब्लॉक नं. २०५ क्षेत्र ५६९ चौ. फुट सुपर बिल्टअप नगरपरिषद मिळकत जुना नंबर ८४८/२० नवीन मिळकत नंबर झेड २००१६२३.**

सदरची सदनिका मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील सदनिका मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे आशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत खरेदीदारा तर्फे वकील
दि. २७/०९/२०२५ **अॅड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसिडेन्सी मुद्रे खुर्द,
शॉप नं. २४, डी.-विंग, कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.७७०९१६०५६७

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल यांनी मेघा मधुकर खांडेकर, रा. ए- १०४, ओम श्री शांती निवास, वसई रोड वेस्ट, जि. ठाणे व नीलिमा जितेंद्र भासे रा. लाखरण, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खाली वर्णन केलेली जमिनीची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे इंजिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | खाते क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ८/२/अ | १२१ | ०.२०.२५ | ०.४८ |
| | १२२ | ०.२०.२५ | ०.४७ |

वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत इतर कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, खरेदीखत, ताबा, कुळवहिवाट, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, लीज, चार्ज, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून -०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असे समजून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २६/०९/२०२५
पत्ता : लाखरण, पोस्ट. तिवरे, खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट
ता. कर्जत, जि. रायगड. **अॅड. सूरज अ. पंडित**
मो. ९८९०९६०९२०. (एम.ए.एल.एल.बी.)

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांचे खुद्द मालकीच्या, खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र-(आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड | १०३/१/अ/५ | ०-०७-८४ | ३७६.३२ |

वर नमुद केलेली मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील जमिन मिळकत व त्यावरील अलिबाग नगरपरीषद मालमत्ता क्र.अलब०००००५८४, मालमत्ता क्र. अलब०००००५८३ आणि मालमत्ता क्र.अलब०००००५८६.

अलिबाग,
दि. २६/०९/२०२५ **अॅड. महेश सुहास म्हात्रे**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No.1. Ch. Shivaji Chouk.
Near Gawade Optics, Alibag Raigad

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबागमधील आर्किटेक्ट ऑफिसकरीता ऑटोकेड ड्राफ्टसमन ३d डेवलपर, इंटीरियर डिझाइनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७**
- **श्री सिद्धीविनायकज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरीधंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण, अलिबाग फोन नं. ९९६०४५६९८६**
- **१५०० स्क्वेअर फुट शेड भाड्याने देणे आहे. पत्ता चोंढी-बामणसुरे, मो.९९२२१६०२७७.**
- **पिंपळभाट अलिबाग येथे मेडीकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत. शैक्षणिक पात्रता, दहावी व दहावीच्या पुढे तसेच मालाच्या डिव्हीवरीसाठी ड्रायव्हर पाहिजे. Contat No. ९५०३३५५८८६, ८६९८१३४६८९**
- **रिसॉर्टमध्ये कामासाठी हाऊसकिपर, वेटर, कॅप्टन आणि ऑलराऊंडर कुक इत्यादी माणसे पाहिजेत. मो.९९२१९७८०८०**
- **ऑफिससाठी जागा भाड्याने देणे आहे, पिंपळभाट येथे स्वामी समर्थ नगरमध्ये मोक्याच्या ठिकाणी बंगल्याच्या वरच्या मजल्यावर १२००Sq. ft. जागा ऑफिससाठी किंवा मेडिकल कॉलेजच्या मुलींना भाड्याने देणे आहे संपर्क:९६७३०६७७९९**
- **अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट ,गोंधळपाडा, रेवस बायपास परिसरामध्ये २BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्कंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको मो. ७७५८९७५४०७**
- **१५०० स्के. फुटाची व्यावसायिक जागा भाड्याने देणे आहे. (दवाखाना, ऑफिस, बँक यांना प्राधान्य) संपर्क : ९२८४५५५३७४, संपर्काची वेळ : दुपारी ४ ते रात्री ९**
- **आसावरी सोसायटी वन BHK ब्लॉक विकणे आहे. फुल फर्निचर समुद्रपासून पाच मिनिटावर अलिबाग मार्केट शेड मो. ८८०५५४०४६४**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे शेलु, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्रीधर जयराम चितळे. रा-उशा नगर भांडुप वेस्ट मुंबई व २) अर्चना शिरीष वैद्य रा-साई कृपा, जे.पी.नगर गोरेगाव ईस्ट, मुंबई यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकती त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| शेलु | ११९ | ८ | लागवडी योग्य क्षेत्र-०.१४.२० हे.आर.चौ.मी. पोट खराब क्षेत्र-०.००.८० हे. आर.चौ.मी. एकुण क्षेत्रफळ-०.१५.०० हे.आर.चौ.मी. | १.६२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्रीधर जयराम चितळे. व २) अर्चना शिरीष वैद्य यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच सदरील व्यक्तीचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात (०७) दिवसांचे आत खाली सही करणार अॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक :२७/०९/२०२५ **अॅड. भारत अंकुश सांवत**
(बी कॉम.एल.एल.बी )
पत्ता-मु पो मोठे वेणगाव
ता-कर्जत जि-रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२


## मोरवणे परिसरात बिबट्याची दहशत

**सहा महिन्यात सहा गुरे, एका कुत्र्याला केले ठार**

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यात वनराईने नटलेल्या निसर्गरम्य देहन, मोरवणे, वांगणी गाव परिसरात जंगली श्वापदे आणिपशुपक्षांची नेहमीच रेलचेल असते. रोहा परिक्षेत्र म्हसळा वन विभागांतर्गत मोठ्या प्रमाणात वन जमीनीवर घनदाट जंगल आहे. देहन येथे तालुका कृषी विभागाची मोठी नर्सरी असल्याने येथील घनदाट झाडीने देहन, वांगणी गाव परिसरामध्ये बारमाही नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत वाहताना पाहायला मिळतात. जंगली श्वापदांना पोषक वातावरण असल्याने येथील जंगल क्षेत्रात बिबट्याचा वावर आहे. बिबट्या अधुन मधून मोरवणे, देहन, पाष्टी, वांगणी येथील शेतकऱ्यांच्या गुरांवर हल्ला करून गोधनाचे नुकसान करीत असतो. मे महिन्यापासून मोरवणे गावात दोन शेतकऱ्यांच्या गोठ्यात बांधलेली तीन वासरे, वांगणी येथे शेतघरातील पाळीव कुत्रा, अशोक नाईक यांच्या मालकीचा बैल, मोरवणे गावाचे राजा गायकर यांच्या मालकीची गाय तर वांगणी येथील विश्वास नाईक यांच्या गोठ्यातून सहा महिन्याचे वासरू बिबट्याने ठार केल्याचे निदर्शनास आले आहे. वरील घटनांची नोंद म्हसळा तालुका वनविभाग कार्यालयात करण्यात आली असून ४ शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीची भरपाई देण्यात आली असल्याचे अशोक नाईक यांनी माहिती देताना सांगितले. बिबट्या नेहमी वांगणी, मोरवणे येथे पाळीव जनावरांवर हल्ला करून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान करीत असल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. कालांतराने बिबट्या माणसावर हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने रोहा परिक्षेत्र म्हसळा वन विभागाने लागलीच दखल घेऊन परिक्षेत्र वनविभाग अधिकारी व कर्मचारी यांनी बिबट्याचा योग्य तो बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.


SARASWATI EDUCATION SOCIETY'S
**YADAVRAO TASGAONKAR POLYTECHNIC**
Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytpoly.com, principal.ytp@tasgaonkartech.com

**FACULTY RECRUITMENT- 2025-26 for NON AICTE SHORT TERM COURSES**

**Applications are invited for Teaching and Non-Teaching position for our proposed short term courses for the academic year 2025-26.**
**Eligible candidate shall apply with application and resume through mail to principal.ytp@tasgaonkartyech.com & 0960principal@msbte.ac.in within 10 days of the publication of the advertisement.**

| Sr. No. | Position applied for | No. of Positions | Experience | Qualification |
|---|---|---|---|---|
| 01 | Lecturer- Advanced Diploma in Fire Safety Engineering | 02 | 01 Year (Fresher's may apply) | Graduate in Fire Engineering or Any Graduate with Diploma in Fire Safety Engineering. |
| 02 | Lecturer- Advanced Diploma in Industrial Safety | 02 | 01 Year (Fresher's may apply) | Graduate in Industrial Safety or Any Graduate with Diploma in Industrial Safety. |
| 03 | Lab Assistant | 01 | 01 Year (Fresher's may apply) | Diploma in Industrial Safety / Fire Safety |
| 04 | Peon | 01 | | SSC or equivalent |

For detailed information contact to **8149679293 / 7030896095**

**Sd/**
**Principal, Yadavrao Tasgaonkar Polytechnic**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**400kV R.S. (O&M) Division Nagothane**
**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-15/25-26/ Rfx No. 7000037686 | Supply of Tripping coil & Closing coil for various makes of CB at various s/s under 400 KVR.S. (O&M) Division Nagothane | **Rs. 4,61,714.41/-** | **11.10.2025 up to 23.59 hrs** |

**EMD Rs. 5000/-**, Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** **Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/६५२५/प्र.क्र.१२७,१२८/३७०५/२०२५ दिनांक : २६/०९/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रू. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/१९६/२०२५ -२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली गावातील भरत पाटील चाळ ते गुरूनाथ पाटील यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. गटाराचे बांधकाम करणे. | १९,५०,६३७/- |
| २. | PMC/CE/१९÷/२०२५ -२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली गावातील किरण राम भगत यांच्या घरापासून ते श्री सद्‌गुरु बैठक हॉल. आदिवासी वाडी रस्त्यापर्यंत आर.सी.सी. गटाराचे बांधकाम करणे. | १६,३७,४९९/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २९/०९/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री. श्यामल कुमार हिरा यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-शिंगढोळ, तालुका-कर्जत, जि. -रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ७८ | १० | ०.२४.०० | ०.२२ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २७/०९/२०२५ खरेदीदारांतर्फे वकील
**अॅड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १४/३ | एकूण क्षेत्र ०-५३-०० हे.आर. | २.२७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- २७/०९/२०२५ **अॅड. रोहित रो. मानकवळे**
ठिकाण :- पनवेल मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- शॉप नं.२३, प्लॉट नं. ५१, कल्पतरु
कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक भगवान नारायण बोराडे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे वडवली, ता . कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**


| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १९ | १/क | ०-३७-०० | ५-३७ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन २१ (एकवीस) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २७/०९/२०२५ खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट
मो.९९२१७२२२०० **समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## नि|व|ड|क

### ग्रामपंचायत अधिकाऱ्याला धक्काबुक्की

**आगरदांडा :** मुरुड तालुक्यातील ऊसरोली ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामपंचायत अधिकारी यांची प्लास्टिक पिशव्यांच्या अवैध वापराबाबत तपासणी आणि दंडात्मक कारवाई सुरु असताना एका व्यक्तीने अचानक घटनास्थळी येऊन त्यांना धक्काबुक्की केली. तसेच, शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शासनाकडून आलेल्या सूचनेनुसार उसरोली ग्रामपंचायत अधिकारी चैतन्य खैरनार व ग्रामपंचायत कर्मचारी हे ग्रामपंचायत हद्दीत प्लास्टिक पिशव्यांवरील सरकारी कारवाईसाठी येथील ईश्वरी वडापाव दुकानात गेले होते. राज्य शासनाच्या निर्देशानुसार गावात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असल्याने ही तपासणी केली जात होती. तपासणीदरम्यान दुकानात प्लास्टिक पिशवी आढळल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई सुरु होती. याचवेळी कैलास पाटील नावाचा व्यक्ती तिथे येऊन सरकारी कामामध्ये हस्तक्षेप करत अधिकाऱ्यांना धक्काबुक्की करून त्यांना दमदाटी करू लागला. ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी हे सरकारी कामकाज करत असल्याचे माहित असूनही, कैलास पाटील या व्यक्तीने मुद्दाम त्यांच्यासोबत धक्काबुक्की केली. एवढ्यावरच न थांबता त्याने शिवीगाळ आणि मारण्याची धमकी देत सरकारी कामात अडथळा निर्माण केला. याबाबत मुरुड पोलीस ठाण्यात कैलास पाटील याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास मुरुडचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अंकुश सोळसे हे करीत आहेत.

### पनवेल पोलीस ठाण्याला मानांकन

**पनवेल :** पनवेल तालुका पोलीस ठाण्याला आयएसओ मानांकन प्राप्त झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांना प्रमणापत्र प्रदान करण्यात आले. खारपाडा टोल नाका ते वावंजे, धोदानी, शिरवली त्याचबरोबर खालापूर तालुक्याची सीमा असा मोठा भाग पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत येतो. त्याचबरोबर ग्रामीण भाग देखील या पोलीस स्टेशनच्या हद्दीत येतो. त्यामुळे सहाजिकच येथे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी तालुका पोलिसांवर आहे. दरम्यान, असे असतानाही प्रत्येक आघाड्यांवर वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या नेतृत्वाखाली कर्तव्य बजावण्यात आले आहेत. या ठिकाणी दाखल झालेल्या गुन्ह्यापैकी त्याचे अन्वेषण आणि प्रकटीकरणाचे प्रमाण सुद्धा चांगले आहे. गुन्हेगारांना जरब बसवण्यात तालुका पोलिसांना बऱ्यापैकी यश मिळाले आहे. त्यानुसार त्यांना आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे.

# माथेरान नगरपरिषदेचे पथदिवे अंधारात

## वीजबिलाची मोठी रक्कम थकित

| नेरळ | प्रतिनिधी |

**माथेरान या थंड हवेचे ठिकाणी देशभरातून पर्यटक येत असतात. या पर्यटकांच्या सुविधेचा महत्त्वाचा भाग असलेले माथेरान शहरातील रस्त्यांवर तीन दिवस अंधार होता. त्यानंतर पालिकेने १० लाखाचे बिल अदा करून आपली अब्रु वाचवली आहे. येथील पथदिव्यांचे बिल एमएमआरडीएने थकवले असून त्याचा आर्थिक भुर्दंड माथेरान नगरपरिषदेवर पडत असल्याचा दावा नगरपरिषदेने केला आहे.**



माथेरान शहरातील रस्त्यांच्या दुतर्फा पथदिवे असल्यामुळे ते याठिकाणी रात्री अपरात्री येणाऱ्या पर्यटकांसाठी उपयुक्त ठरत असतात. शहरातील प्रमुख रस्ते आणि प्रेक्षणीय स्थळांकडे जाणारे रस्त्यांच्या आजुबाजूला पथदिवे माथेरान नगरपरिषदेकडून बसवण्यात आले आहेत. या सर्व पथदिव्यांची वीज देयके सप्टेंबरपर्यंत २८ लाख ३८ हजार रुपयांपर्यंत थकली होती. त्यामुळे महावितरणकडून वीज देयके भरण्यासाठी पालिकेकडे तगादा लावण्यात येत होता. मात्र पालिका प्रशासनाने वीज देयके १८ सप्टेंबर पूर्वी भरली नसल्याने शेवटी महावितरण कंपनीने २२ सप्टेंबर रोजी वीज पुरवठा खंडित केला. त्याचा परिणाम माथेरान शहरातील रस्त्यांच्या दुतर्फा असलेले पथदिवे उजळले नाहीत. त्यानंतर वीज देयक थकीत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांना कळली.

वीज देयक भरले नसल्याने येथील वीज पुरवठा खंडित केला असल्याचे स्पष्ट झाल्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उघड नाराजी व्यक्त केली. मनसेच्या आक्रमक भूमिकेनंतर माथेरान नगरपरिषदेकडून तात्काळ १० लाख २९ हजाराचा धनादेश गुरूवारी (दि.२५) महावितरण कार्यालयात पाठवण्यात आला आहे. महावितरण कंपनीकडून त्यानंतर वीज पुरवठा पूर्ववत केला असला तरी थकीत रक्कम पुढील महिन्यांत भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

> **“माथेरान शहरात ५० हून अधिक ठिकाणी पथदिवे बंद आहेत आणि तरी देखील त्यांचे बिल दिले जाते. माथेरान शहरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून रस्त्यांची कामे केली गेली आहेत. त्याच विभागाकडून पथदिवे बसवण्यात आले असून त्याचे देयक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण भरणे होते. त्यांच्याकडून वीज देयकांची रक्कम भरली जात नसल्याने त्यांचा संपूर्ण आर्थिक भुर्दंड माथेरान नगरपरिषदेवर येत आहे.”**
>
> **– भारत पाटील, अधिकारी, माथेरान नगरपरिषद**

### मुंबई–गोवा महामार्गावर अपघात

| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई–गोवा महामार्गावरील पुगांव गावाजवळ गुरुवारी (दि.२५) सकाळी पावणेनऊ वाजताच्या सुमारास अपघात झाल्याची घटना घडली. हा अपघात दुचाकी आणि कारची एकमेकांना धडक बसल्याने झाला असून यात तिघेजण गंभी जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दुचाकीचालक ट्रिपल सीट घेऊन मुंबईच्या दिशेने जात होता. त्यावेळी पुगांव गावातील नम्रता गार्डन समोर त्याने समोरून येणाऱ्या इको कारला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीचालक रामनाथ हिलश (२२) याच्यासह संजय वाघमारे (१६) व अजय वाघमारे (२१) हे तिघेजनण जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद कोलाड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



• सौ. शोभा कुंदे, कुठ्यांची गोठी



• हजारे नगर सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ, हजारे नगर बोपेले, नेरळमधील महिला मंडळ



• पाटील परिवार. बेलकडे



• माणगाव तालुक्यातील विठ्ठल रुक्मिणी महिला मंडळ रुद्रवली



• मिलिटरी इंजिनिअर सर्व्हिसेस, सांताक्रूझ



• जय मल्हार ग्रुप, शहाबाज



• बामणगावच्या आईचे दर्शन घेताना महिला मंडळ



• आरडीसीसी हेड ऑफीस महिला कर्मचारी

नवरात्रोत्सव २०२५ रंगशक्ती



• चोरढेकर परिवार, चोरढे



• आरडीसीसी बँक, वडखळ



• दिया धुमाळ, पेझारी



• जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा, अलिबाग



• कुंठ्यांची गोठी,अलिबाग



• मुरुडच्या शिंपी समाजाच्या महिला (छायाचित्र- सुधीर नाझरे)



• पंचायत समिती, अलिबाग



## मोदी सरकारचे पाप

मोदींच्या केंद्र सरकारला सगळीकडे दांडपट्टा फिरवायची सवय झाली आहे. सरकारपुढे सगळ्यांनी खाली माना घालून राहिले पाहिजे अशी त्याची अपेक्षा आहे. पण पंजाबमधील शेतकरी आंदोलन असो की गडचिरोलीतील आदिवासींचा मोर्चा या सर्वांना नक्षलवादी, देशद्रोही ठरवायचे, तुरुंगात टाकायचे आणि आंदोलने चिरडून टाकायची अशी या सरकारची रीत राहिली आहे. लडाखमध्ये मोदी सरकार हेच करू पाहत आहे आणि हे अत्यंत घातक आहे. लडाखला राज्याचा दर्जा द्यावा या व इतर मागण्यांसाठी तेथे गेले अनेक दिवस शांततेने आंदोलन चालू होते. सोनम वांगचूक यांच्यासह काही नेते उपोषणाला बसले होते. अशा आंदोलकांशी चर्चा करणे हे शान के खिलाफ आहे असे मोदींना वाटते. इथेही तेच झाले. दरम्यान उपोषण करणाऱ्यांपैकी दोघांची प्रकृती बिघडली व इस्पितळात न्यावे लागले. त्यामुळे आंदोलकांचा धीर सुटला व त्यातून हिंसाचार झाला. आंदोलकांनी लेहमधील भाजपच्या कार्यालयाला आग लावून दिली. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबाराच आंदोलकांपैकी चार जणांचा मृत्यू झाला. या चारही जणांना अनेक गोळ्या लागल्याचे स्पष्ट झाले असून पोलिसांनी त्यांना जणू सूडाने व ठार मारण्यासाठीच गोळ्या घातल्याचे दिसते. त्यातही भाजपच्या कार्यालयाला आग लावल्याने सरकारला हा आपला वैयक्तिक अपमान वाटला असावा. त्यामुळे आंदोलकांना गोळ्या तर घातल्या गेल्याच, शिवाय आंदोलकांच्या संघटनांची मान्यता रद्द करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यांना परकीय देणग्या कशा मिळाल्या याची चौकशी चालू आहे. सरकारनेच दिलेल्या माहितीनुसार कोट्यवधींच्या वगैरे नसून दोन-चार लाख रुपयांच्याच आहेत. तरीही आता त्यांच्या सीबीआय चौकशीच्या नावाखाली लडाखी तरुणांचा छळ होणार आहे. मोदींनी निवडणूक रोख्यांच्या नावाची योजना आणून भाजपला हजारो कोटी रुपये मिळवून दिले. नंतर सर्वोच्च न्यायालयाने ही योजना बेकायदा ठरवली. पण तिच्यात पैसे देणारे व घेणारे यांची चौकशी झाली नाही. इथे मात्र ७५ हजार किंवा तीन-चार लाखांच्या देणग्या म्हणजे देशद्रोहीपणा असल्याप्रमाणे झाडाझडती घेतली जाणार आहे.

### देशभक्तीविषयी शंका नको

मोदींच्या अहंकारापायी हा सर्व आगीशी खेळ चालू आहे. लडाख हा चीनच्या तर लडाखमधील कारगील हा पाकिस्तानच्या सीमेवरचा अत्यंत मोक्याचा प्रदेश आहे. १९४८ पासून आजतागायत झालेल्या सर्व युध्दांमध्ये या प्रदेशातील लोकांनी भारताला मोलाची साथ दिली आहे. १९६२ च्या युध्दात अरुणाचलमध्ये चीनने शिरकाव केला. पण लडाखने त्याला रोखून धरले. १९९९च्या कारगील युध्दात येथील तरुणांचा स्नो वॉरियर्स किंवा बर्फातले योध्दे म्हणून गौरव झाला. या भागातून सैन्यात गेलेले कर्नल छेवांग रिनचेन यांना आजवर दोनदा महावीर चक्र सन्मानाने गौरवण्यात आले आहे. आज भाजपवाले अत्यंत निर्लज्जपणे लडाखमधील आंदोलकांच्या देशभक्तीविषयीच शंका घेत आहेत. त्यांनी लडाखचा हा इतिहास लक्षात ठेवायला हवा. २०१९मध्ये ३७० कलम हटवून लडाखला केंद्रशासित प्रदेश करण्यात आला तेव्हा आरंभी लडाखमधील लोकांनी त्याचे स्वागत केले. जम्मू-काश्मीरमधील सततच्या हिंसाचारामुळे त्या राज्याच्या विकासावर बंधने येत होती. लडाखही तोवर काश्मीरमध्येच असल्याने त्यांनाही याचा त्रास होत होता. त्यातून मुक्तता झाली व आपला स्वतंत्रपणे विचार होईल असे लडाखी जनतेला वाटले. आरंभी केंद्राने या भागासाठीचा निधी वाढवल्याने उत्साहात भर पडली. पण आपल्या विकासाचे व नियोजनाचे सर्व निर्णय दिल्लीतले नोकरशहा घेत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. शिवाय ३७० कलम असेपर्यंत बाहेरच्या लोकांना लडाखमध्ये जमीन वा मालमत्ता खरेदी करणे शक्य नव्हते. आता ते शक्य झाले. त्यामुळे अनिर्बंध खरेदीविक्री वाढण्याचा धोका वाढला. याच भागात प्रचंड मोठ्या प्रमाणात सौरउर्जा प्रकल्प उभारण्याच्या तसेच खाणी खोदण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यासाठी अदानीसारख्या बड्या उद्योगपतींना जमिनी दिल्या जातील अशी भीती निर्माण झाली. त्यामुळे मग लडाखमधील तरुणांनी आंदोलन सुरु केले. लडाख हे स्वतंत्र राज्य व्हावे किंवा लडाखसाठी स्वायत्त मंडळ स्थापन व्हावे अशी त्यांची मुख्य मागणी आहे. शिवाय या राज्याला घटनेच्या सहाव्या परिशिष्टात समाविष्ट करावे, जेणेकरून स्थानिक जनतेच्या संमतीशिवाय कोणतेही प्रकल्प येथे होऊ शकणार नाहीत व बाहेरच्यांना मालमत्ता घेता येणार नाही हीदेखील प्रमुख मागणी आहे. स्थानिक जनतेची भाषा, संस्कृती यांचे जतन करण्यासाठी व स्थानिकांनाच नोकरीत प्राधान्य देण्यासाठीही ते आग्रही आहेत.

### सीमेवरचा धोका

आजवर लडाखमधील आंदोलन कायमच शांततेने झाले आहे. आंदोलकांचे तरुण नेते सोनम वांगचूक यांनी यापूर्वीही प्रदीर्घ काळ उपोषणे केली होती. मात्र त्यावेळी कधीही हिंसाचार झालेला नाही. वांगचूक यांनी दिल्लीपर्यंत एक यात्राही काढली व दिल्लीकरांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र केंद्र सरकारने त्यांना कायमच अनुल्लेखाने मारण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याशी आपण चर्चा करणार नाही अशी भूमिका घेतली. पूर्वी लडाखमधील बौध्द समाज व कारगीलमधील मुस्लिम यांच्यात काही तात्विक मतभेद होते. पण आता या आंदोलनात ते दोन्ही समाज एकदिलाने लढत आहेत. अशा वेळी केंद्राने त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीने व गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. आंदोलनाला परकीय मदत आहे किंवा त्यांना काँग्रेसची फूस आहे असली कारणे देऊन आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न झाला तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. काश्मिरात निवडणुका झाल्या असल्या तरीही तिथली स्थिती पूर्णपणे निवळलेली नाही. ते राज्य लष्कराच्या अमलाखाली असल्यासारखेच आहे. पंजाबमध्येही खलिस्तानवादी गट अधूनमधून निषेधाचा आवाज काढत असतात. तिकडे मणिपूरमध्ये बहुसंख्यांक मैतेई समाजाला पाठीशी घालून कुकी-झो आदिवासींची गळचेपी करण्याचे धोरण भाजपने स्वीकारले आहे. त्याचा परिणाम म्हणून मणिपूरमध्ये यादवी माजली असून हे लोक एकमेकांच्या प्रदेशात जाऊ शकत नाहीत. मोदींचा अहंकार तिथेही दिसला होता. त्यांनी दोन वर्षे हट्टाने या राज्यात जाण्याचे टाळले. त्यानंतर मध्यंतरी ते तेथे गेले. पण त्यानंतर तेथे मोठा हिंसाचार झाला व चार सैनिकांना मारण्यात आले. थोडक्यात या स्थितीचा केव्हाही भडका उडेल अशी अवस्था आहे. सीमेवरची ही सर्व राज्ये अशांत असताना आता लडाख हे राज्यही त्याच दिशेने जाण्याची भीती आहे. तसे झाल्यास ते पूर्णपणे मोदी सरकारचे पाप असेल. सोनम वांगचूक यांच्या वक्तव्यांमुळेच हिंसाचार उफाळला असे केंद्राचे म्हणणे आहे. वांगचूक यांनी हिंसाचाराचा निषेध केला असून आपले आंदोलन मागे घेतले आहे. त्याचा आदर करून केंद्राने त्यांच्याशी तसेच इतर नेत्यांशी चर्चा करायला हवी. केंद्राने यापूर्वी आसाम व इशान्येतील काही भागांमध्ये स्वायत्त मंडळे वा परिषदा स्थापन केल्या आहेत. त्या धर्तीवर लडाखमध्येही हे करणे शक्य आहे. अन्यथा, सीमेवरचे आणखी एक राज्य अशांत होईल व ते परवडणारे नसेल.

---

**विचार**

# कार्की आव्हान पेलणार?

*नेपाळच्या हंगामी पंतप्रधान म्हणून सुशीला कार्की यांच्यापुढे मोठे आव्हान उभे असणार आहे. त्यांच्या सरकारमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता किंवा पदाधिकारी असू नये, अशी अट 'जनरेशन झेड' या संघटनेने घातली. नव्या सरकारमध्ये जनरन झेड सहभागी होणार नाही पण सल्लागार गट म्हणून भूमिका बजावणार आहे. अशा परिस्थितीत अवघा देश पुन्हा उभा करण्याचे आव्हान त्यांना पेलावे लागणार आहे.*



**डॉ. सुकृत खांडेकर**

भारताचा शेजारी देश असलेल्या नेपाळमधे 'जनरेशन झेड' या बॅनरखाली युवाशक्तीने क्रांती घडवली. भ्रष्टाचार, बेकारी, महागाई, घराणेशाही आणि राज्यकर्त्यांचे विलासी जीवन या विरोधात लक्षावधी युवकांनी रस्त्यावर येऊन प्रक्षोभ प्रकट केला. जाळपोळ, हिंसाचार, रस्ता रोको, लुटमार, अशा घटनांनी पाच दिवस नेपाळ धगधगत होते, अखेर पंतप्रधान के. पी शर्मा ओली यांना राजीनामा देऊन दूर जावे लागले. संतप्त निदर्शकांनी सरकारमधील अनेक मंत्र्यांचा पाठलाग करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. माजी पंतप्रधानांच्या पत्नीला आगीच्या लोळात सोपवण्यापर्यंत दंगलखोरांची मजल गेली. अनेक मंत्र्यांची घरे, पंतप्रधानांचे निवासस्थान, राष्ट्रपतींचे निवासस्थान, संसद भवन, बँका, पंचतारांकीत हॉटेल्सची तोडफोड, जाळपोळ झाली. हजारोंच्या हिंसक जमावापुढे पोलीसही हतबल झाले. अखेर नेपाळमधे सत्तापालट झाला आणि माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांना राष्ट्रपतींनी हंगामी पंतप्रधान म्हणून शपथ दिली. सुशीला कार्की या नेपाळच्या पहिल्या महिला पंतप्रधान आहेत. त्यांनी येत्या सहा महिन्यांमध्ये देशात सार्वत्रिक निवडणुका घेण्याची घोषणा केली आहे. नेपाळच्या इतिहासात युवाशक्तीने केलेल्या क्रांतीतून प्रथमच सत्तापालट घडवला गेला. अर्थात या सर्व घडामोडी मागे सरल्यानंतर आता नेपाळमध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याचे आणि सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचे आव्हान हंगामी सरकारपुढे आहे. हे आव्हान कार्की आणि सत्तेतले इतरेजन कसे पेलतात आणि त्याचा भारत-नेपाळ संबंधांवर काय परिणाम होतो, हे येत्या काळात पहावे लागणार आहे.

सत्ताबदलानंतर हंगामी पंतप्रधान म्हणून सुशीला कार्की यांचे नाव पुढे आले तेव्हा सर्वांना आश्चर्यच वाटले. नेपाळमधील लक्षावधी तरूणाईचे प्रेरणास्थान असलेले बालेन शाह हे पंतप्रधान होतील आणि जनरेशन झेड त्यांच्या नावाला मान्यता देईल, असा सर्वांचा समज होता. पण हंगामी पंतप्रधान होण्यास बालेन शाह राजी नसल्यामुळे सुशीला कार्की यांचे नाव पुढे आले. सुशीला कार्की यांच्या नव्या सरकारमधे कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता किंवा पदाधिकारी असणार नाही, अशी अट 'जनरेशन झेड' या संघटनेने घातली. सुशीला कार्की यांना राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी राष्ट्रपती भवनात शीतल निवास येथे पंतप्रधानपदाची शपथ दिली. जनरेशन झेड च्या निषेध मोर्चाला पाठिंबा देणाऱ्या काठमांडूचे महापौर बालेन शाह यांनीही सुशीला कार्की यांच्या नावाला पाठिंबा दिला. नव्या सरकारमधे जनरेशन झेड सहभागी होणार नाही, पण सल्लागार गट म्हणून भूमिका बजावणार आहे. सुशीला कार्की या ७३ वर्षांच्या आहेत. भारतातील वाराणसीच्या बनारस हिंदू विद्यापीठातून त्यांनी शिक्षण घेतले आहे. त्यांनी त्रिभुवन विद्यापीठातून कायद्याचे शिक्षण घेतले आणि १९७९ मध्ये वकिली सुरू केली. २००६ मध्ये नेपाळच्या संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या मदोसा समितीच्या त्या सदस्या होत्या. २०१६ मध्ये त्या प्रथम कार्यवाहक न्यायाधीश आणि नंतर सरन्यायाधीश झाल्या. पोलिसांच्या नियुक्त्यांमधे झालेल्या राजकीय हस्तक्षेपाच्या विरोधात त्यांनी एक निर्णय दिला. जून २०१७ मध्ये निवृत्तीच्या आधी त्यांच्यावर महाभियोग चालवण्यात आला आणि पदावरून हटवण्यातही आले.

भारताचा सख्खा शेजारी असलेला नेपाळ कम्युनिस्ट विचारप्रणालीच्या अधिन गेल्यापासून या देशात अस्थिरता आणि अशांतता आहे. चीनच्या दबावाखाली आणि प्रभावाखाली नेपाळचा कारभार चालू आहे असे आरोप गेले काही वर्षे उघडपणे केले जात आहेत. देशात राजेशाही संपुष्टात आल्यावर स्थिर सरकार मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील, विकासाला वेग येईल, अशी येथील तरूणाईची अपेक्षा होती. प्रत्यक्षात सरकार बदलले तरी देशात अस्थिरता कायम राहिली आहे. गेल्या सतरा वर्षांमध्ये पंधरा वेळा सरकारे बदलली. राज्यकर्ते म्हणून तीन राजकीय पक्षांचा आलटून पालटून खेळ चालू असल्याचे दिसून आले. या खेळात भ्रष्टाचार तर शिगेला पोहोचला. राज्यकर्त्यांचे आणि राजकीय नेत्यांचे सगेसोयरे आणि परिवारातील लोक विलासी आणि श्रीमंती जीवन जगत आहेत आणि आम जनता मात्र गरीबीशी झुंज देऊन लढत आहे, हे वास्तव आहे. गरीब जनतेला दोन वेळा जेवायला पुरेसे अन्न कमावता येत नाही आणि नेत्यांची मुले शिक्षणाला आणि मौजमजा करायला विदेशात जात आहेत, अशा पोस्ट सोशल मिडियावर सतत व्हायरल होत असतात. नेपाळमध्ये रोजगार नाही म्हणून रोज नेपाळी तरूणांचे लोंढे अन्य देशांमध्ये जात आहेत आणि राजकीय पुढाऱ्यांची मुले पंचतारांकीत जीवनशैलीत रममाण आहेत. यातून तरूणांमध्ये असंतोष वाढला आणि गेल्या आठवड्यात तो आक्रोश नेपाळमधील रस्त्यांवर प्रकट झाला. हे वास्तव असतानाही भारताने आणि अमेरिकेने देशातील तरूणांना कम्युनिस्ट सरकारच्या विरोधात उचकावले असल्याच्याही बातम्या पेरल्या गेल्या. पण सत्तापालट झाल्याशिवाय आंदोलन थांबण्याची चिन्हे दिसेनात तेव्हा के. पी. शर्मा ओली यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. माजी पंतप्रधान शेरबहादूर देऊबा यांच्या घरात घुसून निदर्शकांनी आग लावली. या हिंसेमध्ये त्यांच्या पत्नी होरपळल्या. नेपाळमध्ये हिंसाचार आणि अराजकतेने टोक गाठल्याचे हे उदाहरण आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या जमावावर पोलिसांनी गोळाबीर केला, त्यात पन्नासहून अधिक तरूणांचा बळी गेला तर बाराशेहून अधिकजण जखमी झाले. फेसबुक, इंस्टाग्रामसह देशातील २६ सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्सवर ओली सरकारने बंदी घालून तरूणांच्या रोषाचा आग्या मोहोळ आपल्या अंगावर ओढवून घेतला. निदर्शकांकडून दिवसा ढवळ्या सरकारी संपत्तीची राख रांगोळी होत असताना मंत्र्यांना अंगावरच्या कपड्यांनिशी पळ काढावा लागला, यापेक्षा दुर्दैव कोणते असू शकते? काठमांडुतील रस्त्यावर उतरलेल्या तरूणांच्या जमावाने राष्ट्रपती भवन किवा पंतप्रधान कार्यालयाचा ताबा घेतला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे राष्ट्रपतींना घाई करून नवे हंगामी सरकार स्थापन करणे भाग पडले. रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात आंदोलन करणारे युवक हे सर्व पंधरा ते तीस वयोगटातील होते. विशेष म्हणजे शाळेतील हजारो मुले मुली शालेय युनिफॉर्ममध्ये पाठिवर दप्तर घेऊन रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात घोषणा देत होते. हजारो तरूण आणि विद्यार्थी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतात तिथे सरकार टिकत नाही, हा आजवरचा जगभरातला अनुभव आहे. तोच अनुभव काठमांडूतील आंदोलनातून जगाला पहायला मिळाला. तीन कोटी लोकसंख्येच्या नेपाळमध्ये १५ ते ३० वयोगटातील युवाशक्ती ३५ टक्क्यांहून अधिक आहे. त्यामुळे त्यांच्या भावनांकडे आणि मागण्यांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याच सरकारला परवडणारे नाही. भ्रष्टाचाराने कळस गाठला असताना आणि त्याविरोधात तरूणाईमध्ये असंतोष खदखदत असताना ओली सरकारने इंटरनेट बंद करून आगीत तेल ओतण्याचे काम केले. जनरेशन झेडच्या आंदोलनामागे कोणी नेता नव्हता. काठमांडुतील आंदोलन नेपाळमधील ७७ जिल्ह्यांमध्ये पसरले, पण त्याचे नेतृत्व करणारा कोणी एक चेहरा नव्हता. भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि महागाईच्या खाईत सापडलेल्या नेपाळमधील संतप्त तरूणाईचा आक्रोश रस्त्यावर दिसला. जे बांगलादेश, श्रीलंकामध्ये घडले, तसाच उद्रेक नेपाळमध्ये बघायला मिळाला. बांगलादेशमध्ये उठाव झाल्यानंतर शेख हसीना यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन पळ काढावा लागला. तेथे मोहमंद युनूस हंगामी सरकार चालवत आहेत. नेपाळमध्ये के. पी. शर्मा ओली यांना राजीनामा देऊन पायउतार व्हावे लागले. आता नेपाळमधे शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करणे हे देशाच्या पहिल्या महिला कारभारी सुशीला कार्की यांच्यापुढील मोठे आव्हान आहे. नेपाळमधील घडामोडींवर भारत, चीन व अमेरिकेचे बारीक लक्ष आहे. मात्र एखादे राष्ट्र अशा प्रकारे अडचणीत आणण्याची आणि राजवट उलथवून टाकण्याची खेळी जगात सतत खेळली जात आहे, याची गंभीर नोंद जगाने घ्यायला हवी.

---

**चर्चा आजची**

## नवरात्रीचे बाजारीकरण



**वैभव पाटील**

सण-उत्सव हे आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. परंपरेने चालत आलेले ह्या उत्सवाचे स्वरूप आजच्या घडीला बदलले असले तरी पूर्णतः ते संपुष्टात आलेले नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते संक्रमित होत आलेले आहे. पूर्वापार चालत आलेल्या या उत्सवांनी मानवी जीवनाला संजीवनी देण्याचे काम केलेले आहे. मानवी नाते-संबंध, आपुलकी, जिव्हाळा, कृतज्ञता, संवेदनशीलता यांना खतपाणी घालण्याचे काम सण-उत्सव करीत आले आहे. शारीरिक, मानसिक, वैचारिक, बौद्धिक या घटकांचे पोषण करणारे असे होते. मनोरंजनाचा व करमणुकीचा भाग जरी त्यात असला तरी आचार-विचारांनी उत्तम पिढ्या घडवण्याचे कार्य हे उत्सव करीत असत. समाजात जे-जे म्हणून चांगले आहे, ते सगळ्यांपर्यंत पोहोचवणे आणि समाजातील वाईट, चुकीचे जे आहे त्यावर बोट ठेवून निषेध करणे म्हणजे एकप्रकारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य या उत्सवांनी केले आहे. आदिशक्ती तू आदिमाया असं म्हणत नवरात्रीमध्ये स्त्रीशक्तीची पूजा केली जाते. उत्सवांचे मूळ उद्देश समाजामधे जागृती होऊन विधायक विचार वाढीस लागावा हा आहे.

मात्र, या देवीच्या विसर्जन मिरवणूकीत पूर्वी गरबा या नृत्याच्या वेळी देवीची, गीतेच म्हटली जात असत. आज या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आले आहे. चित्रपटांतील गीतांच्या तालावर अश्लील अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. गरब्याच्या निमित्ताने व्यभिचारही होतो. पूजास्थळी तंबाखू सेवन, मद्यपान, ध्वनीप्रदूषण इत्यादी प्रकारही घडतात. सात्विक रित्या सण उत्सव आजही खूप ठिकाणी साजरे होतात पण हे विभित्स चित्र दिसणार असेल तर त्या देवीच्या ही मनातही आपण या प्रवृत्तीचा संहार करावा हेही नक्की येत असेल.


या पडद्यासमोरचे चित्र असले तरी तरूणाई स्वैर का होते आहे. या पाठीमागील खऱ्या कारणांचा शोध घेणं गरजेचं आहे. त्यांच्या क्रयशक्तीचा विधायक कामांसाठी कुटुंबासाठी, समाजासाठी होण्यासाठी वैचारीक परिवर्तन घडविण्याचे व दिशा देण्याचे काम समाजातील मान्यवर जबाबदार अनुभवी व्यक्तींचे आहे हे मात्र निश्चित. प्रत्येक उत्सवामागे समता, बंधुता दडलेली असते. तुम्ही जर शोधली तर ती तुम्हाला सापडतील. परंतु आपण मात्र आजच्या घडीला त्याला केवळ करमणुकीचे साधन म्हणून पाहत आहोत आणि इच्छांची पोळी त्यावर भाजत आहोत. आधीच्या उत्सवाचे संस्कार वातावरण जाऊन त्याची जागा चंगळवादी वृत्ती आणि प्रदूषणाने घेतली. ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण फार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्यातून आरोग्याला धोका पोहोचू लागला. वाट्टेल तसे भले मोठे मंडप घालणे, लायटिंग करणे, मोठ्या आवाजात लाऊड स्पीकर लावणे हे तर नित्याचेच होऊन बसले. म्हणजे खरे तर देव असे म्हणत नाही की असा अवाजवी खर्च करून आमचे स्वागत करा;पण लोकांनी देवालाही स्पर्धेत उतरवले. कुठल्या मंडळाची सजावट चांगली त्यावर क्रमांक दिल्या गेले. पण असे करून देव थोडाच प्रसन्न होणार आहे. त्याला तर मनोभावे केलेला नमस्कारही पोहोचतो. खोट्या दिखाव्याची त्याला आवश्यकता नाही. म्हणजे इथे सुद्धा मानवाने आपल्या इच्छा,अपेक्षा त्याच्यावर लादल्या पण कायम देवाकडे काही मागण्यापेक्षा आपल्याला दाता ही होता आले पाहिजे. समजला,नव्या घडणाऱ्या पिढीला आपल्याकडून जितके म्हणून काही चांगले देता येईल असे आपण वागले पाहिजे. ज्ञानात, बुद्धीत भर पाडणाऱ्या संस्कारक्षम स्पर्धा आपण आयोजित केल्या पाहिजेत. त्यांच्यात दडलेल्या सुप्त गुणांना वाव मिळेल. आणि हसत-खेळत आनंदी वातावरणाची निर्मिती करून अगदी सहजरित्या आपण त्यांना बोधामृत देऊ शकू, असे काहीतरी करायला हवे. आजची एकंदरीत सामाजिक स्थिती पाहता ती बदलण्यासाठी व त्याच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी खरे तर उत्सवांचे आयोजन असते. हीच त्यामागील प्रमुख भूमिका व उद्दिष्ट होय. परंतु निरर्थक असे वेळ वाया घालवणाऱ्या कर्यक्रमांचे प्रस्थ हल्ली खूप वाढल्याचे आपल्याला दिसून येईल. घरगुती अगदी साध्या पद्धतीने साजरे केले जाणाऱ्या उत्सवांना आपण उगाच मोठे स्वरूप दिले. परंतु दिखाव्याने उद्दिष्ट साध्य होत नाही;त्याकरिता कृतीला विचारांची जोड हवी. अजूनही वेळ गेलेली नाही आपण जर ठरवले तर आपली उत्सवांची ही संस्कृती जपू शकू व तिचे संवर्धन करण्यास शिकले पाहिजे.

---

**लोकसंसद**

### साहित्यातील महानायक हरपला

साहित्य विश्वातील एक अनमोल रत्न, ज्येष्ठ कन्नड कादंबरीकार, तत्त्वज्ञ, तर्कशुद्ध विचारवंत व पटकथालेखक एस. एल. भैरप्पा यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय साहित्यविश्वाने एक महानायक गमावला आहे. १९३० साली कर्नाटकमधील हसन येथे जन्मलेले भैरप्पा यांनी लहानपणापासूनच साहित्याची गोडी जोपासली. शिक्षण पूर्ण करून त्यांनी लेखनक्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९५८ मध्ये प्रकाशित झालेल्या भीमकाया या पहिल्या कादंबरीपासून ते



कन्नड साहित्याच्या विश्वात झपाट्याने उंचावले. पुढे २५ हून अधिक कादंबऱ्या त्यांच्या नावावर जमा झाल्या. त्यांच्या पर्व, आवरण, नायी नेरळू, वंशवृक्ष, तंतु यांसारख्या कादंबऱ्यांनी केवळ कन्नड वाचकच नाही, तर देशभरातील वाचकवर्गाला भुरळ घातली. त्यांच्या लेखनातील तत्त्वचिंतन, इतिहासाशी असलेले भान, सामाजिक प्रश्नांना भिडणारी शैली आणि मानवी मनाचे सूक्ष्म विश्लेषण ही वैशिष्ट्ये आजही वाचकांच्या मनावर कोरलेली आहेत. त्यांच्या अनेक साहित्यकृतींचे इंग्रजी, हिंदीसह इतर भारतीय भाषांमध्ये भाषांतर झाले. त्यांचे विचार व त्यांचे लेखन संपूर्ण भारतभर आणि परदेशातही पोहोचले. त्यांच्या कादंबऱ्यांवर आधारित काही चित्रपटही तयार झाले, साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना अनेक मानाचे पुरस्कार देण्यात आले. २०१५ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार, २०१६ मध्ये पद्मश्री आणि २०२३ मध्ये पद्मभूषण असे मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले. साहित्यविश्वाच्या दृष्टीने त्यांचे निधन ही केवळ एका लेखकाची हानी नाही, तर विचार, संस्कृती आणि इतिहासाशी निगडित एका समृद्ध परंपरेचा निरोप आहे. भैरप्पा यांचे लेखन, त्यांची तत्त्वचिंतनशील शैली आणि भारताच्या सामाजिक-ऐतिहासिक जाणिवा युगानुयुगे प्रेरणादायी ठरत राहतील. साहित्य विश्वातील महानायक एस एल भैरप्पा यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

---

**दिनविशेष**

## जागतिक पर्यटन दिन

हिरवा निसर्ग, गर्द झाडी, निळशार समुद्र आणि मस्त भटकंतीहे शब्द कानावर पडले तरी आपल्यातील अनेक जण फिरण्याचे प्लॅनिंग करण्यास सुरुवात करतात. वर्षभरातून एकदा तरी माथेरान, महाबळेश्वर, गोवा ते थेट लडाखपर्यंतचे एखादा प्लॅन हा ठरलेला असतो. आज २७ सप्टेंबर म्हणजेच जागतिक पर्यटन दिन..जगभरात हा दिवस जागतिक पर्यटन दिवस म्हणून साजरा केला जातो.

जगातील बहुतेक देशांमध्ये २७ सप्टेंबर रोजी जागतिक पर्यटन दिन साजरा केला जातो. पण भारतात २५ जानेवारीला हा दिन साजरा करतात. भारतामध्ये पर्यटन दिन साजरा करण्याची सुरुवात स्वातंत्र्यानंतरच्या पुढच्या वर्षी म्हणजेच १९४८ मध्ये सुरू झाली. त्यासाठी वाहतूक समिती स्थापन करण्यात आली. समितीच्या स्थापनेनंतर ३ वर्षांनी म्हणजेच १९५१ मध्ये कोलकाता आणि चेन्नईमध्ये पर्यटन दिनाची प्रादेशिक कार्यालये सुरू झाली. यानंतर दिल्ली, मुंबई आणि कोलकाता येथेही पर्यटन कार्यालये निर्माण करण्यात आली आणि १९९८ मध्ये पर्यटन आणि दळणवळण मंत्री यांच्या नेतृत्वाखाली पर्यटन विभागाची स्थापना करण्यात आली.

भारत हा असा देश आहे जिथे २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. अनेक सुंदर ठिकाणे पाहण्याची आणि संस्कृती, विविध भाषा, बोली आणि संस्कृती आणि परंपरा जाणून घेण्याची संधी या ठिकाणी निर्माण होते. धार्मिक स्थळे आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणांबरोबरच तुम्हाला सुंदर पर्वतरांगा, वाळवंट, बर्फाच्छादित ठिकाणं, समुद्रकिनारे, जंगल यांची विविधता पाहण्याची संधी मिळते. या दिनाचं महत्त्व समजून घेऊन प्रत्येकाने पर्यटन नक्की करावं. राष्ट्रीय पर्यटन दिनाचा मुख्य उद्देश भारतीय पर्यटन स्थळांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना जागतिक स्तरावर आणणे हा आहे. पर्यटन हा प्रमुख उद्योग असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे म्हटले जाते. या कामात राष्ट्रीय पर्यटन दिन महत्त्वाची भूमिका बजावतो. या दिवसाच्या माध्यमातून लोकांना जागतिक स्तरावर पर्यटनाचे सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक मूल्य किती आहे, याची जाणीव करून देणं गरजेचं आहे.

जागतिक पर्यटन दिन हा अत्यंत महत्त्वाचा आहे कारण तो मानवी जीवनाच्या विविध पैलूंमध्ये पर्यटनाची भूमिका अधोरेखित करतो. प्रथम, तो सांस्कृतिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन देतो, वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील लोकांना एकत्र येऊन एकमेकांकडून शिकण्यास प्रोत्साहित करतो. दुसरे म्हणजे, तो रोजगाराच्या संधी निर्माण करून आणि स्थानिक व्यवसायांना चालना देऊन आर्थिक वाढ वाढवतो. याव्यतिरिक्त, पर्यटन पर्यावरणीय जागरूकता निर्माण करते आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आपल्या ग्रहाचे रक्षण करण्यासाठी शाश्वत पर्यटन पद्धतींचे महत्त्व अधोरेखित करते. भारतात पर्यटनाचे महत्त्व आणि भारतीय अर्थव्यवस्थेत त्याची भूमिका याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी, तसेच लोकांना शिक्षित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस आपल्या प्रत्येकासाठी खूप गरजेचा आहे. कारण आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण इतके व्यस्त झालो आहोत की यामध्ये स्वत:साठी वेळ देणे, कुठेतरी फिरायला जाणं, निवांत बसणं, निसर्गाचं सौंदर्य पाहणं हे आपण विसरत चाललो आहोत. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपल्या मौल्यवान वेळेत थोडा वेळ शोधून काढला पाहिजे जेणेकरून तो आपल्या कुटुंबासह, मित्रांसह, नातेवाईकांसह आपल्या देशात किंवा इतर कोणत्याही ठिकाणी प्रवास करू शकेल. एखाद्या विशिष्ट ठिकाणी असणारे नैसर्गिक सौंदर्य आणि तेथील इतिहास जाणून घेण्यासाठी तेथील संस्कृती पाहण्यासाठी देशातील विविध भागातून पर्यटकांनी यावे हा पर्यटनाचा मुख्य हेतू असतो. आपल्याला आलेला थकवा, मनातील दुःख,आजार घालवण्याचे सर्वात स्वस्त आणि सुलभ माध्यम म्हणजे पर्यटन होय. यासाठी कोठेही फिरायला जा अगदी स्वतःच्या घराशेजारी असणारे डोंगरदऱ्या या ठिकाणीं निसर्गरम्य परिसरात गेले तरी अगदी मन ताजे तावाने होऊन सर्व दुःख माणूस विसरून जातो.

# पाण्यासाठी शेतकरी एकवटले

**। खांब । प्रतिनिधी ।**

गेली अनेक वर्षे कुंडलिकेच्या सिंचनातून कोलाड पाटबंधारे विभागाच्या वतीने उजवातीर, डावेतीर कालवे दुरुस्तीच्या नावाखाली अद्याप रडकथेत आहेत. त्यामुळे गेली दहा वर्ष खांब धामणसई परिसरातील उजवातीर तर आंबेवाडी निवीचा डावातीर या कालव्यांना पाणी येत नसल्याने उन्हाळी भातशेती भिजत नाहीत. अनेक वर्ष शेतकरी ग्रामस्थ प्रामुख्याने पाण्याची मागणी करतात. मात्र, त्याकडे बंधारे खाते दुर्लक्ष करत कानाडोळा करत आहेत. त्यामुळे आता तालुक्यातील शेतकरी चांगलेच आक्रमक झाले आहेत. सर्वत्र गावोगावी बैठकी सुरू झाल्या असून यासाठी लवकरच याबाबत पाठ बंधारे खात्याला निवेदन देण्यासाठी सक्रिय भूमिकेत आहेत.



शेतीच्या पाण्यासाठी खांब देवकान्हे धामणसई विभागातील शेतकरी आता चांगलेच आक्रमक झाले आहेत. डोळवहाल सिंचनातून उजवा तिर कालव्याला येत्या डिसेंबरपर्यंत पाणी द्या, सबब ऐकली जाणार नाही. तसेच नोव्हेंबर अखेरपर्यंत कालव्याची उर्वरित दुरुस्ती तसेच गाळ काढण्यात यावा, याबाबत कोलाड पाठबंधारे खात्याला ईशारा देत उपभियंता यांना धामणसई पिंगलसई भागातील शेतकऱ्यांनी निवेदन दिले. त्या पाठोपाठ खांब परिसरातील तळवली, चिल्हे, धानकान्हे, देवकान्हे येथील सर्व शेतकरी एकत्रित येत पाण्याच्या मागणीसाठी निवेदन देणार आहेत.

## पाठबंधारे खात्याची नकारात्मक भूमिका

रोहा तालुक्यातील खांब देवकान्हे धामणसई या विभागातील शेतकऱ्यांना कालवा दुरुस्तीच्या नावाखाली डोळवहाल सिंचनातून कोलाड पाटबंधारे विभाग गेली अनेक वर्ष पाणी देत नाही. तसेच त्याची दुरुस्तीही केली आहे. मात्र, येथील शेतकऱ्यांना पाणी देण्यास पाठबंधारे खात्याची नकारात्मक भूमिका असल्याने या अनुषंगाने शेतकरी आता चांगलेच आक्रमक झाले आहेत.

## • पाटबंधारे खात्याला देणार निवेदन

केंद्र सरकारने जारी केलेल्या वन पर्यावरण संवेदनशील क्षेत्र इको सिन्स्विटी झोन हटाव या विरोधात येथील शेतकरी संघटनात्मक एकत्रित येऊन काम करत आहेत. दुबार भातपीक घेण्यासाठी कालव्याला पाणीपुरवठा करावा. यासाठी खांब विभागातील तळवली, चिल्हे, धानकान्हे, देवकान्हे येथील शेतकरी कालव्याला पाणी घेण्यासाठी आग्रही आहेत. याबाबत धानकान्हे येथे येथील शेतकऱ्यांची सभा नुकतीच पार पडली. यात सर्वानुमते ठरविण्यात आले आहे. यावेळी या भागातील बहुसंख्येने शेतकरी तसेच शेतकरी आदिवासी बांधव उपस्थित होते.

---

## कवीचा वैकल्पिक संसार स्वातंत्र्य, समता, बंधुतावर आधारितः कवी कुमार अंबुज

# कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार सोहळा

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्य, समता, बंधुता आधारित कवीचा एक वेगळा वैकल्पिक संसार असतो. मात्र प्रत्यक्ष जीवनातील वास्तव व सुखापेक्षा दुखामुळे अधिक निर्मित त्याचे साहित्य हे अधिक प्रासंगिक व भावणारे असते. अशा कवीनेदेखील नेहमी विषमतेकडे लक्ष वेधत कुठल्याही सत्तेपेक्षा विरोधी बाकावर बसणे सभ्य व अभिरुचीपूर्ण समाजाच्या हिताचे असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ हिंदी कवी कुमार अंबुज यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे दिला जाणारा १३ वा 'कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार-२०२४' कवी कुमार अंबुज यांना येथील कुसुमाग्रज स्मारकाच्या विशाखा सभागृहात प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.



यावेळीव्यासपीठावरकार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, निवड समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत पाटील, कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, वित्त अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे आदी उपस्थित होते.

कवी कुमार अंबुज पुढे म्हणाले की, कवी कुसुमाग्रज यांच्या नावाने त्यांच्याच भूमीत पुरस्कार मिळणे हे आपल्यासाठी गौरवास्पद असल्याचेदेखील ते म्हणाले.

मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की, 'जे खळांची व्यंकटी सांडो' असे मानवतावादी लिखाण करणारे संत ज्ञानेश्वर यांच्या शृंखलेतील लिखान आपणास कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्यात दिसून येते. तीच परंपरा कवी कुमार अंबुज पुढे नेत असल्याचे बघावयास मिळत आहे, असे गौरवोद्गार काढले. प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी कवीची निर्मिती ही सृजनात्मक शब्दरचनेसोबत उपदेशात्मक देखील असल्याचे सांगितले.

यावेळी कवी कुमार अंबुज यांच्या निवडक कवितांचा मराठी अनुवादासह संग्रह असलेल्या व विद्यापीठ निर्मित पुस्तिकेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

---

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२७ सप्टेंबर**

१) श्री.भारतनंदन काशिनाथ राणे, रेवस रोड, अलिबाग
२७-९-१९४६

श्री.मधुकर दत्तात्रेय देवळे
मु.पो नांगाव, अलिबाग
२७-९-१९५३

## नामस्मरण दुय्यम महत्त्व

एक कीर्तन कार आपल्या कीर्तनात म्हणाले भक्तगणांनो, यज्ञयाग करणे जरी तुम्हाला करता आली नाही त तर निदान देवाचे नाव तरी मुखाने घ्या किर्तन संपल्यानंतर एका देव भक्तांने त्यांना विचारले, निदान देवाचे नाव घ्यावे म्हणजे काय? यज्ञयाग इत्यादी साधने करता आली तर प्रभू नामाची गरज नाही असे आपल्याला म्हणायचे आहे का? काहीच जमत नसेल तर निदान हरिनाम तरी घ्या असे म्हणून आपण राम नामाची अवहेलना का केलीत?

**सद्‌गुरू स्वामी**

नामस्मरण घेता येत नसेल नाम घेण्याचा कंटाळा येत असेल नामस्मरण करताना जांभया येत असतील नामस्मरणाचा आळस येत असेल तर आपल्याकडे पूर्व पुण्याची जोडच नाही असे सम जावे देवाची सहस्त्र जन्म सेवा केल्याचे फळ म्हणजे प्रभूनाम प्रीती नाना प्रकारच्या तपश्चर्या करून जर काही मिळवायचे असेल किंवा काही मिळत असेल तर ते हरी नामच

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

---

## निवडक



### मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**रसायनी** : मोहोपाडा येथील अचानक कला क्रीडा मंडळ, श्री गणेश युवक मंडळ, आरोग्य विभाग रायगड जि. परिषद व लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे मोहोपाडा आरोग्य उपकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा येथील शिवसेना शाखा व अचानक क्रीडा मंडळ आयोजित नवरात्री उत्सवात मुख्य बाजारपेठ शिवाजी चौकात शुक्रवारी (दि.२६) 'स्वस्थ नारी-सशक्त परिवार' अंतर्गत आरोग्य तपासणी शिबीर पार पडले. या शिबिरात महिलांची रक्तदाब, रक्तशर्करा, हिमोग्लोबिन, गर्भाशय व स्तनाच्या कर्करोगाची प्राथमिक तपासणी करण्यात आली. यात एकूण ४५हून अधिक महिला व पुरूष नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.



### हाफिजखार येथे जमीन मोजणी मोहीम

**कोर्लई** : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत दि. १७ सप्टेंबर ते दि. ०२ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवाडा अभियान राबविण्यात येत आहे. त्याचाच भाग असलेल्या सर्वांसाठी घरे या मोहिमेअंतर्गत शासकीय जमिनीवरील अतिक्रमित घरे नियमबद्ध करण्याच्या दृष्टीने मुरुड तालुक्यातील आगरदांडा -हाफिजखार येथे जमीन मोजणी मोहीम राबविण्यात आली. उपअधिक्षक भूमिअभिलेख (मुरुड) विनोद काळे, सर्वेअर सचिन घाडगे व प्रकाश भला यांनी ग्रामस्थांच्या उपस्थितीत शासकीय जमीनीवरील अतिक्रमित घरे नियमबद्ध करण्यासाठी जमीन मोजणी मोहीम राबविण्यात आली. यावेळी आर्पेश चिंदरकर, जयेश भाटकर, संतोष कातकर, प्रवीण भाटकर व बबन चिंदरकर उपस्थित होते. या मोहिमेमुळे घरे नियमबद्ध करण्यास मोठा लाभ होणार असून शासनाचा उपक्रम यशस्वी ठरणार आहे, अशी भावना उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली.



### शिष्यवृत्ती परीक्षा गुणगौरव सोहळा

**माणगाव** : रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित गणित संबोध शिष्यवृत्ती परीक्षा गुणगौरव सोहळा अशोकदादा साबळे विद्यालयामध्ये सोमवारी (दि.२२) मोठ्या उत्साहात साजरा झाला. विषेश म्हणजे जिल्ह्यातून तिसऱ्या क्रमांकावर माणगाव तालुक्याची उपक्रमशील तालुका म्हणून निवड झाली आहे. सर्व क्षेत्रात क्रियाशील व्यक्तिमत्व असणाऱ्या माणगाव तालुक्याच्या उपाध्यक्षा नेहा सतिश केकाणे यांचा उपक्रमशील शिक्षिका म्हणून मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय आणि शालेय स्तरावरील यशस्वी विद्यार्थ्यांचे सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले. तसेच उपक्रमशील शाळा ना.म. जोशी विद्याभवन गोरेगाव आणि एस. एस. निकम स्कूल माणगाव या दोन शाळांचाही सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

### दिव्यांग व्यक्तींना व्हीलचेअरची मदत



**नेरळ** : कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागासाठी सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट यांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील आसलपाडा येथील दिव्यांग व्यक्तींना व्हीलचेअरची मदत करण्यात आली. आसल पाडा या गावातील दिव्यांग असलेल्या सरस्वती शेंडे यांना श्री साई ट्रस्टकडून व्हीलचेअर तर वामन शेंडे यांच्यासाठी ट्रायसिकलची मदत करण्यात आली. यावेळी श्री साई ट्रस्टच्या संचालिका राधिका घुले, माणगावतर्फे वरेडी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले तसेच स्थानिक ग्रामस्थ संतोष शेंडे, हे उपस्थित होते. श्री साई ट्रस्टकडून शेंडे कुटुंबाच्या घरी जाऊन ही मदत वाटप करण्यात आली.

### प्रिया पवार यांचा सत्कार

**कोलाड** : राजिप शाळा संभे येथील मुख्यध्यापिका प्रिया आशिष पवार यांना रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. अलिबाग यांच्याकडून रोहा तालुक्यातून आदर्श व गुणवंत पुरस्काराने नुकताच गौरविण्यात आले. या निमित्ताने संभे ग्रामस्थ व पालकांनी मिळून शाळेच्या मुख्यध्यापिका प्रिया आशिष पवार यांचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी संभे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच राजेश्री सानप, तंटामुक्ती अध्यक्ष पांडुरंग सानप, रायगड भूषण हभप नारायण दहिंबेकर, पोलीस पाटील अनंत सानप, माजी सरपंच विजया सानप, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा जुईली दहिंबेकर व सर्व सदस्य तसेच अंगणवाडी सेविका संगीता सानप, असंख्य ग्रामस्थ, पालक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या उपशिक्षिका रेश्मा जमादार यांनी केले. तसेच या निमित्ताने संभे ग्रामपंचायतीचे तंटामुक्ती अध्यक्ष पांडुरंग सानप यांचा शाल श्रीफळ देऊन शाळेतर्फे ग्रामस्थांच्या व पालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

---

पान १ वरून

## स्थानिकांसाठी छावाचा एल्गार

इतक्या स्थानिक कामगारांची भरती केली जाते. त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. कामाच्या तासामध्ये १२ ते १४ तासांची बेकायदेशीर वाढ करून स्थानिक कामगारांना वेठीस धरले जात आहे. अत्यल्प वेतन, पीएफ, वैद्यकीय सुविधांचा अभाव, सुरक्षित कामकाजाच्या मानकांचे पालन न करणे. कायद्याच्या विरोधात अल्पवयीन कामगारांचा वापर या सारख्या बाबींचा मोठ्या प्रमाणात भंग होत आहे. कंपनी प्रशासन, उद्योग विभागाला वारंवापर लेखी व तोंडी तक्रारी करण्यात आल्या आहेत. तरीदेखील कारवाई करण्यात आली नाही. स्थानिकांना रोजगार देण्याबाबत साजगांव, आत्तरगांव व होनाड ग्रामपंचायतींनी ठराव मंजूर केला आहे. त्याची माहिती कंपन्यांना दिली आहे. तरीसुध्दा प्रशासन व कंपन्यांकडून दुर्लक्षच केले जात असल्याचा आरोप छावा क्रांतीवीर सामाजिक संस्था व रायगड जिल्हा कामगार संघटनेच्यावतीने करण्यात आला आहे.

अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संघटनेमार्फत शुक्रवारी दुपारी निदर्शने केली. यावेळी कंपनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणा देत स्थानिकांना न्याय द्या अशी मागणी केली. उद्योग कामगार विभागाच्या परित्रकानुसार, स्थानिक युवकांना ८० टक्के रोजगार देण्यात यावा. सर्व कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन, पीएफ, ईएसआय, वैद्यकीय सुविधा, कामाचे आठ तास निश्चित करावे, अतिरिक्त कामासाठी योग्य ओव्हरटाईम, जेवण, विश्रांतीची सुविधा उपलब्ध करून द्यावी. अल्पवयीन बालकामगारांचा वापर तात्काळ थांबवून संबधित ठेकेदार व कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करावी. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर फौजदारी गून्हे नोंदविण्यात यावे. जिल्हास्तरावर सर्व कंपन्यांची बैठक घेऊन कामगार कायद्याची अंमलबजावणी व तपासणी तात्काळ करावी अशा अनेक मागण्यांसाठी निवेदन देण्यात आले.

**रॅलीतून प्रशासनाचे वेधले लक्ष**

औद्योगिक विकासाच्या नावाखाली होत असलेल्या अन्यायाविरुध्द आण कायद्याची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी तसेच जिल्ह्यातील विशेष करून खालापूर तालुक्यातील कंपन्यांमध्ये स्थानिकांना रोजगार मिळावा, यासाठी छावा क्रांतीवीर सामाजिक संस्थेच्यावतीने हनुमंत भोईर यांच्या नेतृत्वाखाली अलिबागमध्ये रॅली काढण्यात आली. अलिबाग बस स्थानक ते जिल्हाधिकारी अशी ही रॅली निघाली. या रॅलीतून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## शिक्षकांना मिळणार दिलासा

बैठका, कामकाजात वेळ जात असल्याने अध्यापनावर परिणाम होत असल्याचे सांगत राज्यभरातील शिक्षक संघटनांनी समित्यांच्या एकत्रीकरणाची मागणी केली होती. त्यानुसार या समित्यांचे एकत्रीकरण करून शालेय व्यवस्थापन समिती, विद्यार्थी सुरक्षा आणि भौतिक सुविधा विकसन समिती, सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण समिती अशा चार समित्याच ठेवण्याचा निर्णय शिक्षण विभागाने एप्रिलमध्ये घेतला. मात्र, राज्यातील खासगी अनुदानित शाळांतील समित्यांचे अद्याप एकत्रीकरण करण्यात आले नव्हते. त्यामुळे अनुदानित शाळांतील शिक्षकांचे शिक्षण विभागाच्या निर्णयाकडे लक्ष लागले होते.नव्या निर्णयानुसार, खासगी अनुदानित शाळांमध्ये असलेल्या १७ समित्यांचे आता पाच समित्यांमध्ये एकत्रीकरण करण्यात येणार आहे. त्यात शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण समिती, विद्यार्थी सुरक्षा आणि भौतिक सुविधा विकसन समिती, शाळा समिती यांचा समावेश असणार आहे. शाळेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठीच्या शाळा व्यवस्थापन समितीमध्ये १२ ते १६ सदस्यांचा समावेश असेल. त्यातील ७५ टक्के सदस्य पालक असतील.

या सदस्यांची निवड पालक सभेतून करण्यात येईल. उर्वरित सदस्यांमध्ये स्थानिक प्राधिकरणाचे निवडून आलेले प्रतिनिधी, शिक्षक, स्थानिक शिक्षणतज्ज्ञ किंवा बालविकास तज्ज्ञ, मुख्याध्यापक यांचा समावेश असेल. समितीतील ५० टक्के सदस्य महिला असतील. समितीची दर महिन्याला बैठक होईल. समिती दर दोन वर्षांनी नव्याने नियुक्त करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे.विद्यार्थी सुरक्षा आणि भौतिक सुविधा विकसन समितीमध्येही १२ ते १६ सदस्य असणे आवश्यक आहे. या समितीचीही दर दोन वर्षांनी नव्याने नियुक्ती करण्यात येईल. विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती, पायाभूत भौतिक सुविधा उपलब्ध करणे, सीएसआरच्या माध्यमातून भौतिक आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे, शाळेतील तक्रार पेटीतील तक्रारींचा निपटारा करणे अशी समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे.

## आमदार, पालकमंत्र्यांची हकालपट्टी

मंत्री माणिकराव कोकाटे यांनी घेतलेल्या या निर्णयाचा सर्वपक्षीय ३८० आमदार व ३६ पालकमंत्र्यांना फटका बसला आहे. शासनाने पायाभूत क्रीडा सुविधांसाठी २००३ पासून अनुदानाच्या रकमेत वाढ केली. तरीसुद्धा क्रिडा संकुलांची निगा राखली जात नव्हती तसेच तेथे क्रीडापटूंना सुविधाही मिळत नव्हत्या.

आमदार व पालकमंत्री २०२० पासून क्रीडा संकुलाचे अध्यक्ष होते. मात्र त्यांनी अध्यक्ष या नात्याने संकुलांच्या उभारणीकडे पूर्ण दुर्लक्ष केले होते. परिणामी, निधी असूनही प्रस्तावित ९६ संकुलांची जागा क्रीडा विभागाच्या ताब्यात आली नाही. तसेच संकुलांच्या जागेसंदर्भातील न्यायीक वाद निर्माण झाल्याने ३५ संकुले रखडली आहेत. त्यामध्ये ३० तालुका, ३ जिल्हा आणि २ विभागीय संकुलांचा समावेश आहे. म्हणून आमदार व पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील संकुल समितीची पुनर्रचना करावी, असे विभागाचे म्हणणे होते.

## शिंदे गट, अंतर्गत तट?

फलकांमधून आमदारांना डावलण्यात आले आहे. त्यामुळे शिंदे गटात अंतर्गत तट असल्याची चर्चा सध्या सुरु आहे.

अनंत गोंधळी हे आमदार दळवींचे अगदी जवळचे तर सुधीर चेरकर यांना दिलीप भोईर यांच्या जवळचे मानले जाते. वेगवेगळ्या कार्यक्रमात दळवींच्या बाजूला गोंधळी असतात. त्यामुळे आगामी निवडणुकीत गोंधळी कि चेरकर यापैकी कोणाला उमेदवारी दिली जाणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## कांदळवनांचा विनाश

२०१८ च्या आदेशांचे उल्लंघन केले असल्याने या प्रकरणात चौथ्यांदा गुन्हा दाखल करून कठोर कार्यवाही करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

मिळकतखारमधील बहुसंख्य गट नंबर हे सीआरझेड-१ व ३ झोनमध्ये तसेच मनोरंजन व पर्यटन विभागाच्या आराखड्यातील भागात आहेत. त्यामुळे कोणत्याही सरकारी मंजुरीशिवाय बदल करणे बेकायदेशीर आहे. यापूर्वीही तीन वेळा याच प्रकरणात पोलिसांत गुन्हे दाखल आहेत. पण भराव माफीया या गुन्हयांना धूप घालीत नसून पुन्हा नव्याने अनधिकृत भराव व कांदळवन तोड करीत असल्याचे पुरावे छायाचित्रांसह ग्रामस्थांनी सादर केले आहेत.

मिळकतखार, सारळ, बागदांडा, आवळीपाडा, सांगड पाडा, मिळकतखार (मळा) या आसपासच्या गावांना बेकायदेशीर भरावामुळे पावसाळ्यात व भरतीच्या वेळेस जलप्रलयाचा मोठा धोका निर्माण झाला आहे. या पावसाळ्यातच या गावांमध्ये पाणी शिरले होते. स्वतः तहसिलदार यांनी भेट देवनू त्यावेळी पाहणी केली होती. सारळ येथे प्रस्तावित पाणीपुरवठा प्रकल्प आणि नदी पुन्हा जिवंत करण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या प्रयासांवर पाणी फेरण्याची स्थिती आढळून आली आहे. या भरावामुळे परिसरात पुराचा धोका निर्माण झाला आहे.

## पालीतील रेशन दुकानांमध्ये निकृष्ट गहू

आरोग्याचा प्रश्न निर्माण होतोय, अशी प्रतिक्रिया एका शिधापत्रिकाधारक महिलेने व्यक्त केली.

या प्रकारामुळे पाली शहरातील विविध भागांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, नागरिकांनी प्रशासनाकडे लेखी तक्रारी करण्यास सुरुवात केली आहे. काही ठिकाणी रेशन दुकानांवर जाब विचारण्यात आला असून, शासन मोफत धान्य देत असले तरी त्याचा दर्जा जर वापरण्यायोग्य नसेल, तर तो लाभ नव्हे तर त्रास ठरतो, असा सूर नागरिकांमध्ये आहे. मात्र या संपूर्ण प्रकारात दोष केवळ दुकानदारांचा नाही. धान्य वितरणपूर्वी गुणवत्ता तपासणी करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांनी हे निकृष्ट धान्य मंजूर कसे केले? असा गंभीर सवाल उपस्थित होत आहे. नागरिकांचा ठाम सूर आहे की, असे धान्य जनावरांनाही खाण्याच्या लायकीचे नाही, आणि माणसाला देणे म्हणजे आरोग्याशी थट्टा आहे.

स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनीही या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत तहसीलदार यांना निवेदन दिले असून, सुधागड तालुक्यातील सर्व रेशन दुकानांची तातडीने तपासणी व्हावी आणि निकृष्ट धान्य वितरित होण्यामागील शासकीय यंत्रणेतील त्रुटींची चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित धान्य मिळावे, हीच अपेक्षा आता प्रशासनाकडे आहे. या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी एकमुखी मागणी पालीकरांकडून होत आहे.

## बीएलओच्या मानधनात दुप्पट वाढ

आयोगाने मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची नियुक्ती अनिवार्य केली आहे. मतदार नोंदणी ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. यावेळी त्यांना मतदार यादीतील सुधारणा करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी लागते. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी घरोघरी जाऊन मतदारांची नोंदणी करणे, आवश्यक माहिती गोळा करणे आणि मतदारांना मतदार चिठ्ठी (व्होटर स्लीप) वाटप करणे यासह मतदानाच्या दिवशीही मतदान केंद्रावर उपस्थित राहणे, यासारख्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. या सर्व कामांसाठी त्यांना सरकारकडून मानधन दिले जाते.भारत निवडणूक आयोगाने २४ जुलै २०२५ रोजी दिलेल्या पत्रानुसार, अधिकाऱ्यांचे मानधन ६ हजार रुपयांऐवजी १२ हजार रुपये करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने मानधन वाढवण्याचा प्रस्ताव मान्य करून तो अंमलात आणला आहे. या मानधनवाढीमुळे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या अधिकच उत्तम प्रकारे पार पाडण्यास प्रोत्साहन मिळेल, ज्यामुळे मतदार यादीची विश्वसनीयता सुधारण्यास मदत होईल. या खर्चाची पूर्तता संबंधित वर्षाच्या मंजूर अनुदानातून केली जाणार आहे.

## तालुकास्तरीय शिक्षक सन्मान सोहळा

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून श्रीवर्धन तालुका पंचायत समिती शिक्षण विभाग व अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थापक रा. पा. दिवेकर हायस्कूल, दांडगुरी येथे तालुकास्तरीय शिक्षक सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

श्रीवर्धन तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी माधव जाधव, दांडगुरी दिवेकर हायस्कूलचे चेअरमन वसंत राऊत, अदानी फाउंडेशनचे अवधूत पाटील, दिघी पोर्ट इंजिनिअर विभाग प्रमुख गोपाल अहिरकर, विस्तार अधिकारी मनोज माळवदे आदी. मान्यवर उपस्थित होते.

अवधूत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, कृषी व सामाजिक उपक्रम अशा विविध क्षेत्रात अदानी फाउंडेशन करीत असलेल्या कार्याचा चढता आलेख व्यक्त केला. तर गटविकास अधिकारी माधव जाधव यांनी शिक्षक गौरव हा उपक्रम स्तुत्य असून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी अदानी फाउंडेशन तर्फे अशाच उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले. या सोहळ्यात एकूण ४० गुणवंत शिक्षकांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## आईनेच घेतला चिमुकलीचा जीव

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

आईनेच आपल्या तान्हुल्या बाळाचा जीव घेतल्याची धक्कादायक घटना रत्नागिरीत घडली आहे. एक वर्षाच्या मुलीच्या तोंडात आईने कापसाचा बोळा कोंबल्याने तिचा घुसमटून मृत्यू झाला. हुरेन असिफ नाईक (वय १ वर्ष, रा. अलोरे, चिपळूण) असे मृत मुलीचे तर शाहीन आसिफ नाईक (३५, चिपळूण अलोरे) असे आईचे नाव आहे. शाहीन हिने मुलीच्या तोंडात कापूस कोंबून तिची हत्या केल्याचे बोलले जात आहे. मूळ चिपळूण येथील रहिवासी असलेली ही महिला रत्नागिरीतील पारस नगर येथे वास्तव्यास होती. आईनेच आपल्या पोटच्या गोळ्याला संपवल्याच्या या घटनेमुळे समाजमन सून्न झाला आहे.

# आदिवासी बांधवांना दाखल्यांचे वाटप

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जांभूळपाडा आणि वेश्वी कातकरी वाडीवरील आदिवासी बांधवांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले. हे दाखले तयार करण्यासाठी उरण सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते नामदेव ठाकूर, मनीष कातकरी व दत्ता गोंधळी यांनी सर्वोतोपरी प्रयत्न केले. महसूल विभागातर्फे तलाठी कोळी, मंडळ अधिकारी मोहिते, तहसीलदार डॉ. उद्धव कदम तसेच आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी पेण यांचे देखील सहकार्य लाभले. हे जातीचे दाखले मिळाल्याने आदिवासी महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी किशन जावळे, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, सरचिटणीस संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उप विभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक यांच्या सहकार्याने तहसीलदार उरण डॉ. उद्धव कदम, मंडळ अधिकारी के. डी. मोहिते, तलाठी जयहिंद कोळी, सत्यवान पाटील यांच्या संमतीने जातीचे दाखले तयार करण्यात आले.

## गारंबी धरणाचा परिसर चकाचक

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड-जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली गारंबी येथे 'स्वच्छता हि सेवा' अंतर्गत 'एक दिवस एक तास एकसाथ स्वच्छता' अभियान शुक्रवारी (दि.२६) राबविण्यात आले. त्यांनतर त्याच परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर पाणी पुरवठा अभियंता सोनल पाटील, बांधकाम अभियंता अनिकेत वाजे, शहर समन्वयक सचिन कोरके, गाळणी चालक पल्लवी डोंगरीकर, मुकादम अभिजीत चांदोरकर, स्वप्नजा विरुकुड, अक्षता तुळसकर, विजय सुर्वे, जयकृष्ण भिसे, सतेज निमकर, स्मिता मुरुडकर यांच्यासह पाणी पुरवठा कर्मचारी व सफाई कर्मचारी आदी उपस्थित होते.

## पोलिसांची कार्यतत्परता

**पाली/बेणसे :** प्रमोद देऊळकर यांनी ४ लाख रुपये रोख रक्कम आणि कॅनरा बँकेचे सही केलेले तीन कोरे चेक त्यांनी एका बॅगमध्ये ठेवले होते. बुधवारी (दि.२४) दुपारच्या सुमारास देऊळकर पाली येथील विठ्ठल मंदिर परिसरातून जात असताना त्यांची बॅग हरवली. तातडीने त्यांनी पाली पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पोलीस उपनिरीक्षक अनिल गोसावी आणि शिपाईगौरव भापकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्याठिकाणी चौकशी केली असता एका व्यक्तीने ती बॅग उचलून नेल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्या व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्याशी संपर्क साधून विचारपूस केली असता त्याने प्रामाणिकपणे बॅग सापडल्याचे सांगितले आणि ती पोलिसांकडे जमा केली.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर जाहिरात

सहजीवन विविध उद्योग संघटना पळी - तिनवीरा
(र.नं. एफ १४९, रायगड, दिनांक २२/०३/१९७९
पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात ग्रुप ग्राम पंचायत कुरकुंडी - कोलटेंभी हद्दीत (तिनवीरा) मौजे कुरकुंडी कोलटेंभी सर्व्हे नं. १९३ अ/२ क्षेत्र -२ हे २- आर ३४ पॉईंट या जमीन मिळकतीतील सहजीवन ग्रामोद्योग वसाहतीतील भूखंड नं. ४ व १४ हे लघुउद्योग स्थापन करणेकरीता उद्योजकांना भाड्याने देणे आहे. तेव्हा इच्छुक उद्योजकांनी आपल्या उद्योगाचा प्रकल्प अहवालासह अर्ज, दिनांक १०/१०/२०२५ रोजी संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सहजीवन ग्रामोद्योग वसाहत तिनवीरा प्लॉट नं. १६ सहयोग इंडस्ट्रीज येथे मिळतील अशी व्यवस्था करावी.

मुदतीनंतर आलेले व अपूर्ण स्वरूपातील अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

अध्यक्ष/सचिव
सहजीवन विविध औद्योगिक संघटना
तिनविरा, अलिबाग-रायगड

### महावितरण — जाहीर आवाहन

म.रा.वि.वि.कं.मर्यादित, पेण मंडळ अंतर्गत शिकाऊ उमेदवार सन २०२५ – २६ यासाठी प्रशिक्षणार्थी भरती करण्यात येणार आहे. यासाठी दहावी उत्तीर्ण व विजतंत्री / तारतंत्री या व्यवसायात औद्योगिक प्रशिक्षण (ITI) उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांनी दि. २७.०९.२०२५ ते ०५.१०.२०२५ पर्यंत www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावरील **आस्थापना क्र. E०२१७२७००१८१** वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत व दिनांक ०५.१०.२०२५ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१) **शैक्षणिक पात्रता –** १० वी उत्तीर्ण व मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची दोन वर्षाचा वीजतंत्री / तारतंत्री परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२) **प्रशिक्षण कालावधी –** १ वर्ष
३) सदर भरती प्रक्रिया **रायगड** जिल्हयातील उमेदवारांकरीताच मर्यादित आहे.
४) **कामाचे ठिकाण –** पेण मंडळांतर्गत येणाऱ्या सर्व विभागीय, उपविभागीय व शाखा कार्यालय.
५) यापुर्वी प्रशिक्षणार्थी म्हणून कोणत्याही दुसऱ्या आस्थापनेत प्रशिक्षण घेतले नाही किंवा तदसंबंधी करार केला नाही असेच उमेदवार पात्र असतील.
६) प्रशिक्षणार्थी भरती प्रक्रियेत ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व कागदपत्रे (शैक्षणिक प्रमाणपत्र, आयटीआय गुणपत्रक व प्रमाणपत्र, जातीचा दाखला, आधारकार्ड, Apprentice Portal वर ऑनलाईन रजिस्टर करुन म.रा.वि.वि.कं. मर्या, पेण मंडळ कार्यालयाच्या आस्थापना क्र. E०२१७२७००१८१ वर Apply केल्याची प्रत इ.) व त्यांच्या साक्षांकीत प्रती घेऊन दि. ०७.१०.२०२५ रोजी **म. रा. वि.वि.कं.मर्यादित, पेण मंडळ कार्यालय, अंतोरा रोड, पेण** येथे **सकाळी ११ ते ०५** दरम्यान उपस्थित रहावे.
७) प्रशिक्षणार्थी उमेदवारांची निवड झाल्यानंतर काही कारणास्तव ॲप्रेंटीस बोर्ड, मुंबई यांचेकडून उमेदवारांची नोंदणी नाकारल्यास उमेदवारांची शिकाऊ उमेदवारी आपोआप रद्द होईल याची नोंद घ्यावी.
८) प्रशिक्षणार्थी उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

**(PRO No 247)**
सही/–
**अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या, पेण मंडळ, पेण**

### जाहीर सूचना

आमच्या अशिलाच्या वतीने याद्वारे तमाम जनतेस सूचना देण्यात येते की, आमचे अशील विद्यमान भागिदारी संस्था मे. हावरे ग्रॅण्डे, व्यवसायाचे प्रमुख ठिकाणः ४१३-४१६, वर्धमान मार्केट, सेक्टर-१७, वाशी, नवी मुंबई - ४००७०५ (**"संस्था"**) मध्ये भागीदार म्हणून प्रवेश करण्याचे प्रस्तावित आहे. (i) सौ. उज्ज्वला सतिश हावरे (ii) अनिल कुमार सिंग आणि (iii) मे. हावरे इंजिनिअर्स ॲण्ड बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेड (**"भागीदार"**) हे संस्थेचे विद्यमान भागीदार आहेत.

इतर गोष्टींबरोबरच कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण समाविष्ट असलेले सर्व व्यक्ती/संस्था यांचा संस्थेकरिता किंवा तिच्या संदर्भात किंवा भागीदार किंवा त्यांच्यापैकी कोणाच्याही विरुद्ध संस्थेच्या नावे किंवा तिच्या वतीने केलेल्या कृती, क्रिया आणि गोष्टींकरिता कोणताही हक्क, लाभ, हितसंबंध, कोणत्याही स्वरुपाचा दावा किंवा मागणी असल्याचा दावा करीत असल्यास किंवा असल्यास त्याबाबत आम्हाला याखाली उल्लेखिलेल्या पत्ता आणि ईमेल आयडीवर सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत नोटरीकृत कागदोपत्री पुराव्यासह, ज्यावर ते त्यांचे संस्थेच्या संदर्भातील हक्क आधारित आहेत आणि ठामपणे सांगत आहेत, लेखी स्वरुपात सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास, असे कोणत्याही स्वरुपाचे दावे किंवा आक्षेप किंवा मागण्या, जर असल्यास, सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.

**दिनांक २७ सप्टेंबर, २०२५**
सही/-
**निरव सी. जानी**, भागीदार
**ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स**
३११, दलामल टॉवर, २११, फ्री प्रेस जर्नल मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
ईमेलः nirav@janiparikh.in

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
### केंद्र कार्यालय अलिबाग
### -: निविदा सूचना :-

या बँकेच्या इंदापूर (ता. माणगाव) या शाखेकरीता मालकी हक्काने जागा खरेदी करणेची आहेत. सदर जागा बँकेच्या प्लॅन, अटी व शर्तीप्रमाणे व बँकींग व्यवहाराच्या दृष्टीने योग्य शक्यतो बाजारपेठेच्या दृष्टीने मोक्याच्या जागा मालकी हक्काने खरेदी करणेच्या आहेत. त्याकरीता इच्छुक जागामालकांकडून निविदा मागविणेत येत आहेत.

तरी ज्या निविदाधारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या सिलबंद निविदा बँकेच्या खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खाली सही करणार यांचे नावाने दिनांक ०६.१०.२०२५ पर्यंत सादर कराव्यात.

इच्छुक निविदाधारकांनी आपली निविदा परिपूर्ण तसेच सुस्पष्ट स्वरूपात (जागेची किंमत विकसनाचा तपशिल) इत्यादी भरणे अपेक्षित आहे. आलेल्या एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील. याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे उपलब्ध आहे.

सही/-
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
ठिकाण : केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक : २७.०९.२०२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वाघोशी ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-वाघोशी ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट नं./स.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. श्रीनिवास रामकृष्ण पोलीशेटी | १७६ | ०-१९-०० | ०-०६ |
| | ११३/१ | ०-२८-६० | ०-०५ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक : २६/०९/२०२५
सही/-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर ॲडव्होकेट**
मु. पो. नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड
मो.बा.नं. ८१४९६५१५०८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांचे सुचनेवरून आम्ही मौजे सायगांव, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींचे संदर्भात ता. १२/७/२०२५ रोजीच्या दैनिक कृषीवल या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध केली होती व त्यामध्ये त्या मिळकती आमचे अशिलांनी कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे, असे नमूद करण्यात आले होते. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे आमचे अशिल व परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकांमधील नियोजीत खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण होऊ शकला नाही. सबब ता. १२/७/२०२५ रोजीची दैनिक कृषीवल या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली जाहीर नोटीस रद्द समजण्यात यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतींचे वर्णन**
**मौजे सायगांव, ता. मुरुड, जि. रायगड.**

| अनु.नं. | गट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) | मालकांचे नाव (७/१२ प्रमाणे) |
|---|---|---|---|---|
| १) | २९५/२ | ३-६८-००<br>पो.ख.०-३८-००<br>एकूण ४-०६-०० | ३.५७ | अरशद अ. गफुर दुदुके<br>निलुफर अरशद दुदुके |
| २) | २९५/३ | १-८१-००<br>पो.ख. ०-१९-००<br>एकूण २-००-०० | १.७६ | निलुफर अरशद दुदुके |
| ३) | २९५/४ | २-४८-००<br>पो.ख.०-२६-००<br>एकूण २-७४-०० | २.४१ | अरशद अ. गफुर दुदुके |

सदर मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता शिघ्रे ते सायगांव-महालोरे मुख्य रस्त्यापासून सुरु होवून गट नं. २८५, २८९, २९०, २९१, २९२, २९३ व २९६ या मिळकतीमधून जाणारा व सदर मिळकतीपर्यंत पोहोचणाऱ्या वहिवाटीच्या रस्त्याच्या निरंतर हक्कासह.

अलिबाग
तारीख : २७/९/२०२५
सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
श्रुतीसारंग को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, बाह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे वांदेली, ता.मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक **शैलेश गजानन खोत** यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे वांदेली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वांदेली ता. मुरुड | २९० | क्षेत्र ०-२६-३०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकुण क्षेत्र ०-२७-६० | ६.३० |

दिनांक: २७/०९/२०२५
अशिलांची सही
**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट जे. एस. एम कॉलेज
जवळ, अलिबाग- रायगड मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे कुडली, तालुका रोहा, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले असून त्याबाबत बोलणी सुरू आहेत. त्या मिळकतींचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**-मिळकतीचे वर्णन-**

| मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| कुडली | २८३/२ | ०-२२-०० | ०.२२ | शिल्पा पियुष जैन |
| कुडली | ३८२ | ०-३२-३० | ०.९८ | संजय देवराम शेलार |
| कुडली | २८३/१ | ०-२३-०० | ०.२० | भगवान रामचंद्र यादव<br>संजय देवराम शेलार |

सदरहू वर्णन केलेल्या मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याची व त्या मिळकती आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पूर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतींचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु.करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २६/०९/२०२५
सही/-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी चौक, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत, त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री. निखिल मंगेश चव्हाण यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (आर-चौरस-मीटर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कावीर | २९० | ८६-९०-०० | ८६९.०० |

सदरची बिनशेती मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २७/९/२०२५
सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२ तळमजला
'श्रृतीसारंग' को.ऑप.हौ. सोसायटी
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी
अलिबाग, रायगड ४०२ २०१.

### MAHATRANSCO — e-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-13/25-26 7000037280 2nd call | Annual Maintenance contract for routine maintenance of Nitrogen injection fire protection system (NIFPS) including replacement of faulty spares at various substation under Panvel circle. For F.Y. 2025-2026 & 2026-2027 **Tender Fee Rs. 500/- +GST** | Limited to Rs. 25.00 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 26.09.2025 to 07.10.2025 up to 11:00 hrs, Opening date:-07.10.2025 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

दिनांक : २६/०९/२०२५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मे.ट्वेन्टी फाइव्ह इस्टेट डेव्हलपमेंट लि., पत्ता : युनिट नं. ११६, पहिला मजला, आकृती ॲनेक्स् बिल्डींग, रोड नं. ७, मारोळ एम.आय.डी.सी., अंधेरी (पु.), मुंबई - ४०००९३ यांनी आम्हास पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकतींच्या मालकी हक्कांची पडताळणी करुन तसे मालकी हक्कांसंबंधीचे प्रमाणपत्र (Title Certificate) देण्याचे काम सोपविले असुन त्या अनुषंगाने आम्ही पुढे नमुद मिळकतींच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**जमिन मिळकतींचे वर्णन**

| गावाचे नाव | अ. क्र. | स. नं. नविन | स. नं. जुना | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| मौजे शिवगाव, (जुने नावडे) ता.खालापूर, जि.रायगड | १. | ४९ | ६९ | | ०-४३.५० | ०.३० |
| | २. | ३ | २२ | | ०-१२.६० | ०.३१ |
| | ३. | २५ | ४४ | | ०-०६.०० | ०.०३ |
| | ४. | ३० | ४९ | | ०-१४.०० | ०.०६ |
| | ५. | ३१ | ५० | | ०-०७.०० | ०.०६ |
| | ६. | ३२ | ५१ | | ०-०३.०० | ०.०३ |
| | ७. | ३६ | ५५ | | ०-०७.०० | ०.०८ |
| | ८. | ३७ | ५६ | | ०-१४.०० | ०.१६ |
| | ९. | ३९ | ५८ | | ०-३३.०० | ०.२३ |
| | १०. | ४६ | ६५ | | ०-१०.०० | ०.०६ |
| | ११. | ५० | ७० | | ०-४३.०० | ३.१६ |
| | १२. | ५४ | ७४ | | ०-०१.०० | ०.०२ |
| | १३. | ७० | ९२ | | ०-०६.०० | ०.०६ |
| | १४. | ७४ | ९६ | | ०-०५.०० | ०.०२ |
| | १५. | ७५ | ९७ | | ०-८३.८०<br>पैकी ०-५३.८० | ८.३८<br>४.७९ |
| | १६. | ९९ | १२२ | | ०-६२.०० | ३.९८ |
| | १७. | १०० | १२३ | | ०-२१.६० | ०.८९ |
| मौजे नावंढे, ता.खालापूर, जि.रायगड. | १. | २० | ६६ | १ | ०-१६.०० | ०.०५ |
| | २. | २० | ६६ | २ | ०-०४.०० | ०.०२ |
| | ३. | २४ | १३५ | | ०-४०.०० | १.३७ |
| | ४. | ५२ | १८८ | | ०-२८.१० | १.५८ |
| | ५. | ८४ | २२० | | ०-०२.०० | ०.०२ |
| | ६. | ९१ | २२७ | | ०.०८.६० | ०.०५ |
| | ७. | १२१ | २५७ | | ०-५४.४० | ३.७५ |
| | ८. | १२९ | २६५ | | ०-०६.६० | ०.६६ |
| | ९. | १३० | २६६ | | ०-०५.०० | ०.४५ |
| | १०. | १३९ | २७५ | १ | १-२८.०० | ८.१३ |
| | ११. | १४० | २७६ | | ०-०९.०० | ०.०६ |
| | १२. | १४७ | २८३ | | ०-१९.०० | ०.१४ |
| | १३. | १४८ | २८४ | | १-६६.२०<br>पैकी ०-८०.०० | ९.२०<br>५.२१ |
| | १४. | १६२ | २९८ | | ०-०१.०० | ०.०२ |
| | १५. | १४४ | २८० | २ | ०-६५.०० | ४.१४ |
| | १६. | १३२ | २६८ | | १-०८.७०<br>पैकी ०-२९.०० | ०.८७<br>०.४६ |
| मौजे घोडवली, ता. खालापूर, जि. रायगड. | १. | ३५४ | | | ०-३९.०० | १.४१ |
| | २. | ५२९ | | | ०-२७.१० | ०.५० |
| | ३. | ५३६ | | | ०-८५.००<br>पैकी ०-१३.०० | ४.९५<br>१.१० |
| | ४. | ३३३ | | | ०-४९.०० | ०.७३ |
| | ५. | ३३४ | | | ०-२४.५० | ०.३४ |
| | ६. | ३३६ | | | ०-३१.०० | ०.४१ |
| | ७. | ३३९ | | | ०-०२.९० | ०.१२ |
| | ८. | ३४० | | | ०-२४.०० | ०.२८ |
| | ९. | ३४१ | | | ०-१६.०० | १.१२ |
| | १०. | ३४२ | | | ०-०६.०० | ०.०९ |
| | ११. | ३४३ | | | ०-२७.७० | ०.३७ |
| | १२. | ३४४ | | | ०-१६.७० | ०.२३ |
| | १३. | ३४८ | | | ०-३०.०० | ०.६६ |
| | १४. | ३४९ | | | ०-८६.२० | २.४३ |
| | १५. | ३५० | | | ०-३२.०० | ०.४७ |
| | १६. | ३५१ | | | ०-२७.०० | ०.३४ |
| | १७. | ३५३ | | | ०-१२.०० | ०.१४ |
| | १८. | ३५५ | | | ०-१८.२० | १.४४ |
| | १९. | ३५८ | | | ०-१८.०० | ०.२२ |
| | २०. | ३५९ | | १ | ०-१४.०० | ०.१७ |
| | २१. | ३५९ | | २ | ०-१८.६० | ०.२३ |
| | २२. | ३६२ | | | ०-१०.४० | १.०० |
| | २३. | ३६३ | | | ०-०८.६० | ०.०९ |
| | २४. | ५२८ | | | ०-६५.०० | ४.६३ |
| | २५. | ३९६ | | | ०-११.०० | ०.१२ |
| मौजे नडोदे, ता.खालापूर, जि.रायगड. | १. | ६२ | | ३ | ०-६६.०० | ०.५० |
| मौजे कांढरोली तर्फे बोरेटी, ता.खालापूर, जि.रायगड. | १. | ३३ | | १ | ०-१७.०० | ०.३५ |
| मौजे वारद ता.खालापूर, जि.रायगड. | १. | ३६ | | ३ | ०-११.१० | ०.१६ |
| | २. | ३९ | | | ०-८०.७० | ०.७५ |
| | ३. | २७ | | ३ | ०-२४.३० | ०.१२ |
| | ४. | ४२ | | २/ब | ०-६४.८० | ५.०० |
| | ५. | ५७ | | १ | ०-४१.३० | १.६३ |
| | ६. | ३१ | | | ०-३५.६० | ४.८५ |
| | ७. | ३२ | | | ०-३७.६० | ५.६९ |
| मौजे धारणी, ता.खालापूर, जि.रायगड | १. | २१ | | | ०-९३.३०<br>पैकी ०-५३.०० | ३.२८<br>३.१० |

त्याअर्थी सदर मिळकतींसदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर तत्सम कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मिळकतींवरील मालकी हक्कांसंबंधी कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरीत कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींच्या मालकी हक्कांसंबंधी आम्ही केलेल्या पडताळणीच्या आधारे मालकी हक्कांचे प्रमाणपत्र (Title Certificate) देण्यात येईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दिनांक : २७/०९/२०२५.
**श्री. संदीप रमाकांत जगे,**
ॲडव्होकेट पत्ता :- फ्लॅट नं.०२,
जयनगर 'ए' को. ऑप्
हौ. सोसा. लि., कोर्ट रोड, ५२ बंगला,
पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
मोबाईल नं. ०९३२४ ४५४५४८.




## राशीभविष्य

- **मेष :** महत्त्वाचे निर्णय विलंबानं होतील. नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. व्यवसायात अनुकूलता राहील.
- **वृषभ :** हातून धार्मिक कार्य घडेल. अपेक्षित भेटीतून समाधान मिळेल. अनावश्यक खर्च टाळायला हवा.
- **मिथुन :** प्रलंबित कामांना गती येईल. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. आर्थिक बाबतीत स्थैर्य लाभेल.
- **कर्क :** साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे होतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **सिंह :** जुनी येणी रखडतील. भागीदारी व्यवसायात मतभेद संभवतात. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कन्या :** स्थावर प्रश्न तडजोडीनं सुटतील. अचानक अधिक खर्च करावा लागेल. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **तूळ :** दूरच्या प्रवासाचे योग आहेत. अचानक धनलाभ संभवतो. कौटुंबिक अडचणींवर मात करता येईल.
- **वृश्चिक :** दिलासादायक घटना घडतील. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. कर्तव्यात कसूर करू नये.
- **धनु :** ताण-तणाव वाढेल. बेरोजगारांना मनाजोग्या संधी लाभतील. कार्यक्षमतेत उत्तम वाढ दिसून येईल.
- **मकर :** जमा-खर्चाचं गणित लक्षात घ्यावं. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. प्रवास त्रायदायक ठरू शकतो.
- **कुंभ :** खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. व्यवसायात प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. विद्यार्थ्यांना यश मिळेल.
- **मीन :** कौटुंबिक प्रश्नांची चिंता राहील. स्थापत्य, अभियांत्रिकी क्षेत्रात संधी लाभतील. चिंता नसावी.

## दिनविशेष


### २७ सप्टेंबर

**१९७२ :** प्रख्यात गणितज्ञ एस. आर. रंगनाथन यांचा मृत्यू.
**२००८ :** विख्यात भारतीय पार्श्वगायक महेंद्र कपूर यांचं निधन.
**२०१३ :** सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला निवडणुकीत 'नकारात्मक मतदान' करण्याची सोय करुन देण्याचा आदेश दिला.
**२०१७ :** कुख्यात गुंड इक्बालसह तिघांविरोधात सक्तवसुली संचालनालयाने आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी गुन्हा नोंदवला.

## आरोग्यमंत्र

### वेटलॉससाठी बटाटा खा

अलिकडच्या बदलत्या जीवनशैलीमुळे लोकांना खूप वेगवेगळे आजार वयाच्या मानाने लवकरच त्रास देऊ लागले आहेत. स्थूलपणा वाढण, रक्तातील कोलेस्टोरेलचे प्रमाण वाढणे इत्यादि. डॉक्टरही तेल तूप वगैरे कमी खा किंवा योग्य प्रमाणात खा असा सल्ला देतात. अशा वेळी कोणतं तेल आपल्या खाण्यात असावं आणि ते किती असावं अशा शंका प्रत्येकाच्या मनात निर्माण होतात.



आहारतज्ज्ञांच्या मते ज्यांची अंगकाठी बारीक असेल आणि त्वचा कोरडी असेल त्यांनी रोज ३० ग्रॅम तेल आपल्या खाण्यात ठेवावं. ॲसीडीटीचा त्रास असणाऱ्यानी किंवा ज्यांना मुरुमांचा त्रास आहे अशा मंडळीनी तेलाचा वापर थोडासा कमी करावा. तीळ, सरसू, पाम, शेंगदाणा, करडई, सूर्यफूल, ऑलिव्ह इत्यादि तेलांचा वापर आहारात केला जातो. तिळाचं तेल वापरण उच्च रक्तदाब, संधीवात अशा विकारात चांगलं असते. हृदयरोग्यांसाठी सोयाबीनचे तेल उत्तम. संधीवाताच्या रुग्णांनी अळशीच्या तेलाने मालीश करावं. रक्तात कोलेस्टोरेल असणाऱ्यांना सरसूचं तेल चांगलं असतं. तेल जास्त तापवू नये. त्यातून धूर येणार नाही याची काळजी घ्यावी. शक्य असल्यास सर्व तेलांचा आलटून पालटून वापर करावा. म्हणजे सर्व तेलांमधल्या उपयुक्त गुणधर्माचा फायदा मिळू शकेल. तेलाचा अती वापर घातकच. त्यामुळे आपण जे तेल वापरत असू ते कमी प्रमाणात वापरावं. तेल बंद करु नये कारण शरीराच्या यंत्रासाठी तेलं, तूप लोणी वा स्निग्ध पदार्थ वंगणासारखं काम करतात.

## टेक नॉलेज

### प्रवास अँड्रॉइडचा

अँड्रॉइडवर काम करणारं पहिलं गॅजेट गुगलने २००८ मध्ये सादर केलं. आजवर अँड्रॉइडमध्ये बरेच बदल झाले आहेत. अँड्रॉइड सादर झालं तेव्हा आयओएस, सिंबियन ओएस, पाम आणि विंडोज ओएसवर स्मार्टफोन काम करत असत. २००९ नंतर अँड्रॉइडची लोकप्रियता वाढत गेली. सध्या अँड्रॉइड जगभरातल्या ८८ टक्के स्मार्टफोन्समध्ये वापरलं जातं. गुगलचे सहसंस्थापक सर्गी ब्रिन आणि लॅरी पेजने सर्वात प्रथम अँड्रॉइड सादर केलं. गुगलच्या जी१ या स्मार्टफोनमध्ये या ओएसचा वापर करण्यात आला होता. एचटीसी आणि टी मोबाईल यांनी मिळून हा स्मार्टफोन तयार केला होता. ॲपलच्या आयओएसला टक्कर देण्यासाठी गुगलने अँड्रॉइड सादर केलं होतं.

आगामी काळात अँड्रॉइडमध्ये बरेच बदल पहायला मिळू शकतात. यात आर्टिफिशियल इंटेलिजन्ससंबंधीचे फीचर्स यापूर्वीच जोडले गेले आहेत. अँड्रॉइडमुळे तुमचा स्मार्टफोन डिजिटल असिस्टंट म्हणूनच काम करेल. यासोबतच गुगल प्ले स्टोअर आणि ॲप्समध्ये बऱ्याच सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यामुळे येत्या काळात अँड्रॉइड स्मार्टफोन अधिकच स्मार्ट होतील यात शंका नाही.

## स्टाईल स्टेटमेंट

### लेहंगा विथ शर्ट

एखाद्या कारणासाठी लेहंगा चोलीचा पेहराव करणं ठिक आहे. पण हा पेहराव सतत घालणं तसं वैतागवाणं असतं. लेहंग्यासोबत चोली आणि दुपट्टाही घ्यावा लागतो. दुपट्टा कॅरी करता, करता नाकी नऊयेतात. अशा वेळी काय करायचं? मैत्रिणींनो, हा लेहंगा तुम्ही वेगळ्या पद्धतीने कॅरी करू शकता. तुमच्याकडे शर्ट असेल तर लेहंग्यासोबत शर्ट कॅरी करता येईल. हा लूक कॅरी करण्यासाठी लेहंग्याला साजेसा शर्ट घ्या. हा शर्ट लेहंग्यात इन करायचा. बस... एवढं केलं की तुम्ही तयार झालात म्हणून समजा. लेहंग्यासोबत शर्ट ही कल्पना थोडी विचित्र वाटत असली तरी हे कॉम्बिनेशन खूप छान दिसतं. तुम्ही मिक्स अँड मॅचही करू शकता. अर्थात वेगवेगळे प्रयोग करायला वाव आहेच. म्हणजे तुम्ही कंबरेला छानसा पट्टा बांधू शकता. कलर ब्लॉकिंग ट्राय करू शकता. शर्टवर एखादं जॅकेट घालून लूक खुलवू शकता. काही सेलेब्जनी तर लेहंग्यावर टी शर्ट घालण्याचा ट्रेंडही आणला आहे. थोडं गुगल सर्च करा. विविध सेलेब्जचे शर्ट आणि लेहंगा लूकमधले फोटो तुम्हाला मिळतील. त्यांच्याकडून प्रेरणा घ्या. मग काय, यंदाच्या सणासुदीला हा लूक नक्की ट्राय करून बघा.

## पंचांग

**शनिवार, २७ सप्टेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
भाद्रपद शु. ५, नक्षत्र : अनुराधा,
चंद्रराशी : वृश्चिक, योग : प्रीति,
सूर्योदय : ६.३१, सूर्यास्त : ६.२८

## फॉरवर्डस

**रिश्तों क़े आगाज़ तों सभी अच्छा करतें हैं...**

**मसला तों सिर्फ़ आख़िर तक़ निभानें क़ा हैं...!**

## फॅशन पॅशन

* प्लेन डेनिम शर्टपेक्षा प्रिंटेड शर्ट घाला. ॲसिड वॉश डेनिम हा प्रकार परत आला आहे. ब्लू डेनिम शर्ट आणि ब्लॅक पँट हे कॉम्बिनेशन करता येईल.
* जिओमॅट्रिक प्रिंटवाले शर्टही खुलून दिसतात. पण ते योग्य प्रकारे घातले पाहिजेत. अशा शर्टसोबत साजेशी चिनोज घाला आणि मस्त दिसा.
* हटके प्रिंट्स घालण्याची आवड असेल तर तेही ट्राय करता येईल. सगळं काही प्रिंटेड हवं असेल तर प्रिंटेड शर्टसोबत प्रिंटेड पँटही घालता येईल.
* फ्लोरल प्रिंटवाला शर्टही तुम्ही कॅरी करू शकता. वॉश्ड आउट जीन्सवर हा शर्ट घाला. त्यावर लोफर्स शोभून दिसतील.

## करिअरवाटा

### पर्यावरणस्नेह जपताना...

आपल्या देशामध्ये पर्यावरणाविषयीची जागृती वाढत आहे आणि काही उचविद्याविभूषित तरुण उत्तम पगाराच्या नोकऱ्या सोडून पर्यावरणाच्या रक्षणासाठी पर्यावरणप्रेमी व्यवसाय सुरू करत आहेत. पक्ष्यांसाठी मातीची घरटी तयार करणं हा असाच एक प्रयोग आहे. अलिकडच्या काळात चिमण्या नष्ट होत असल्याबद्दल चिंता व्यक्त होते. पण त्याचं कारण आपण सध्या ज्या प्रकारची घरे बांधत आहोत त्यात चिमण्यांना घरटी बांधण्यास योग्य जागा मिळत नाही हे आहे. त्यामुळेच चिमण्यांना घरटी उपलब्ध करून देणं किंवा वेगळ्या शब्दात सांगायचं झालं तर चिमण्यांना वेगळ्या घरात राहण्याची सवय करायला लावणं गरजेचं आहे.



त्यासाठी मडकी तयार करण्याच्या चाकासारखे एक छोटं चाक तयार करून त्यावर विविध आकाराच्या पाखरांची घरटी तयार करता येतात. त्या घरट्यांचा रंग झाडांच्या सालीशी मिळता जुळता ठेवायचा असतो. ही घरटी विकून अर्थार्जन आणि पर्यावरण रक्षण ही दोन्ही उद्दिष्ट सफल होतात. घरटी झाडांना लटकवली की, पाखरं त्यात रहायला लागतात. ती मातीची असल्यामुळे थंड असतात. अशाप्रकारे या व्यवसायातून मिळणारं समाधान काही वेगळंच असतं. त्यामुळे अशा हटके मार्गांचाही विचार करायला हवा.

## खेचाखेची

### ड्रायव्हर मेला की काय?

कारची धडक बसून एक कबूतर बेशुद्ध पडलं.
एक माणूस त्याला घरी घेऊन आला आणि पिंजऱ्यात ठेवलं.
शुद्धीवर आल्यावर कबूतर म्हणालं, 'आयला, जेलमध्ये टाकलेलं दिसतंय.
.
.
.
ड्रायव्हर मेला की काय?'

## वेगळं काही

एका निळ्या रंगाच्या विंचवाच्या विषासाठी कोट्यवधी रूपये मोजावी लागते. या विंचवाच्या विषाने विडसटॉक्स नावाचं औषध बनवलं जातं. क्युबामध्ये या औषधाचं मोठं महत्त्व आहे. कॅन्सरसारख्या दुर्धर आजारावर मात करण्याची क्षमता या औषधात आहे. महागडी विषं आणि त्यांचा औषधांमध्ये होणारा वापर ही बाब नवी राहिलेली नाही. मध्यंतरी हेशम अल गलील नावाच्या फेसबुक पेजवर या विषासंदर्भात एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. या विंचवाच्या एक लीटर विषाची किंमत ७५ कोटी ८६ लाख २२ हजार ३६२ रूपये इतकी आहे. हे विष किंग कोब्राच्या विषापेक्षाही खूप महाग आहे. या विषाच्या मदतीने अनेक असाध्य आजारांवर औषधं बनवता येतील, अशी अपेक्षा आहे.

## फॅशन पॅशन

### सणांसाठी सजताना...

येत्या फेस्टिव सीझनमध्ये हटके लूक कॅरी करायचा असेल तर इंडो-वेस्टर्न फ्युजन वेअर ट्रेंड फॉलो करण्याचा विचार करा. याविषयी...



* फ्रंट स्लीट कुर्ता आणि धोती किंवा ट्युलिप पँट कॅरी करणं हा उत्तम पर्याय आहे. भरपूर भरतकाम केलेले क्रॉप किंवा पेप्लम टॉपच्या कुटुंबातले भरजरी कुर्ते बोल्ड रंगाच्या सिल्क धोतीसोबत कॅरी करता येतील. हा लूक खुलवण्यासाठी ट्रेंडी झुमके घालता येतील. मॅटे लिपस्टिक आणि न्यूड मेक अप यामुळे तुम्ही छान दिसाल. * जंपसूट्सनाही तुम्ही एथनिक लूक देऊ शकता. असा लूक मिळवण्याचा सोपा मार्ग म्हणजे लेहरिया, कलमकारी, अजराक्सारख्या पारंपरिक प्रिंट्सचे जंप सूट तयार करून घेणं किंवा जंप सूटवर भरजरी दुपट्टा, नक्षीकाम केलेले बेल्ट, जुती, स्टेटमेंट ज्वेलरी कॅरी करणं. * पारंपरिक लेहंग्यावर चोली घालण्याऐवजी साईट कट असलेला लाँग कुर्ता घाला. नक्षीकाम केलेला केपही चालू शकेल. यावेळी लेहंगा आणि कुर्त्याच्या रंगसंगतीकडे विशेष लक्ष द्या. यासोबत स्टेटमेंट नेकलेस कॅरी करा. पोटली बॅग किंवा क्लच घ्या. अशा प्रकारे तुम्ही एथनिक लूक मिळवू शकता.

## सुडोकू ९


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | | ४ | | ५ | | |
| ५ | | | २ | | ८ | | | |
| | २ | | | | | | १ | ९ |
| | | ७ | | | ३ | | ९ | |
| ६ | १ | | ४ | | ५ | | २ | ३ |
| | ८ | | ९ | | | ४ | | |
| ९ | ७ | | | | | | ३ | |
| | | | ३ | | ७ | | | ५ |
| | | ५ | | ९ | | २ | | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ इ ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २ | १ | ९ | ८ | ६ | ३ | ४ | ७ |
| ८ | ३ | ७ | २ | १ | ४ | ९ | ५ | ६ |
| ४ | ६ | ९ | ७ | ३ | ५ | २ | १ | ८ |
| ६ | ७ | ४ | ५ | ९ | १ | ८ | २ | ३ |
| २ | ८ | ३ | ६ | ४ | ७ | १ | ९ | ५ |
| १ | ९ | ५ | ८ | २ | ३ | ७ | ६ | ४ |
| ७ | १ | ६ | ३ | ५ | ९ | ४ | ८ | २ |
| ९ | ५ | ८ | ४ | ७ | २ | ६ | ३ | १ |
| ३ | ४ | २ | १ | ६ | ८ | ५ | ७ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ९



**आडवे शब्द :-**
१) लुप्त झालेली एक प्राचीन भारतीय भाषा
४) अवाजवी
८) गोमाता
९) एक ऋतू
१२) परराष्ट्राच्या गुप्त बातम्या काढणारा
१४) बारीक झणझण
१७) प्रहर
१८) मिंधा
२०) सैन्याची तुकडी
२२) दिखाऊ,खोलवर नसलेले
२४) श्वसनेंद्रिय
२५) नाविकदल
२६) नवाकोरा
२७) नकली,खरी नसलेली
२८) छोटी विश्रांती
२९) अल्पोपहार
३१) गवंड्याकडील पाण्याची पिशवी
३३) नवरा
३४) साधा,प्रामाणिक
३६) दूध वा दुधाचे पदार्थ
३८) एक तंतूमय वनस्पती
३९) हत्तींचा राजा
४१) आसाममधील एक आदिवासी जमात
४२) गोमाता
४४) जयोस्तुते,नमोस्तुते ह्या काव्याचे कवी (आडनाव)
४५) टक्कर
४७) दिवस
४८) ढोल वाद्याचा आवाज
४९) बाधा उत्पना करणारे
५१) घोड्याला आवर घालणारी वादी
५३) एक द्विदल धान्य
५४) वेगाने हाकलणे
५७) पशू
५९) इच्छा
६०) अपमान
६३) नवरदेव
६४) इमारतीचा मूळ आधार
६५) कारस्थानी
६७) एक राजकीय पक्ष
६९) तात्काळ
७१) जाणणे,ग्रहण होणे,समजणे
७३) पृथ्वी
७४) गाठ,अलिंगन
७५) कमळ
७७) मयूर
७८) कैद
७९) ढवळाढवळ
८१) प्रत्येक दिवशी
८२) रेशमाचे जाडसर कापड
८३) चोपडी

**उभे शब्द:-**
१) गरजवंताला अक्कल नसते या अर्थाची एक म्हण
२) सासरच्या विरुद्ध
३) मगज
५) हत्ती
६) च्या साठी
७) वरपांगी दिखाऊ
१०) चेहेऱ्यावरील तेज
११) धमकी
१३) कुराणातील वचने
१५) अधिक योग्यतेचा,श्रेष्ठ प्रतीचा
१६) पुन्हा पुन्हा
१९) चक्र
२०) उद्याच्या नंतरचा दिवस
२१) फळाचे साल
२३) भगर,उपवासाचे तांदूळ
२५) सोपे (हिं.)
२६) वेदनेची उसळी
२७) खूप खाली
२८) आकाशयान
३०) गुजराती नृत्यप्रकार
३२) विशेष
३४) समुद्रकिनारा
३५) उपासक,पूजक
३७) नोकरी करणारा
३८) कागदाचे चार बंद
४०) वजनदार
४१) नष्ट,नासाडी
४३) जावळा
४४) चाणक्य नीती
४६) मनाचा ओढा,हिंदीत उद्या
४७) श्रीविष्णूचे बटु रूप
५०) नदीवरील बांध
५२) समुद्र लाटांचा आवाज
५५) मज्जाव
५६) जननी
५८) आशीर्वाद देणारा गणपती
६५) कशा प्रकारचा
६६) घराचा मागचा दरवाजा
६८) देशाचा कारभार सैन्याने चालविण्याची पद्धत
७०) बडबड
७१) सध्या
७२) अर्धांगवायू
७६) वृषभ
७८) बोकड
८०) लाकूड

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | ग | र | पा | ल | ■ | क | स | म | ■ | गे | ■ | सा | लो | सा | ल |
| ज | र | ■ | ल | व | क | र | ■ | हा | ल | ह | वा | ल | ■ | ध | ■ |
| रा | ज | व | ट | ■ | ण | ■ | म | श | क | ■ | चा | ■ | अ | ना | थ |
| न | ■ | स | ■ | म | क | रा | ल | य | ■ | प | ळ | वा | ट | ■ | ड |
| ज | न | न | म | र | ण | ■ | म | ■ | ख | त | ■ | रु | ■ | का | क |
| र | ज | ■ | ल | वा | ■ | क | ल | क | ल | ■ | क | ळ | व | ळ | णे |
| ■ | र | ज | ई | ■ | आ | ड | ■ | रा | ब | ■ | ल | ■ | रा | जी | ■ |
| दु | बा | र | ■ | द | र | वा | जा | ■ | त | ह | ह | या | त | ■ | द |
| ■ | ज | त | ना | मा | ■ | ■ | स्त | ■ | खा | र | ■ | त | ■ | को | ळ |
| क | ■ | र | जा | ■ | मा | या | ■ | म | ना | ■ | वि | ना | का | र | ण |
| ल | स | ■ | य | म | न | ■ | खा | स | ■ | आ | जा | ■ | प | डा | व |
| म | हा | रा | ज | ■ | ध | म | क | ■ | त | ■ | पू | र्व | ■ | ■ | ळ |
| ■ | रा | ज | ■ | म | न | न | ■ | आ | र | मा | र | ■ | ■ | व | ण |
| नो | ■ | कु | व | त | ■ | क | ला | ग | त | ■ | ■ | पा | व | न | ■ |
| क | ल | मा | ■ | दा | ख | व | ■ | म | री | च | ■ | ल | ■ | वा | फ |
| री | ■ | र | द | न | ■ | डा | ल | न | ■ | य | र्षा | य | ■ | स | ट |

# कलासक्त

# फुलराणीची किमया भक्ती बर्वे

रंगबहार

शरद कोरडे



पु. ल. देशपांडे यांनी जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या 'पिग्लेलियन' या नाटककार आधारीत 'फुलराणी' हे नाटक लिहिले. या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईच्या रविंद्र नाट्यमंदिरात २९ जानेवारी १९७५ मध्ये झाला. हे नाटक कमालीचे लोकप्रिय झाले ते भक्ती बर्वे यांच्या 'फुलराणी'च्या भूमिकेमुळे. सतिश दुभाषी व अरविंद देशपांडे यांच्यासारखे मातब्बर अभिनेते. भक्ती बर्वे यांनी फुलराणी असलेल्या मंजुळेची भूमिका अशा झोकात अभिनयाचा कस लावून केला की, पुढे भक्तीला 'फुलराणी' म्हणण्यात येऊ लागले. मंजुळेची स्वगते व सतीश दुभाषी बरोबरची तिची जुगलबंदी पाहून प्रेक्षक फुलराणीच्या प्रेमात पडले. या नाटकाने त्यावेळी ११११ नाट्यप्रयोग केल्याचे जाणकार म्हणतात. पु.ल. देशपांडे यांनी या नाटकाला मराठी संस्कृतीच्या जवळ जाणारे अस्सल भारतीय रूप दिले असल्याने मराठी रसिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. भक्ती बर्वे यांच्यानंतर पुढे प्रिया तेंडूलकर, सुकन्या कुलकर्णी, अमृता सुभाष यांनी फुलराणीची भूमिका केली पण, भक्ती बर्वेची लोकप्रियता व अभिनयाची उंची त्या गाठू शकल्या नाहीत. शेवटी तर दिग्दर्शक राजेश देशपांडे यांनी संहितेत काही बदल घडवून तर काही संवाद नव्याने लिहून हेमांगी कवि यांना घेऊन 'फुलराणी' केले. पण हे नाटक फार्सिकल व अतिविनोदी करण्याच्या अट्टाहासामुळे नाटकाचा तोल बिघडला व प्रेक्षकही नाराज झाले. डॉ. जब्बार पटेल, साहित्यिक रत्नाकर मतकरी व बाबासाहेब पुरंदरे यांनी देखील उघड उघड नाराजी व्यक्त केली. पु.ल. देशपांडे यांचे निकटचे स्नेही दिनेश ठाकूर, ज्योती ठाकूर यांनी परदेशांतून भारतात येऊन हे नाटक पाहिले व आपली नाराजी थेट लोकसत्ता मध्ये प्रकट केली. सुनितातार्इ देशपांडे यांनी पुलंच्या सर्व नाटकांच्या प्रयोगाचे हक्क कलाकारांसाठी खुले केल्यामुळे अशा प्रकारांना आळा घालणे कठीण झाले होते. भक्ती बर्वे यांचा जन्म सांगली येथे १० सप्टेंबर १९४८ मध्ये झाला. त्यांचे कुटूंब पुढे मुंबईत येऊन स्थायिक झाले.

भक्ती बर्वे यांनी प्रथम सुधा करमरकर यांच्या 'लिटील थिएटर' मध्ये बालनाट्यांतून कामे करण्यास सुरूवात केली. इथेच खऱ्या अर्थाने त्यांच्या कलाजीवनाला सुरूवात झाली. त्यानंतर त्यांनी आकाशवाणीवर निवेदिका म्हणून काम करण्यास सुरूवात केली. त्यानंतर २ ऑक्टोबर १९७२ ला मुंबई दूरदर्शन सुरू झाल्यावर त्या तेथेही निवेदिका व वृत्तनिवेदिका म्हणून काम करू लागल्या. त्यावेळी दर रविवारी सकाळी 'साप्ताहिकी' या कार्यक्रमांतून दूरदर्शनच्या आठवड्याच्या कार्यक्रमाची झलक दाखविण्यात येत असे. या कार्यक्रमाचे निवेदन भक्ती बर्वे करीत असत. हा कार्यक्रम खूप लोकप्रिय असे. भक्ती बर्वे यांच्या निवेदनामुळे हा कार्यक्रम रविवारी घरादारांतून पाहिला जात असे. त्यानंतर १९९४ मध्ये मुंबई दूरदर्शनची डी.डी. सह्याद्री वाहिनी सुरू झाली. त्यातही भक्ती बर्वे निवेदिका होत्या.

सुप्रसिद्ध लेखक वि.वा. शिरवाडकर व सदाशिव अमरापूरकर यांनी 'किमयासागर' हे नाटक हेलन केलरच्या आयुष्यावर आधारीत 'मिरॅकल वर्कर' या इंग्रजी चित्रपटावर आधारीत होते. या नाटकात 'ॲना' मुख्य भूमिकेसाठी भक्ती बर्वे यांची निवड केली. त्यातील अंध, मुकी व बहिरी असलेल्या हेलन केलरची भूमिका मुग्धा गडकरी या बालकलाकाराने केली होती. नाट्यसंपदेच्या प्रभाकर पणशीकर यांनी या नाटकाची निर्मिती केली होती. या नाटकात दिपा श्रीराम ज्या या नाटकाच्या दिग्दर्शिकाही होत्या, त्यांच्यासह उपेंद्र दाते, जगन्नाथ कांदळगावकर, किरण करमरकर यांच्या भूमिका होत्या. प्रचंड मेहनत, खूप खर्च व उंची नेपथ्य यांसह ही जगभर गाजलेल्या कलाकृतीवरील या नाटकाचे केलेले चित्रण हे पुढे जपून न ठेवल्याने पुढच्या पिढीला हे नाटक पाहता आले नाही व पुन्हा या कलाकृतीला कुणी हात घातला नाही. संजय लिला भन्साळी यांनी याच कलाकृतीवर 'ब्लॅक' नावाचा चित्रपट राणी मुखर्जी व अमिताभ बच्चन यांना घेऊन केला.

त्यानंतर प्रेमानंद गज्वी 'गांधी आंबेडकर' यांच्या जीवनावर व त्यांच्या संघर्षावर नाटक लिहिले. या नाटकांत या दोन नेत्यांची भेट घेऊन या दोघांचा दुवा म्हणून विदुषकाचे एक काळ काल्पनिक पात्र गज्वी यांनी निर्माण केले होते व ते काम भक्ती बर्वे यांनी केले होते. गांधीजी व आंबेडकर यांची मर्मस्थळे शोधून त्यांतून त्यांना थेट मर्मभेदी प्रश्न विचारणाऱ्या व दोन महापुरूषांचे अंतरंग उलगडणाऱ्या या विदुषकाचे बहुपेजी व्यक्तिमत्त्व भक्ती बर्वे यांनी उभे केले होते. त्यानंतर विश्राम बेडेकर यांनी लिहिलेले व दिग्दर्शित केलेले 'टिळक व आगरकर' हे नाटक मुंबई साहित्य संघाने रंगभूमीवर आणले होते. त्यांत टिळकांचे काम प्रमोद पवार व आगरकरांचे काम शाम पोंक्षे करीत होते. त्यांत या दोन नेत्यांच्या संबंधित असलेल्या खानवळवाल्या काकूंचे काम भक्ती बर्वेनी केले होते. विधवा आणि विकेशा असलेली पण सडेतोड बोलणारी ही काकू भक्ती बर्वे यांनी प्रचंड अभ्यासाने व मेहनतीने उभी केली होती. दिनकर जोशी यांच्या 'प्रकाशाची सावली' या कांदबरीवर नाटकाकार अजित दळवी यांनी 'गांधी विरूद्ध गांधी' हे नाटक लिहिले. या नाटकांत अतुल कुलकर्णी गांधीचे व किशोर कदम गांधीपुत्र हरिलालचे काम करीत तर भक्ती बर्वे यांनी बा (कस्तुरबा) चे काम केले होते.

वसंत कानेटकर यांचे 'अखेरचा सवाल' हे नाटक विजता मेहता यांनी दिग्दर्शित केले होते. त्यांत भक्ती बर्वे यांनी डॉक्टश्र दांपत्यांच्या 'नंदू' या मुलीचे काम केले होते. एक हंसरी खोडकर व आनंदी मुलगी नंदू ही कर्करोग झाल्यावर कशी निस्तेज व हळ हळू रोगाचा अंमल वाढल्यावर, केस गळून काळे डाग पडणे, पुढे हळू हळू आलेले अंधत्व यामुळे कशी मरवाला सामोरी जाते याचे चित्रण केले होते. भक्ती बर्वेनी आपल्या अफाट बुद्धीसामर्थ्याने व अभिनय कौशल्याने ही भूमिका अजरामर केली. 'या नाटकांत डॉक्टर दांपत्य म्हणून मधुकर तोरडमळ व विजया मेहता यांनी भूमिका केला होत्या. शिवाय मोहन सुखटणकर, अरूण जोगळेकर, दया डोंगरे, 'पप्पा सांगा कुणाचे' हे सुरेश खरे लिखित नाटक मोहन तोंडबळकर यांच्या 'कलावैभव' या संस्थेते रंगमंचावर आणले. यांत भावना, श्रीराम लागू, लता लक्ष्मण अशी नामवंत मंडळी काम करीत होती. कुटूंबांतील लहान मुलीचे काम भक्ती बर्वे करीत होती. ही मुलगी आपल्या वडीलांच्या बाहेरच्या प्रकरणामुळे घरांतील वादळ व ताणतणाव याची जाण आल्याने ती ते विवाहबाह्य संबंध प्रत्यक्ष दुसऱ्या बाईच्या घरी जाऊन हिकमतीने व मिश्किलपणे सोडविते. त्यानंतर भक्ती बर्वे यांनी गिरिश कर्नाड यांच्या 'नागमंड' या कन्नड नाटकाचे मराठी रूपांतरांत काम केले. त्यानंतर वसंत कानेटकर यांचे 'माणसाला डंख मातीचा' चि.त्र्यं.खानोलकर यांचे 'अजब न्याय वर्तुळाचा' मोहन राकेश यांच्या 'आधे अधुरे' या हिंदीच्या मराठी अनुवादीत नाटकांत अरविंद देशपांडे यांच्या दिग्दर्शनाखाली काम केले. त्यानंतर अशोक पाटोळे यांच्या 'आई रिटायर्ड होते' या नाटकांत प्रमुख भूमिका केली. गोळ्याचे नाटककार वसंत कामत यांचे 'हँडस् अप' या रहस्यमय विनोदी नाटकांत नायिकेचे काम केले. हे नाटक सदाशिव अमरापूरकर यांनी दिग्दर्शित केले होते. या नाटकांत भक्ती बर्वे सह सदाशिव अमरापूरकर, अविनाश मसुरेकर, राजा नाईक यांनी भूमिका केल्या होत्या. भक्ती बर्वे या चित्रपटांत फारशा रमल्या नाहीत, तरीही त्यांनी एनएफडीसी च्या कुंदन शाह यांनी दिग्दर्शित केलेल्या राजकारण, नोकरशाही, वृत्तपमाध्यमे यावर भाष्य करणाऱ्या 'ज्ञानेभी दो यारो' या १९८३ मधील चित्रपटांत 'खबरदार' नामक चित्रपटाच्या संपादिकेची प्रमुख भूमिका केली, तसेच गोविंद निहलानी यांच्या 'हजार चौरासीकी माँ या चित्रपटांत तथा भादुरी यांच्यासह भूमिक केली. मुंबई दुरदर्शनच्या कवियित्री बहिणाबाई यांच्या जीवावर महाराष्ट्र सरकारने बनविलेल्या 'बहिणाबाई' या टेलिफिल्ममध्ये त्यांनी बहिणाबाईंची भूमिका केली होती. 'मराठी बाणा' फेम अशोक हांडे निर्मित 'माणिक मोती' या गायिका माणिक वर्षा यांच्या जीवनावर व त्यांनी गाईलेल्या गाण्यांवर आधारीत कार्यक्रमांत निवेदिकेचे काम भक्ती बर्वे यांनी केले होते. हिंदी चित्रपटांत व नाटकांत काम करणारे सुप्रसिद्ध अभिनेते शफी इनामदार यांच्यासोबत यांनी लग्न केले होते, पण १९९६ मध्ये त्यांचे हदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. भक्ती बर्वे यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मराठी रंगभूमिवरील योगदानासाठी १९९० मध्ये मिळाला होता. भक्ती बर्वे यांनी पु.ल.देशपांडे, त्यांची नाटके व फुलराणी या विषयातील एक कार्यक्रम स्वतः बसविला होता. त्याचे नाव 'फुल फुलराणाी आणि मी असे होते. या कार्यक्रमाचे सादरीकरण नाशिक जवळील वणी या गांवी ११ फेब्रुवारी २००१ रोजी करून त्या रात्री मुंबईला परताना पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेवर पहाटे २.४५ वाजता भातण बोगद्याजवळ त्यांच्या कारला अपघात झाला व त्यांतच त्यांचा मृत्यू झाला. रंगभूमी गाजविणाऱ्या फुलराणीने वयाच्या ५२ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. रजनीश जोशी यांनी भक्ती बर्वे यांचेवर पुस्तक लिहिले यांचे नांव होते.

'एक होती फुलराणी भक्ती बर्वे' •

# 'कमलाकर सारंग आणि 'सखाराम बाईंडर'

**कमलाकर सारंग यांचे नाव उच्चारले की समोर येते ते सखाराम बाईंडर हे अजरामर नाटक हे नाटक विजय तेंडुलकर यांनी लिहिले होते. हे नाटक निळू फुले आणि लालन सारंग यांच्या अप्रतिम अभिनयाने खूप गाजले होते. या नाटका भोवती वादळ उठले होते. कोर्टकचेऱ्या झाल्या होत्या पण या सगळ्या अग्निदिव्यातून हे नाटक फिनिक्स पक्षाप्रमाणे बाहेर पडले. भारतीय नाट्यसृष्टीत या नाटकाने इतिहास घडवला. नाटक भारतीय रंगभूमीवर मैलाचा दगड ठरले.**

श्री. श्रीराम शेटये





हे नाटक कमलाकर सारंग नावाच्या अवलियाने वयाच्या अडतिसाव्या वर्षी दिग्दर्शित केले होते. यात फारसं आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. कारण कमलाकर सारंग यांना लहानपणापासूनच रंगभूमीने भूरळ घातली होती. मालवण टोपीवाला हायस्कूल येथे असताना त्यांनी ना. सी. फडके यांच्या 'जानकी' या नाटकात म्हाताऱ्याची भूमिका केली होती. शालेय जीवनात चढलेली ही नाटकाची नशा आयुष्यभर कधीच उतरली नाही. सारंग यांना मुंबईत महानगरीने नाव प्रतिष्ठा पैसा सर्वकाही दिलं पण सुरुवातीच्या काळात सारंग यांना प्रचंड गरिबीचा सामना करावा लागला. त्यांचे आई-वडील म ाजगावला एका छोट्याशा खोलीत राहायचे. कमलाकर सारंग यांनी सन १९५३ मध्ये रुईया कॉलेज येथे आर्ट्सला ॲडमिशन घेतले. त्याकाळी गिरगावमध्ये भारतीय विद्या भवनतर्फे आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा घेतल्या जायच्या.

त्यावर्षी रुईया तर्फे अनंत काणेकर यांच्या 'सशाची चित्रे' या नाटकाचा प्रयोग करायचे ठरले. सारंग यांनी प्रयत्न करूनही त्यांना नाटकात भूमिका मिळाली नाही. कमलाकर सारंग यांनी थेट प्राचार्यांना भेटून वशिलेबाजीचा आरोप लावला. प्राचार्यांनी त्यांना कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये नाटक करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार सारंग यांनी 'सिलेक्शन नाटक' ही एकांकिका सादर केली. जी त्यांचा वर्गमित्र यशवंत रांजणकर यांनी लिहिली होती. त्यासाठी रांजणकर यांची निवड झाली नाही हे वास्तव समोर ठेवत नवीन एकांकिका लिहिली. ही एकांकिका बरीच गाजली. त्यांनी ही एकांकिका भवनच्या स्पर्धेत सादर केली याच काळात अरविंद देशपांडे आणि आनंद पै, कमलाकर सारंग यांना शोधत आनंद भवन वर आले. मुंबई राज्य नाट्य स्पर्धेत कमलाकर सारंग यांची निवड झाली. हे नाटक होतं विजय तेंडुलकरांचे 'श्रीमंत' या नाटकात सारंग यांनी प्रौढ डॉक्टरची भूमिका केली होती. दिग्दर्शक होत्या विजया मेहता. हे नाटक प्रचंड यशस्वी झाले. त्यानंतर सारंग यांची कारकीर्द बहरत गेली. त्यांनी मागे वळून पाहिलं नाही.

या संदर्भात लालन सारंग यांनी आपल्या लिखाणात म्हटलंय, 'सखाराम सुरू झालं आणि तेरा प्रयोगांतच नाटक अश्लील आहे, अशी बोंब उठली आणि ३३ कटसकट नाटक सेन्सॉर झालं. त्यानंतर त्यावर बंदी आली. आम्ही सेन्सॉर बोर्डाविरुद्ध कोर्टात गेलो. सहा महिने लढल्यावर नाटक एकही कट न करता हायकोर्टातून सुटलं आणि पुन्हा दिमाखानं प्रयोग सुरू झाले. पुन्हा तीन महिन्यांतच पुण्यातल्या 'लिंग निर्मूलन समितीनं' तेंडुलकरांच्या नाटकांवर बंदी म्हणून 'घाशीराम कोतवाल' व 'सखाराम बाईंडर' ही नाटके होऊ द्यायची नाहीत, असा फतवा काढला. पुन्हा एकदा लढा देऊन त्यातूनही आम्ही बाहेर पडलो. या सगळ्यांतून जाताना मी व सारंग कळत-नकळत धीट होत गेलो.'' त्या म्हणतात, 'स्वत:चं सॉफिस्टिकेटेड व्यक्तिमत्त्व पूर्ण बदलून एक गावरान, रांगडी, बिनधास्त चंपा उभी करताना खूप विचार करावा लागला होता.' सारंगांनी सखारामानंतर बाईंडर नाटकाच्या वेळच्या आठवणींवर ''बाईंडरचे दिवस'' नावाचे पुस्तक लिहिले. कमलाकर सारंग यांचे २५ सप्टेंबर १९९८ रोजी निधन झाले.

कमलाकर सारंग यांच्या पत्नी अभिनेत्री लालन सारंग यांनी सांगितलेल्या कमलाकर सारंग यांच्या आठवणी...

साधारण १९६० ची घटना. मी ज्युनियर बी. ए. ला होते. सिद्धार्थ कॉलेज-आनंद भवनच्या हॉलमध्ये आम्ही काहीजण इंडियन नॅशनल थिएटरच्या नाट्यस्पर्धेच्या सिलेक्शनसाठी जमलो होतो. तोपर्यंत रंगभूमीशी काहीही संबंध नसलेली, लोकांसमोर येऊन धीटपणे काहीही बोलू न शकणारी मी- तिथे का आले होते? मलाच अजूनही पडलेलं कोडं! ..पण काहीतरी घडायचं होतं, हे नक्की.

हॉलमध्ये सात-आठ मुलं व मी धरून तीन मुली होत्या. समोर नाटकाचे दिग्दर्शक अरविंद देशपांडे बसले होते. अर्थात त्यांचं नाव मी प्रथमच ऐकत होते व त्यांना प्रथमच पाहत होते. त्यांच्या शेजारी एक उंच, काळासावळा, तेजस्वी डोळ्यांचा मुलगा बसला होता. मुलगा कसला? पंचविशीतला तरुणच म्हणा ना! पांढरेशुभ्र कडक इस्त्रीचे कपडे, मनगटावर अधिक वर बांधलेले स्टीलचे घड्याळ व डोक्यावर घनदाट कुरळे केस. त्याला बघताक्षणी तो मनात कुठेतरी उतरला खरा. त्याचे भेदक डोळे त्याच्यातला आत्मविश्वास दाखवत होते. कोण असेल हा? कोणाला बरं विचारावं? तिथे तसं कुणीच ओळखीचं नव्हतं. नंतर कळलं- तो कमलाकर सारंग होता. सिद्धार्थ लॉ कॉलेजमधून स्पर्धेचं नाटक बसवत होता व इथे तो अरविंद देशपांडेंचा मित्र व सिद्धार्थचा आर्ट्सचा माजी विद्यार्थी म्हणून आला होता.

सीनियर बी. ए. ला स्पर्धेसाठी 'राणीचा बाग' नाटक ठरलं. मी त्यात होतेच. आणि आता दिग्दर्शक होता स्वत: कमलाकर सारंग. या कालावधीत सारंगशी ओळख झाली, पण त्याच्या शिष्ट वाटण्यामुळे फारसं बोलणं होत नव्हतं. पण त्याच्या मित्र-मैत्रिणींच्या ग्रुपमध्ये माझा प्रवेश झाला.

सारंग पाहताक्षणीच मनात ठसला होता. पण त्याची त्याच ग्रुपमध्ये एक मैत्रीण होती व तिच्याबरोबर तो लग्न करणार आहे अशी कुणकुणही लागली होती. त्यामुळे पुढे काही घडण्याची शक्यताच नव्हती! पण नाटकाची थोडीशी वाटचाल सुरू झाली. तसेच त्यावेळी सारंग त्याच्या संस्थेतर्फे इंटर-बँकिंग स्पर्धेच्या एकांकिका बसवीत होता. त्यात काम करत गेले. त्याच्याबरोबर झालेल्या ओळखीत त्याच्या अनेक पैलूंचं दर्शन घडत होतं. तो बर्माशेलमध्ये नोकरीस होता. घरची सगळी जबाबदारी त्याच्यावर होती. असं असलं तरी त्याचा हात सढळ होता. सगळे एकत्र चहाला गेलो की पैसे देण्यासाठी त्याचा हात प्रथम खिशात जायचा. मधल्या काळात त्याने एक विलक्षण गोष्ट केली; जी कुणी कधी करेल असं मला वाटत नाही.

एका संध्याकाळी त्याने आम्हा सर्व मित्र-मैत्रिणींना नेहमीच्या ठरलेल्या जागी चहाला बोलावलं. तसे तर आम्ही नेहमी सगळे भेटायचोच; पण आज त्याने अचानक असं का बोलावलं आहे याची कोणालाच काही कल्पना येत नव्हती. संध्याकाळी फ्लोरा फाऊंटनच्या जवळ असलेल्या आमच्या ठराविक इराण्याच्या हॉटेलमध्ये आम्ही जमलो. तो आला, पण त्याची ती खास मैत्रीण मात्र आज त्याच्याबरोबर नव्हती. चहापाणी होईपर्यंत इतर गप्पा झाल्या. पण आजचं हे खास आमंत्रण कशासाठी, हे अजूनही कळत नव्हतं. त्याने खिशातून सिगरेट काढून शिलगावली आणि शांतपणे झुरके घेत तो बोलता झाला. 'उद्या तिच्या (त्याच्या खास मैत्रिणीच्या) साखरपुड्याची बातमी पेपरात येणार आहे. ती वाचल्यावर तुम्ही मला फोन कराल, माझं सांत्वन करायला याल, असं काही तुम्ही करू नये म्हणून मी स्वत:च, आधीच ही बातमी सगळ्यांना देतो आहे.' किती शांतपणे सांगत होता तो! आपल्या मनाच्या यातना बाहेर अजिबात दिसणार नाहीत याची खबरदारी त्याने घेतली होती. सगळेच हादरून गेले होते. आणि मी त्याच्यावर जीव टाकणारी.. खूपच भावविवश झाले होते. असं कसं केलं तिने? त्यावेळी खूप राग आला होता मला तिचा. पण सगळेच गप्प होते. त्यानंतर सर्वजण विखुरले. त्याच्या या स्वभावाचे अनेक कंगोरे मी त्याच्याबरोबरच्या सहवासात नंतर अनुभवले.

त्यानंतर आम्ही जवळ आलो ते चार्टर्ड बँकेची एकांकिका बसवताना. तालीम संपल्यावर आम्ही एकत्र बाहेर पडून माझ्या लॅमिंग्टन रोडवरच्या घरी पोहोचताना नाक्यावर गप्पा मारूनच मी घरी जात होते. यादरम्यान आम्ही एकत्र असायचो.. मित्र-मैत्रिणींपासून वेगळे असे. त्यामुळे आमची मैत्री घट्ट होत गेली. आणि एका संध्याकाळी दोघांची ऑफिसेस सुटल्यावर गिरगाव चौपाटीवरील एका हॉटेलात चहा घेत असताना त्याने मला विचारलं- 'मला तू आवडतेस. तुलाही मी आवडत असणार. तुला जर माझ्याशी लग्न करावेसे वाटत असेल तर त्याला माझी ना नाही.'

लग्नाबद्दल विचारलं तेसुद्धा अशा तिरकस पद्धतीनं. या गोष्टीची मला आतून कल्पना होतीच. पण मी 'विचार करून सांगते,' असं उत्तर दिलं. कसला विचार आणि कसलं काय? हे सगळं माझ्या अपेक्षेप्रमाणेच घडत होतं आणि दोन दिवसांतच मी त्याला होकार देऊन मोकळी झाले. आता घरी सांगण्याची वेळ आली होती. दुसऱ्या दिवशी वडील दाढी करत असताना मी बोलती झाले.

''पपा, मी लग्न करायचं ठरवलं आहे.''

''सारंगशी ना?'' हा प्रश्न विचारून वडलांनी मला चकित केलं.

यांना कसं कळलं? मांजर जरी दूध चोरून पीत असलं तरी सगळ्यांनी ते पाहिलेलं असतंच. तसं आमचं नाक्यावरचं भेटणं वडलांच्या लक्षात आलेलं होतं. घरून विरोध झाला नाही. त्यानेही त्याच्या घरी सांगितलं. जातीबाहेरची मुलगी- हा प्रश्न तिथे आलाच. पण मोठा, कमावता मुलगा.. त्याच्या मनाविरुद्ध जाता येणार नाही म्हणून ती मंडळीही गप्प बसली.

लग्न ठरवलं खरं; पण राहणार कुठे, हा मोठाच प्रश्न होता. दुसरं घर घेण्याची सारंगची ऐपत नव्हती. आणि आहे ते घर विकून दुसरीकडे मोठ्या घरात राहण्याची त्याच्या आई-वडिलांची इच्छा नव्हती. म्हणजे वेगळं घर शोधणं आलंच. आता आमच्या संध्याकाळच्या भेटी या प्रश्नाने सुरू व्हायच्या आणि उत्तर न सापडताच संपायच्या. त्यासाठी लग्नाची तारीख एक वर्ष पुढची ठरवली. रोज ऑफिस सुटल्यावर गेटवे ऑफ इंडियापर्यंत जायचं आणि तिथे बसून 'पुढे काय?' हा प्रश्न सोडवायचा. सारंगकडे महिन्याचा पगार सोडून काहीही शिल्लक नव्हती. त्यात घरची एवढी जबाबदारी! कोणाकोणाला सांगून घर बघत होतो; पण साधं डिपॉझिट देण्याएवढे पाच हजार रुपये कुठून आणायचे? कोण देणार? आता ही रक्कम फालतू वाटेल, पण त्या काळात- बापरे! एवढे पैसे? पार्ले पूर्वेला एक जागा मिळाली व मोठ्या मिनतवारीने सारस्वत बँकेकडून लोन घेऊन पैसे भरले. सहा महिन्यांनी जागा ताब्यात मिळणार. आणि लग्नाची तारीख तर जवळ आली होती.

लग्नपत्रिका वाटणं सुरू झालं आणि आठवडा असताना सुरेश खरे आमचा मित्र- त्याच्या घरी आमंत्रणाला गेलो. त्याने मला घर सुचवलं. त्याच्याबरोबर लगेच मालकाच्या घरी गेलो. त्याची फॉर्जेट हिल, गवालिया टँकजवळची रस्त्यावरच मुख्य दरवाजा उघडणारी एक खोली मिळाली. भाडं साठ रुपये. काही का असेना, पण लग्नानंतर आमचं घर होईपर्यंत सुरेश खरेच्या मदतीने डोक्यावर एक छप्पर आलं होतं. आवश्यक सामान घेतलं आणि ७ जून १९६४ रोजी लालन पैंगणकरची 'लालन सारंग' झाले.

एका वर्षातच ६ जूनला राकेशचा.. आमच्या एकुलत्या एक मुलाचा जन्म झाला. मी नऊ महिन्यांची गरोदर असताना सारंगने मला विचारलं, 'लालन, मी बर्माशेलची नोकरी सोडतोय. तुला चालेल?' मी क्षणभर अवाक् झाले. आता माझी एकटीची नोकरी.. त्यात माझी ही अवस्था! एवढी मोठी दोन संसारांची जबाबदारी कशी पेलणार मी? यावेळेपर्यंत त्याच्याकडून मिळालेला हा दुसरा धक्का होता. आता वाटतं, एकतर मी मोठ्या धीराची होते, किंवा माझा त्याच्यावरचा विश्वास असेल.

''तुला दुसरी नोकरी मिळेल?''

''हो. नक्की मिळवेन.''

''मग हरकत नाही. नोकरी सोड.''

त्यानं ती नोकरी सोडली व महिन्याभराच्या आत रेमिंग्टन रॅण्डची नोकरी धरून तो ट्रेनिंगसाठी कलकत्त्याला गेला आणि इथं मुंबईत राकेशचा जन्म झाला. राकेशला आईकडे सोपवून मी पुन्हा कामावर रुजू झाले. आता सगळं छान चाललं होतं. थोडे पैसे घरात जास्तीचे येऊ लागले होते आणि टाटाम धली चांगली नोकरी सोडून देण्याचं खूळ माझ्या डोक्यात शिरलं. अन् माझी नोकरी मी सोडलीही. वर्षभर पूर्ण संसाराकडे लक्ष दिल्यावर १९६८ साली मी पूर्णपणे व्यावसायिक नाटकांकडे वळले.

आणखी एक मोठा धक्का पचवायचा होता. १९७२ ला 'सखाराम बाईण्डर' हे नाटक आम्ही रंगमंचावर आणलं. सारंगचं व्यावसायिकदृष्ट्या दिग्दर्शन केलेलं पहिलं नाटक. तेरा प्रयोगानंतर त्यावर आलेली सेन्सॉरशिप, कोर्टातला खटला, नाटकावर आलेले अनेक प्रवाद.. या सगळ्याला तोंड देत आम्ही ती केस जिंकलो. त्यानंतर पुन्हा शिवसेनेकडून बंदी. त्यावरचे आक्षेप दूर करत पुन्हा सुरू झालेले प्रयोग व या सगळ्यावर ताण म्हणून सारंगने त्या काळात नोकरीकडे दुर्लक्ष केल्यामुळे कंपनीकडून सारंगकडे झालेली राजीनाम्याची मागणी. सगळ्याच गोष्टी वेगानं अंगावर धावून येत होत्या. आणि पुन्हा एक धक्का!

''मी नोकरी सोडतोय.''

''पण मग दुसरी नोकरी करणार? मिळेल?''

''हो. नक्की मिळेल.''


''ठीक आहे, सोड नोकरी.'' (पुन्हा एकदा माझा त्याच्यावरचा विश्वास!)

सारंगने नोकरी सोडली आणि दुसरी नोकरी न शोधता तो व्यावसायिक रंगमंचावर निर्माता-दिग्दर्शक म्हणून कार्यरत झाला. मग मी माझी दुसरी संस्था 'कलारंग' स्थापन केली आणि 'अभिषेक' व 'कलारंग' या आमच्या दोन संस्थांतर्फे अनेक नाटकांची आम्ही निर्मिती केली. आमचं खासगी व व्यावसायिक जीवन एकमेकांच्या हातात हात घालून मोठ्या दिमाखात सुरू राहिलं.

१९९५ च्या दरम्यान आणखी एक मोठा धक्का बसणार आहे याची आम्हा दोघांनाही कल्पना नव्हती. पण नियतीचा खेळ! सारंगला पार्किनसन्सने झपाटलं. आम्ही दोघेही पूर्णपणे हादरून गेलो. सारंगने पुण्यात येऊन ट्रीटमेंटला सुरुवात केली व नंतर त्याला पुण्यात बरं वाटेल म्हणून त्याच्या हट्टापायी आम्ही दोघं पुण्यात कायमचे वास्तव्याला आलो. त्याही परिस्थितीत पुण्याचं घर सजवलं आणि पुणेकर झालो. तो दिवस होता- 'दसरा' १९९६.

सारंगची ट्रीटमेंट सुरू झाली. पण त्याच्या प्रकृतीत सुधारणा न होता ती आणखीनच खालावत गेली. त्याचा भरदार, सुंदर आवाज कमी होत जाऊन, तो काय बोलतो आहे, हे लक्ष देऊन ऐकल्याशिवाय कळेनासं झालं. हाताची थरथर होऊ लागली आणि त्याचं कित्ता गिरवावा असं देखणं लेखन बंद झालं. मग तो कॉम्प्युटरचा उपयोग करून मराठीमध्ये लेखन करण्याचा प्रयत्न करत असे. काही नवीन, तर काही पूर्वीचंच लेखन तो करत राहिला. मी ते सर्व बघण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हते. जाऊ दे, काहीतरी लिहिण्यात त्याचं मन रमतंय म्हणून त्याला प्रोत्साहन देत राहिले. आशावाद आणि जिद्द हा त्याचा स्थायीभाव. मग ती 'सखाराम बाईंडर'ची केस असो, की स्वत:चं जगणं.. ही जिद्द त्याने शेवटपर्यंत सोडली नाही. तो चालताना सारखा पडत असे. त्याला तोल सावरता येत नव्हता. त्याला चालताना आधार म्हणून घरात सगळीकडे बार बसवून घेतले. तरीही त्याचं पडणं थांबलं नाही. मग हॉस्पिटल, पुन्हा घर. त्यात त्याचं नळीनं खाणं सुरू झालं. लघवीचा त्रास सुरू झाला. बेडवर पडून पडून बेड- सोअर्स झाले. शेवटचा उपाय म्हणून मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये ठेवलं. पण हातात काही उरलं नाही याची डॉक्टरांनी जाणीव करून दिली. त्याचे शारीरिक हाल बघून माझे भयंकर मानसिक हाल होत होते. यातून त्याची सुटका व्हावी असं वाटत होतं; पण मी त्याच्याशिवाय कशी जगणार होते?

२५ सप्टेंबर १९९८ हा त्याचा शेवटचा दिवस. आत्तापर्यंत तो होता, पण आता कधीच दिसणार नाही, या कल्पनेने त्याला नेताना आक्रोश करीत मी सैरभैर झाले होते. एकच समाधान, की त्याची शुश्रुषा करायला मी- त्याची बायको त्याच्या सोबतीला होते. •



ठिपके जुळवा



# ज्यूसेप्पेची गोष्ट

इटालियन लोककथा

खूप वर्षांपूर्वी इटलीतल्या डोंगराळ गावात ज्यूसेप्पे नावाचा एक गरीब माणूस राहत होता. तो रोज शेतात काम करायचा. लाकूड तोडायचा. पण कितीही मेहनत केली तरी त्याच्याकडे पुरेसे अन्न नसायचे. त्याचे कपडे फाटके होते. त्याचे घर म्हणजे झोपडी होती.

एके दिवशी संध्याकाळी तो थकून भागून चालत घरी येत होता. अचानक त्याला रस्त्यात एक साधूमहाराज भेटले. त्यांनी विचारले, तू एवढा दमलेला का दिसतोस? ज्यूसेप्पेने आपली गरीबीची परिस्थिती सांगितली. त्याचा प्रामाणिकपणा आणि चांगले मन पाहून साधूमहाराजांनी त्याला एक छोटीशी पिशवी दिली.



'ही जादूची पिशवी आहे. तुला जे काही हवे असेल ते यातून मिळेल. पण लक्षात ठेव, फक्त गरजेपुरतेच मागायचे. लोभ केलास तर पिशवीची जादू निघून जाईल.'साधूमहाराज म्हणाले.

ज्यूसेप्पे घरी आला आणि पिशवीकडे पाहून म्हणाला, माझ्या कुटुंबाला भरपूर जेवण हवे. आणि क्षणात पिशवीतून गरमागरम जेवण बाहेर आले! मग त्याने कपडे मागितले. घर मागितले. त्याला सगळे मिळाले. त्याचे आयुष्य खूप सुंदर झाले. गावकऱ्यांनाही त्याने मदत केली.

पण काही महिन्यांनी त्याच्या मनात लोभ निर्माण झाला. 'मला सोन्याचे ढीग हवेत. मला मोठा महाल हवा. 'तो पिशवीला म्हणाला. पण पिशवीतून काहीही बाहेर आले नाही. पुढच्याचक्षणी आधी दिलेली सगळी संपत्ती देखील नाहीशी झाली.

ज्यूसेप्पे परत गरीब झाला. पण ज्यूसेप्पेला आपली चूक कळली होती. त्याला समजले होते, की खरी श्रीमंती म्हणजे पैसा नव्हे तर समाधान. त्याने पुन्हा कष्टाने काम करण्यास सुरुवात केली. त्याला कळून चुकले होते की,लोभामुळे सर्व काही नष्ट होते. पण चांगले मन आणि समाधान असेल तर जीवन नेहमी सुंदर होते.

# कसा आहे आपला मेंदू?

जाणून घ्या

मुलामुलींनो, आपला मेंदू शरीरावर नियंत्रण ठेवतो. मेंदूमार्फत शरीराच्या विविध अवयवांना संदेश पोहोचवला जातो. आपल्या मेंदूचं वजन दीड किलोपर्यंत असतं. मानवी मेंदू खूप सक्षम असतो. आपल्या मेंदूमध्ये बरेच सेन्सर्स आणि प्रोसेसर्स असतात. माणसाच्या मेंदूवर आजवर बरंच संशोधन करण्यात आलं आहे. आपला मेंदू एका सेकंदात जवळपास १०० कोटी क्रिया करू शकतो. काय, वाचून आश्चर्य वाटलं ना? पण हे खरं आहे. माणूस आपल्या मेंदूच्या क्षमतेपैकी फक्त दहा टक्के क्षमतेचाच वापर करतो, असं म्हटलं जातं. पण प्रत्यक्षात हा गैरसमज आहे. माणूस संपूर्ण मेंदूचा वापर करतो. जागेपणीच नाही तर झोपेतही मेंदूचं काम सुरू राहतं. माणूस झोपेतही मेंदूची दहा टक्क्यांपेक्षा जास्त क्षमता वापरतो. मेंदूचा आकार आणि बुध्यांक किंवा हुशारी यांचा काहीच संबंध नसतो. आता स्पर्म व्हेलच्या मेंदूचा आकार मानवी मेंदूपेक्षा पाच पटींनी मोठा असतो. पण माणूस स्पर्म व्हेलपेक्षा जास्त हुशार असतो. त्यामुळे मेंदूचा आकार आणि हुशारी यांचा काहीच संबंध नाही हे तुमच्या लक्षात आलं असेल...



# इजिप्तची देवीमाता - नाईल

जीवनदायिनी

नाईल ही जगातील सर्वात लांब नदी मानली जाते. ती सुमारे६,६५० किलोमीटरलांब आहे. नाईल नदीचे दोन प्रमुख प्रवाह आहेत. व्हाईट नाईल आणि ब्ल्यू नाईल. व्हाईट नाईलचा उगम पूर्व आफ्रिकेतल्या व्हिक्टोरिया सरोवरातून होतो. तर ब्ल्यू नाईलचा उगम इथिओपियातील टाना सरोवरातून होतो. हे दोन्ही प्रवाह सुदानची राजधानी खार्तूम येथे मिळतात आणि पुढे एकत्र इजिप्त देशातून वाहत भूमध्य समुद्रात मिळतात.

इजिप्तचे प्राचीन नाव मिसर आहे. नाईल नदीमुळेच प्राचीन मिसर संस्कृती विकसित झाली. नदीच्या काठावर सुपीक माती असल्याने शेती हा प्रमुख व्यवसाय बनला.नाईल नदी तिच्या रुंद पात्रामुळे वाहतुकीसाठी आणि मासेमारीसाठीही महत्त्वाची ठरली. प्राचीन इजिप्शियन लोक नाईलच्या प्रवाहाला आकाशाचा देवओसिरिसयांचा आशीर्वाद मानतात. जेव्हा नाईलचे पाणी वाढते, तेव्हा देव ओसिरिस लोकांना समृद्धी देतो असे मानले जाते.



आणखी एका कथेनुसार एकदा दुष्काळ पडला आणि नाईलचे पाणी आटले. लोकांनीओसिरिसची प्रार्थना केली. ओसिरिसची पत्नी देवी इशिसला लोकांची दया आली. तिने नदीला पुन्हा भरभरून पाणी दिले. इजिप्तमधील लोक म्हणतात, की त्या दिवसापासून नाईलचे पाणी कधीही आटत नाही.

नाईल नदीवर अनेक मोठी धरणे आणि वीजकेंद्रे आहेत.अस्वान शहराजवळ बांधलेले अस्वान हाय डॅम हे सर्वात मोठे धरण आहे. या धरणामुळेलेक नासेरनावाचे कृत्रिम सरोवर तयार झाले आहे.हे जगातील सर्वात मोठ्या कृत्रिम सरोवरांपैकी एक आहे.ब्ल्यू नाईलवरील रोजरेस धरण, सुदान येथीलमेर्वे धरण हीआणखी काही महत्वाची धरणे आहेत. इथिओपिया येथे २०११ पासून बांधकाम सुरू असलेला ग्रँड इथिओपियन रेनेसाँस डॅम हा ब्ल्यू नाईलवरील आफ्रिकेतील सर्वात मोठा हायड्रोइलेक्ट्रिक प्रकल्प आहे.

# बना व्हीएफएक्स तंत्रज्ञ

कोण होणार?

मुलांनो, तुम्ही व्हीएफएक्सबद्दल ऐकलं असेल. चित्रपट, मालिका, व्हिडिओ गेम्समध्ये विविध इफेक्ट्सचा वापर होतो. हे विज्युअल इफेक्ट्स असतात. यालाच व्हीएफएक्स तंत्रज्ञान असं म्हटलं जातं. व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचा वापर करून दृश्यं तयार केली जातात. चित्रपटातली ही दृश्यं बघून आपण टाळ्या पिटतो. सध्या व्हीएफएक्सला बरीच मागणी आहे. हे क्षेत्र विस्तारत जाणार आहे. त्यामुळे तुम्ही व्हीएफएक्स तंत्रज्ञ म्हणून काम करू शकता. या क्षेत्राविषयी. व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचे तीन, सहा आणि बारा महिन्यांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही संस्थांमध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रमही चालवला जातो. व्हिडिओ प्रोडक्शन, ग्राफिक डिझाइन, मोशन ग्राफिक्स, कॅमेरा ट्रॅकिंग, फिल्म रिस्टोरेशन अशी तंत्रं शिकवली जातील. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता नसते. बारावी किंवा पदवीनंतर तुम्ही या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता. कॉम्प्युटरचं ज्ञान असेल तर या क्षेत्रात जास्त चांगली प्रगती करता येईल.


व्हीएफएक्स तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून चित्रपट, मालिका, ॲनिमेशन, व्हिडिओ गेम्स, ॲप्स, व्हिडिओ, जाहिराती तसंच मनोरंजनक्षेत्राशी संबंधित इतर क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकाल. माध्यमक्षेत्रात ग्राफिक डिझायनर तसंच व्हीएफएक्स तंत्रज्ञांना बरीच मागणी आहे. महानगरांसोबतच छोट्या शहरांमध्येही बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे काही तरी वेगळं करायचं असेल तर व्हीएफएक्सच्या क्षेत्रात काम करायला हरकत नाही.



# तलावांचं शहर... भोपाळ

सफर शहरांची

दोस्तांनो, आपण मध्य प्रदेशची राजधानी भोपाळबद्दल जाणून घेऊ. तलावांचं शहर अशी भोपाळची ओळख आहे. या शहरात तलावांची संख्या बरीच जास्त आहे. भोपाळमध्ये १५ पेक्षा जास्त छोटे-मोठे तलाव आहेत. भोपाळमध्ये वनविहार राष्ट्रीय उद्यानही आहे. दोस्त मोहम्मद खान यांनी भोपाळ शहर वसवलं. मुस्लीम राण्यांच्या काळात या शहराची खूप भरभराट झाली. इथली ताज-उल ही मशीद भारतातलीच नाही तर आशिया खंडातली सर्वात मोठी मशीद आहे. ही मशीद म्हणजे मुघल स्थापत्यकलेचा उत्तम नमुनाच आहे. भोपाळमध्ये गेल्यानंतर ताज महाल, बिर्ला मंदिर, मिंटो हॉल, मोती मशीद ही ठिकाणं बघायला हवीत. भोपाळमधला सुलेमानी चहा खूप प्रसिद्ध आहे. हा चहा गोड आणि खारट असतो. वेगळ्या चवीचा हा चहा एकदा तरी चाखायला हवा. इथला राजू टी स्टॉल खूप प्रसिद्ध आहे. सुलेमानी चहाप्रमाणेच भोपाळी पान खूप प्रसिद्ध आहे. यासोबतच लस्सीवाला फालुदा खाण्यासाठीही लोक इथे येतात.



# ओळखा पाहू

जिज्ञासा

१) भारताने एकदिवसीय क्रिकेटचा विश्वचषक किती वेळा जिंकला आहे?
२) शांतीचा संदेश देणारा रंग कोणता?
३) दार्जिलिंगमध्ये कोणतं पिक होतं?
४) चॉकलेट्ससाठी प्रसिद्ध असलेला आफ्रिकेतला देश कोणता?
५) मायक्रोसॉफ्टचे संस्थापक कोण?
६) सेऊल ही कोणत्या देशाची राजधानी आहे?
७) गिझा पिरॅमिड्स कुठे आहेत?
८) जगातलं सर्वात घनदाट जंगल कोणतं?
९) स्वराज पक्षाची स्थापना कोणी केली?
१०) ब्रिटिशांनी आपली राजधानी कोलकात्याहून दिल्लीला कधी हलवली?

उत्तर: १) दोन वेळा २) पांढरा ३) चहा ४) घाना ५) बिल गेट्स ६) दक्षिण कोरिया ७) इजिप्त ८) अ‍ॅमेझॉन ९) मो. ग. रानडे १०) १९११

# ओळख वाद्यांची - तबला

भारतीय शास्त्रीय संगीतात तबला हे सर्वात महत्त्वाचे तालवाद्य मानले जाते. तबला आणि डग्गा अशी ही जोडी असते. या जोडीतील तबला उजव्या हाताने वाजवला जातो, तर बाया किंवा डग्गाडाव्या हातानेवाजवला जातो.चांगल्या प्रतीचा खैराचा किंवा शिसवी लाकडाचा तुकडा आतून कोरून पोकळ बनवला जातो.या पोकळ भांड्याच्या तोंडावर जनावरांचे चामडे घट्ट बसवण्यात येते. या कातडी आवरणास पुडी असे म्हणतात. यावर आणखी एक गोल किनार केवळ कडांवर बसवण्यात येते. यास चाट किंवा गोट म्हणतात. तबला आणि डग्गा यांच्या पृष्ठभागावर मधोमध काळी शाईसारखी गोलाकार पेस्ट लावलेली असते, तिला श्याही म्हणतात. तबल्याची पट्टी म्हणजेच आवाजाचा पोत शाईच्या थरावरून निश्चित होतो. ही पट्टी निश्चित करण्यास मुख्यत्वे बाजाच्या पेटीचा वापर करतात.ही श्याही ध्वनीला विशिष्ट स्वर आणि गडगडाट देते. वादन शैलीतील फरकांमुळे तबल्यात स्वतःची वेगळी वैशिष्ट्ये असलेली अनेक घराणी निर्माण झाली आहेत. दिल्ली घराणे,लखनौ घराणे, पंजाब घराणे, बनारस, इंदूर, फरूखबाद, अजवाडा ही तबलावादनातील प्रसिद्ध घराणी आहेत. तबल्याच्या बोल नावाच्या विशिष्ट ठेक्यांमधून विविध ताल रचले जातात. दादरा, कहरवा, झपताल, त्रिताल हे लोकप्रिय ताल आहेत. तबल्याचा वापर भक्तिगीत, भजन, नाट्यसंगीत, गझल, फिल्मी गाणी आणि आजच्या फ्युजन संगीतातही मोठ्या प्रमाणावर होतो. उस्ताद अहमद जान थिरकवा, अल्ला रक्खा, झाकीर हुसेन अशा अनेक महान कलाकारांनी तबल्याला जागतिक ओळख मिळवून दिली. तालाचे सौंदर्य आणि गती यामुळे तबला कोणत्याही संगीताला जीवनदान देतो.




# तंत्रकरामतींचं भन्नाट जग

न्यू टेक

सीईएस हा जगातला सर्वात मोठा इलेक्ट्रॉनिक्स शो आहे. लास वेगासमध्ये या इलेक्ट्रॉनिक्स शोचं आयोजन केलं जातं. इथे भन्नाट गॅझेट्स, नवं तंत्रज्ञान सादर केलं जातं. अशाच काही हटके तंत्रज्ञानावर नजर टाकू या.

- बाथरूम फिटिंग्ज बनवणाऱ्या कोहलर या कंपनीने नुमी २.० हे इंटेलिजंट टॉयलेट सादर केलं आहे. या टॉयलेटमुळे पाण्याची बचत होते. शिवाय ते स्वत:च स्वत:ची स्वच्छता करतं. त्यामुळे हे टॉयलेट स्वच्छ करण्याची गरज भासत नाही.
- पोलन रोबोटिक्स या कंपनीने रिची नावाचा रोबो तयार केला आहे. या रोबोमध्ये माणसासारखे गुण आहेत. रिचीचा वापर वेगवेगळ्या कामांसाठी केला जाणार आहे. गरजेनुसार या रोबोच्या शरीराचे भाग वेगळे करता येतात.
- नियोफॅक्ट या कंपनीने स्मार्ट ग्लोव्हज सादर केले आहेत. हे ग्लोव्हज ॲपला कनेक्ट करता येतात. हे ग्लोव्हज घालून गेमही खेळता येतो.
- बॅग किंवा सामानाच्या सुरक्षेसाठी एक अनोखं उपकरण तयार करण्यात आलं आहे. 'मिमिक गो' असं या उपकरणाचं नाव आहे. यातले सेन्सर्स हालचाल ओळखू शकतात. कपाट, बॅग, दार यापैकी कशालाही हे उपकरण लावता येईल. सामान हरवलं किंवा चोरीला गेलं तर युजरला सूचना मिळू शकेल.
- पाळीव प्राण्यांच्या तब्बेतीबाबत जाणून घेण्यासाठी लँगुआलेस नावाचं उपकरण उपयुक्त ठरू शकतं.



## दोस्त हे मस्त

### असे हे पाणघोडे



छोट्यांनो, पाणघोडा ही माशांची एक प्रजाती आहे. तोंडाचा आकार घोड्याच्या तोंडासारखा असल्यामुळे त्याला पाणघोडा असं म्हटलं जातं. पाणघोड्याची भूक प्रचंड असते. म्हणून ते सतत चरत असतात. पाणघोड्यांना पोट आणि दात नसतात. म्हणूनच उपासमार होऊ नये म्हणून त्यांना सारखं खावं लागतं. पाणघोडे आपल्या शेपटीचा वापर शस्त्रासारखा करतात. शत्रूपासून बचाव करण्यासाठी पाणघोडे रंग बदलतात. आसपासच्या वातावरणानुसार त्यांचा रंग बदलतो. त्यांचे दोन डोळे एकाच वेळी दोन ठिकाणी बघू शकतात. म्हणजे त्यांचा एक डोळा समोर बघत असेल तर दुसरा डोळा मागे बघू शकतो. म्हणजे पाणघोडे एकाच वेळी सगळीकडे लक्ष ठेऊ शकतात!

## खादाडी


### गरमागरम नूडल सूप



मुलांनो, थंडीच्या दिवसात गरमागरम सूप प्यावंसं वाटतं. तुम्हाला नूडल्सही आवडतात. मग मस्तपैकी नूडल्स सूप बनवता येईल. यासाठी दोन गाजरं, एक टोमॅटो, बारीक चिरलेला कोबी, थोडी कांद्याची पात, एक चमचा तेल, अर्धी सिमला मिरची, मीठ, नूडल्स आणि एक चमचा कॉर्नफ्लोर असं साहित्य घ्या. सर्व भाज्यांचे छोटे तुकडे करा. आता एका कढईत तेल गरम करून घ्या. त्यात भाज्या घालून दोन मिनिटं परता. यात चार कप पाणी आणि नूडल्स तसंच मीठ घाला. आता दहा मिनिटं शिजू द्या. आता वाटीत थोडं पाणी घ्या. त्यात कॉर्नफ्लोर आणि मिरपूड घाला. नीट मिसळून घ्या. हे मिश्रण सूपमध्ये घाला. मिनिटभर शिजवा. अधूनमधून हलवत रहा. गॅस बंद करा. तुमचं सूप तयार आहे.

## स्टडी टिप्स

### करा उजळणी



मुलांनो, गणिताची भीती तुम्ही अगदी सहज घालवू शकता. यासाठी सराव आणि उजळणी या दोन गोष्टी लक्षात ठेवा. गणिताची प्राथमिक सूत्रं असतात. ही सूत्रं लक्षात ठेवली की तुम्हाला गणित जमलंच म्हणून समजा. गणिताची सूत्रं समजून घेण्यासाठी जुनी पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचा. पुस्तकं वाचून काही समजलं नाही तर शिक्षकांची मदत घ्या. पाया बळकट असेल तर गणिताचा पेपर कधीच कठीण जाणार नाही.

## योगा

### वक्रासन करून वाढवा उत्साह



दोस्तांनो, सारखा कंटाळा येत असेल, अभ्यास करण्यात, खेळण्यात किंवा कोणत्याही कामात उत्साह वाटत नसेल तर योगासनं करता येतील. काही योगासनांमुळे तुमच्यात उत्साहाचा संचार होऊ लागतो. अभ्यासात, खेळण्यात उत्साह येण्यासाठी तुम्ही वक्रासन करू शकता. हे अगदी सोपं आसन आहे. हे आसन केल्यानंतर तुमचा सगळा आळस दूर निघून जाईल.

## निवडक



### ज्ञानांकुराचे स्कूलचे क्रिडा स्पर्धेत यश

**कोलाड :** रोहा तालुक्यातील एमडीएम फ्युचर स्कूल चिंचवली येथे मंगळवार दि.२३ सप्टेंबर रोजी या स्पर्धा घेण्यात आल्या. या तालुकास्तरिय पावसाळी क्रीडा स्पर्धेत ज्ञानांकुर इंग्लिश स्कूल खांब येथील विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन करून नेत्रदीपक कामगिरी केली आहे. या स्पर्धेत ज्ञानांकुर इंग्लिश मेडीयम स्कूलच्या १४ वर्षाखालील मुलींमध्ये थालीफेक स्पर्धेत स्वरा धामणसे प्रथम, १७ वर्षाखाली मुलींमध्ये थालीफेक स्पर्धेत संस्कृती चितळकर द्वितीय, १७ वर्षाखालील मुलांमध्ये थालीफेक स्पर्धेत कर्तव्य लोखंडे द्वितीय, तसेच १४ वर्षाखालील मुलांमध्ये ४*१०० रिले स्पर्धेत रुद्र शिंदे, स्मित आमणकर, अंशु चव्हाण, वृषभ महाडिक, द्वितीय,धावण्याच्या स्पर्धेत विघ्नेश नाकटे (१५०० मी.) तृतीय, तसेच १७ वर्षाखालील मुलींमध्ये उंच उडी स्पर्धेत अक्षरा मरवडे द्वितीय, १४ वर्षाखालील मुलांमध्ये स्मित आमणकर द्वितीय, अंशु चव्हाण तृतीय, क्रमांक पटकावले. या यशासाठी शाळेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र लोखंडे रिया लोखंडे व ज्ञानेश्वर महाडिक यांचे मार्गदर्शन लाभले.

### फिनेस्टा ओपन नॅशनल टेनिस स्पर्धेचे आयोजन

**नवी दिल्ली :** ३० व्या फ़िनेस्टा ओपन नॅशनल टेनिस चॅम्पियनशिपची सुरुवात, २९ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथील, डीएलटीए कॉम्पलेक्समध्ये होत आहे. डीसीएम श्रीराम लिमिटेडचा मदतीने, ही स्पर्धा ऑल इंडिया टेनिस असोसियेशन आणि दिल्ली लॉन टेनिस असोसियेशन द्वारे आयोजित केली जाते, फ़िनेस्टा ओपन ही भारतातील सर्वात मोठी स्थानिक टेनिस स्पर्धा असून, यामध्ये देशभरातून विविध खेळाडू सहभागी होतात..एकमेव व्यापक अशी राष्ट्रीय स्पर्धा म्हणून आयोजित केल्या जाणाऱ्या या चॅम्पियनशिपमध्ये, पुरूष, महिला आणि अंडर-१८/ अंडर-१६/अंडर-१४ (मुलं आणि मुली) अशा श्रेणींमध्ये टूर्नामेंट आयोजित केल्या जातात, या स्पर्धेमध्ये आत्तापर्यंत रोहन बोपण्णा, सोमदेव देववर्मा, युकी भाम्ब्री, सानिया मिर्झा आणि ऋतुजा भोसलेसारख्या अग्रगण्य स्पर्धकांनी देखील सहभाग घेतला आहे. स्पर्धेचे नियोजन:क्वॉलिफ़ायिंग राऊन्ड पुरूष, महिला आणि अंडर-१८ सुरवात: २७ सप्टेंबर २०२५ पुरूष, महिला आणि अंडर- १८ (एकेरी आणि दुहेरी) प्रमुख स्पर्धा: २९ सप्टेंबर - ४ऑक्टोबर २०२५ अंडर - १६ आणि अंडर - १४ (मुलं आणि मुली) : ५-१० ऑक्टोबर २०२५.

### सूर्यवंशीने मोडला षटकारांचा विश्वविक्रम

**सिडनी :** युवा भारतीय फलंदाज वैभव सूर्यवंशीने बुधवारी ऑस्ट्रेलियात ७० धावांची धमाकेदार खेळी साकारताना यु-१९ विश्वचषक विजेता कर्णधार उन्मुक्त चंदचा ३८ षटकारांचा विक्रम मोडला. वैभवने यूथ वन-डेमध्ये सर्वाधिक ४१ षटकार मारण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. दुसर्या वन-डेत भारत ङ्गअफ संघासाठी खेळताना त्याने ७० धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ६ षटकार फटकावले. उन्मुक्त चंदचा विक्रम मोडलावैभव सूर्यवंशीने यूथ वन-डेमध्ये आतापर्यंत ४१ षटकार मारले आहेत. सर्वाधिक यूथ वन-डे षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो आता सर्वात पुढे पोहोचला आहे. त्याने माजी भारतीय यु-१९ वर्ल्ड चॅम्पियन कर्णधार उन्मुक्त चंदच्या ३८ षटकारांचा विक्रम मोडला. सूर्यवंशी सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३ सामन्यांची वन-डे मालिका खेळत आहे. सूर्यवंशीने दुसर्या सामन्यात अर्धशतक ठोकताना ६८ चेंडूंमध्ये ७० धावा फटकावल्या. उन्मुक्त चंदने २१ सामने खेळून ३८ षटकार मारले होते, तर सूर्यवंशीने हा टप्पा केवळ १० डावांमध्ये गाठला. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ७० धावांच्या खेळीत त्याने सहा षटकार मारले, त्यानंतर कर्णधार यश देशमुखने आर्यनच्या शानदार झेलमुळे त्याला बाद केले. सूर्यवंशीने युवा वन-डेमध्ये ५४० धावा केल्या असून, त्यापैकी २६ धावा (४१ षटकारांसह) बाऊंड्रीद्वारे आल्या आहेत. भारतीयांमध्ये सूर्यवंशी आणि चंद नंतर यशस्वी जैस्वाल तिसऱ्या स्थानावर आहे, त्याने २०१८ ते २०२० दरम्यान २७ सामन्यांमध्ये ३० षटकार मारले आहेत.



## ‘आशिया कप’ जेतेपदासाठी रंगणार
# भारत-पाक सामना



**■ १५ दिवसांत तिसऱ्यांदा आमने-सामने**
**■ संपूर्ण जगाचे या सामन्याकडे लक्ष**

| दुबई | वृत्तसंस्था |

आतापर्यंत रोलर कोस्टर प्रवास अनुभवणाऱ्या पाकिस्तानने गुरुवारी येथे रंगलेल्या व्हर्च्युअल सेमीफायनलमध्ये बांगलादेशचा एकतर्फी धुव्वा उडवला आणि आशिया चषकाच्या अंतिम फेरीत जोरदार धडक मारली. या निकालासह आशिया जेतेपदासाठी भारत व पाकिस्तान हे कट्टर प्रतिस्पर्धी पुन्हा एकदा आमने-सामने भिडणार आहेत. रविवार, दि. २८ रोजी ही ब्लॉकबस्टर फायनल रंगेल. आश्चर्य म्हणजे या १५ दिवसांत भारत-पाकिस्तान हे कट्टर प्रतिस्पर्ध्यांनी आमने-सामने भिडण्याची ही चक्क तिसरी वेळ असेल.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेटमधील संघर्ष हा जगातील सर्वात जुन्या व तीव्र क्रीडा प्रतिस्पर्धेत गणला जातो. जेव्हा जेव्हा हे दोन्ही संघ आमने-सामने उभे ठाकतात, तेव्हा तो केवळ एक सामना नसून तो इतिहास, भावना आणि अपेक्षा यांचा संघर्ष असतो. आकडेवारीपासून ते सध्याच्या कामगिरीपर्यंत भारताचे पाकिस्तानवर पारडे जड असल्याचे दिसून येते. परंतु हा हायव्होल्टेज सामना असून इथे प्रत्येक षटक आणि प्रत्येक धाव एक नवा इतिहास रचते. ५ फलंदाज, ३ अष्टपैलू, ३ गोलंदाज पाकिस्तानविरुद्ध असा असणार भारताचा संभाव्य संघ असणार आहे. आयसीसी स्पर्धांमध्ये पाकिस्तानवर भारताचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून येते. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत झालेल्या १६ विश्वचषक सामन्यांपैकी १५ सामन्यांमध्ये भारताने विजय मिळवला आहे. यात एकदिवसीय विश्वचषकात दोन्ही संघांमध्ये आठ सामने झाले, जे सर्वच्या सर्व भारताने जिंकले आहेत. टी-२० विश्वचषकात देखील आठ सामने खेळवण्यात आले असून त्यातील ७ सामने भारताने तर १ सामना पाकिस्तानने जिंकला आहे. भारत विरुद्ध पाकिस्तान १९८४ पासून आतापर्यंत खेळल्या गेलेल्या १६ आशिया चषकांमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात १८ सामने झाले आहेत. यापैकी १० सामन्यांमध्ये भारताने, तर ६ सामन्यांमध्ये पाकिस्तानने विजय मिळवला आहे. तर २ सामने निकाल लागला नाही.

**आशिया चषकातील यशस्वी संघ**

**भारत -८ विजेतेपदे (१९८४, १९८८, १९९०-९१, १९९५, २०१०, २०१६, २०१८, २०२३)श्रीलंका - ६ विजेतेपदेपाकिस्तान - २ विजेतेपदे.गेल्या पाच वर्षांची स्थितीसप्टेंबर २०२० पासून ते सप्टेंबर २०२५ पर्यंत, दोन्ही संघांनी टी-२० स्वरूपात ५ वेळा एकमेकांचा सामना केला आहे. यापैकी भारत ३-२ अशा फरकाने पुढे आहे. ही अलीकडील कामगिरी भारताचा आत्मविश्वास वाढवते.**

### मीनाक्षी, जास्मिनचा सुवर्ण पंच

| लिव्हरपूल | वृत्तसंस्था |

जास्मिन लंबोरिया आणि मीनाक्षी हुडा यांनी रविवारी सुवर्ण पंच लगावला. लिव्हरपूल, इंग्लंड येथे झालेल्या जागतिक अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत या दोघींनी आपापल्या वजनी गटात ऐतिहासिक सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्याशिवाय नुपूर शेरॉनने रौप्य, तर पूजा राणीने कांस्यपदक जिंकले. त्यामुळे एकूण ४ पदकांसह भारताने या स्पर्धेची सांगता केली. लिव्हरपूल, इंग्लंड येथे गेल्या आठवड्यापासून जागतिक बॉक्सिंग स्पर्धा सुरू असून यामध्ये भारताचे महिला व पुरुष बॉक्सर मिळून २० खेळाडू सहभागी झाले होते. यंदा नव्या प्रशासकीय समितीच्या मार्गदर्शनात बॉक्सिंगची जागतिक स्पर्धा झाली. यापूर्वी आयबीए म्हणजेच आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग असोसिएशनच्या अंतर्गत स्पर्धांचे आयोजन केले जायचे. या स्पर्धेत ६५ देशांतील ५५० बॉक्सर्स सहभागी होणार आहेत.

## श्रेयस संपूर्ण रणजी हंगामाला मुकणार

| मुंबई | प्रतिनिधी |

भारताचा अनुभवी फलंदाज श्रेयस अय्यरने पाठदुखीमुळे लाल चेंडूने होणाऱ्या सामन्यांतून तब्बल सहा महिने विश्रांती घेतली असल्याचे बीसीसीआयने गुरुवारी स्पष्ट केले. त्यामुळे श्रेयस आगामी रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतही खेळणार नाही. अशा स्थितीत श्रेयसचे कसोटी संघातील पुनरागमनाच्या आशा पूर्णपणे मावळल्या आहेत, असे म्हणू शकतो.



अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय निवड समितीने गुरुवारी वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली. तसेच ऑस्ट्रेलिया ‘अ’ संघाविरुद्ध होणाऱ्या ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारत ‘अ’ संघही यावेळी जाहीर करण्यात आला. एकीकडे श्रेयस हा एकदिवसीय मालिकेत भारत ‘अ’ संघाचे नेतृत्व करणार आहे. मात्र प्रथम श्रेणी क्रिकेटपासून त्याने सहा महिने दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. रणजी स्पर्धा १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार असून फेब्रुवारीत अंतिम सामना रंगणार आहे. त्यामुळे श्रेयस संपूर्ण हंगामाला मुकणार असून तो आता प्रामुख्याने मर्यादित षटकांच्या क्रिकेटवरच लक्ष केंद्रित करणार आहे.

३० वर्षीय श्रेयस हा ऑस्ट्रेलिया ‘अ’ संघाविरुद्ध सुरू असलेल्या चार दिवसीय कसोटी मालिकेत भारत-अ संघाचा कर्णधार होता. मात्र पहिल्या लढतीत भारत ‘अ’ संघाचे नेतृत्व केल्यानंतर श्रेयसने मंगळवारपासून सुरू झालेल्या दुसऱ्या सामन्यातून माघार घेतली. पाठदुखीने यापूर्वीही श्रेयसला सतावले असून तो आता कधी परतणार, हे पाहणे रंजक ठरेल.



### ज्युनियर हॉकी संघाची घोषणा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

सुल्तान जोहोर हॉकी करंडकासाठी भारताच्या ज्युनियर संघाची घोषणा सोमवारी करण्यात आली. रोहित याच्याकडे भारतीय हॉकी संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. सुल्तान जोहोर हॉकी करंडक ही ज्युनियर हॉकी करंडकाची रंगीत तालीम असू शकणार आहे. सुल्तान जोहोर हॉकी करंडक ११ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर या कालावधीत रंगणार असून, ज्युनियर हॉकी विश्वकरंडक २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत पार पडणार आहे. ज्युनियर हॉकी विश्वकरंडक चेन्नई व मदुराई येथे पार पडणार आहे. भारतीय हॉकी संघाचा सुल्तान जोहोर हॉकी करंडकातील सलामीचा सामना ११ ऑक्टोबरला ग्रेट ब्रिटनशी होणार आहे.

## दबंग दिल्लीचा यू मुंबावर विजय

| जयपूर | वृत्तसंस्था |

प्रो कबड्डी २०२५ स्पर्धेतील १२ व्या हंगामातील ५० वा सामना यू मुंबा आणि दबंग दिल्ली या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात यू मुंबाला एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागला आहे. दबंग दिल्लीकडून आशू मलिकने दमदार खेळ केला. जयपूरच्या एसएमएस इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात दबंग दिल्लीकडून आशू मलिकने २३ गुणांची कमाई केली. ही त्याची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी ठरली. यासह दबंग दिल्लीने हा सामना ४७-२६ च्या फरकाने जिंकला. या विजयासह दबंग दिल्लीने १४ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी झेप घेतली आहे. या सामन्यात दबंग दिल्लीकडून पहिली चढाई करण्यासाठी आशू मलिक आला. यादरम्यान आशूने १ गुण घेत दबंग दिल्लीला दमदार सुरूवात करून दिली. तर यू मुंबाकडून संदीपने १ गुण घेत संघाचं खातं उघडून दिलं. ३० व्या फ़िनेस्टा ओपन नॅशनल टेनिस चॅम्पियनशिप नवी दिल्लीत मयाफ दिवशी सुरू होणार. या सामन्यातही अजित चौहानला विश्रांती देण्यात आली होती. त्यामुळे यू मुंबाकडून चढाईची जबाबदारी संदीपकडे होती. दबंग दिल्लीकडून पाचव्या मिनिटाला नीरजने १ गुण घेत दोन्ही संघांचे गुण ३-३ ने बरोबरीत आणले. सुरूवातीच्या ५ मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर यू मुंबाचा संघ ५-४ ने आघाडीवर होता. सामन्यातील ९ व्या मिनिटाला नीरजने २ गुण घेत दबंग दिल्लीची पिछाडी कमी करत गुणसंख्या ८-७ वर आणली. शेवटी दबंग दिल्लीने हा सामना ४७-२६ गुणांसह आपल्या नावावर केला.



## रायगडच्या मुलांचा सुवर्ण चौकार
### थांग-ता राज्य अजिंक्य स्पर्धेत मारली बाजी



| रायगड जिल्हा | प्रतिनिधी |

थांग-ता राज्यस्तरीय अजिंक्य स्पर्धा अमरावतीमध्ये पार पडली. या स्पर्धेत रायगडच्या चार मुलांनी सुवर्ण कामगिरी करीत जिल्ह्याचे नाव लौकिक केले.

२९ व्या थांगता राज्य चॅम्पियनशिप स्पर्धेत २५ जिल्ह्यातील ४३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.यामध्ये रायगड जिल्ह्यातील १४ खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

पेण-अलिबागच्या मुलांनी चार सुवर्ण, एक रौप्य आणि पाच कांस्यपदक मिळविले. पेण तालुक्यातील मोठे भाल गावाचा सुचित विजय म्हात्रे, अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील आदित्य चव्हाण, वावे गावातील सार्थक तिडके, कुसुंबळेमधील श्रेया पिंगळे यांनी सुवर्णपदक पटकावले.

वेदिका संतोष कवळे नवगाव हिने रौप्य पदक प्राप्त केले. वागोडी गावाची तनिष्का राकेश पाटील, पेझारी गावातील प्रियुक्ता मृदुल म्हात्रे यांनी कांस्यपदक पटकावले.

प्रियुत्ता हीचा सर्वात लिटिल गर्ल म्हणून तसेच तिनविरा येथील सानिध्य नंदकुमार पाटील याला सर्वात छोटा मुलगा म्हणून सन्मानित करण्यात आले.



रामराजमधील लांयबा शहजाद अन्सारी हीने रौप्यपदक मिळविले असून कुणेमधील अंश नाईक, चोंढी-किहीमधील रुद्र मोकल आणि बेलोशीमधील शुभ्रा गायकर यांनी चतुर्थ क्रमांक मिळविला आहे.

अलिबागची कांस्य पदक विजेती-प्राप्ती समीर टावरी हीने कांस्य पदक मिळविले आहे. छवी सागर अग्रवाल पेझारी हीने १४ वर्षे मुलींच्या गटामध्ये चौथा क्रमांक मिळविला. गोवा आणि आसाम येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

### मुंबई इंडियन्सला मिळाला नवीन कोच

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबई इंडियन्स महिला संघाला नवा कोच मिळाला. ऑस्ट्रेलियन माजी क्रिकेटपटू लिसा नाइटली यांची मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती. चार्लोट एडवर्ड्स यांची जागा लिसा नाइटली यांनी घेतली. महिला प्रीमियर लीगमधील मुंबई इंडियन्स फ्रँचायझीने त्यांच्या नवीन प्रशिक्षकाची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलियन लिसा नाइटली यांची कोचम्हणूननिवडकरण्यातआलीय. चार्लोट एडवर्ड्स ह्या आधी मुंबई संघाच्या प्रशिक्षक होत्या. लिसाने ऑस्ट्रेलियन महिला संघाला दोन एकदिवसीय विश्वचषक विजेतेपदे मिळवून दिली आहेत.




## संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी दिल्या खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा
# पीएनपी शाळांचे क्रीडा स्पर्धेत नेत्रदीपक यश

| अलिबाग | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासन व जिल्हा क्रीडा नेहरु युवक यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुकास्तरीय पावसाळी मैदानी ( मुलगे १७ वर्ष वयोगट ) स्पर्धा २४ सप्टेंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल नेहुली येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये १७ वर्षे वयोगटात पीएनपी माध्यमिक शाळा वेश्वी गोंधळपाडा या शाळेतील इयत्ता १० वीचा विद्यार्थी हिमांशू निर्मल याने लांब उडी या प्रकारात दुसरा क्रमांक पटकावला, तर १७ वर्ष वयोगटात १५०० मीटर धावणे या प्रकारात दुसरा क्रमांक पटकावला. दोन्ही प्रकारात दुसरा क्रमांक प्राप्त करून हिमांशू निर्मल हा विद्यार्थी जिल्हातरीय स्पर्धेसाठी पात्र झाला आहे.



२५ सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय मुलींच्या मैदानी स्पर्धेमध्ये १४ वर्ष वयोगटामध्ये लांब उडी या प्रकारात इयत्ता ९ वीची विद्यार्थिनी जिविका जाधव हिने दुसरा क्रमांक पटकावला, १७ वर्ष वयोगटात ८०० मिटर धावणेमध्ये इयत्ता १० वीची विद्यार्थिनी कार्तिकी संजय हिने प्रथम क्रमांक पटकावला, १७ वर्ष वयोगटात ३००० मिटर चालणे या क्रीडा प्रकारात इयत्ता १० वीची विद्यार्थिनी नंदिनी निकम हिने प्रथम क्रमांक पटकावला.

त्याच प्रमाणे पीएनपी माध्यमिक शाळा वायशेतमधील १४ वर्ष वयोगटाखालील गटात २०० मीटर धावणे मुस्तफा राइन हिने द्वितीय क्रमांक तसेच गोळा फेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक आणि थाळीफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला असून त्याची निवड जिल्हा पातळीवर निवड झाली असून तो तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. तसेच ओमकार वाघमारे याने १७ वर्षाखालील गटात भालाफेक या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला.

वरील सर्व विद्यार्थी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी वेश्वी गोंधळपाडा शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, पीएनपी वायशेत शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पाटील यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे व क्रीडा शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)